# प्रकरण तीन

## समाजकल्याण विभाग

**3.731 वस्तीगृह अनुदान वाटप खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत समाजकल्याण विभाग यांनी मागासवर्गीय वस्तीगृहांना सहायक अनुदान रक्कम रुपये 26,68,173/- वाटप करण्यात आले असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडुन सर्व वस्तीगृहांना बायोमॅट्रीक मशीन पुरवण्यात आलेले असुन, सदर वस्तीगृहात राहात असणाऱ्या विद्यार्थ्यांची हजेरी घेण्यासाठी पुरविण्यात आलेले आहेत. त्यानुसार बायोमॅट्रीक मशीनद्वारे घेण्यात आलेल्या हजेरीचेपत्रक जोडणे आवश्यक असताना, त्यानुसार जोडण्यात आले नाही. सहाय्यक अनुदान प्रस्तावासोबत जोडण्यात आलेले हजेरीपत्रकांवरुन 75 टक्केपेक्षा अधिक हजेरी असल्याची पडळताणी होत नाही.

2) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण व सांस्कृतीक कार्यक्रम विभाग, शासन निर्णय, क्रमांक बीसीएच/1097/प्र.क्र.107/मबाक-4, मुंबई,दिनांक 16/03/1998 अन्वये जोडपत्र अ 8 चा 7 अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे अनुदान निर्धारण योग्य झालेले नसल्याचे दिसुन येते.

3) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण व सांस्कृतीक कार्यक्रम विभाग, शासन निर्णय, क्रमांक बीसीएच/1097/प्र.क्र.107/मबाक-4, मुंबई, दिनांक 16/03/1998 अन्वये जोडपत्र अ 8 मधील क्र.3 क मधील तरतुदीप्रमाणे संस्था आर्थिक दृष्टया संपन्न असण्यासाठी वस्तीगृहाच्या व्यवस्थापनाकरिता संस्थेच्या नावे किमान रक्कम रुपये 10,000/- कायमस्वरुपी जमा असणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही नाही.

4) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण व सांस्कृतीक कार्यक्रम विभाग, शासन निर्णय, क्रमांक बीसीएच/1097/प्र.क्र.107/मबाक-4, मुंबई,दिनांक 16/03/1998 अन्वये जोडपत्र अ, अ.क्र. 7 प्रमाणे सकस व पुरेसे अन्न वेळोवेळी विहीत केलेल्या आहाराच्या प्रमाणात दयावयाचे असताना त्यानुसार कार्यवाही झालेली नाही.

**3.732 20 टक्के जिल्हा परिषद निधीतुन आदिवासी क्षेत्रातील मागासवर्गीय विद्यार्थीना बसण्यासाठी डयुएलडेक्स टेबल खरेदी खर्चातील अनियमतताबाबत.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** आदिवासी क्षेत्रातील मागासवर्गीय विद्यार्थीना बसण्यासाठी डयुएलडेक्स टेबल वर रुपये 3,06,96,610/- खर्च करण्यात आला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, मुरबाड, शहापुर, भिवंडी, कल्याण, अंबरनाथ, वसई, पालघर, डहाणु, तलासरी, वाडा, विक्रमगड, जव्हार, मोखाडा, यांचे मंजुर केलेले प्रस्ताव लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक मागास-1093/ प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 अन्वये साहित्य खरेदी ज्या अर्थिक वर्षात झाली त्या आर्थिक वर्षात वाटप होणे बंधनकारक आहे. याबाबत पडळताणी करण्यासाठी गटस्तराकडील साठा नोंदवही लेखापरिक्षण उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

3) पुरवठादाराचे पत्र दिनांक 21/06/2014 अन्वये सन 2014-15 या वित्तीय वर्षासाठी मागील आदेशाप्रमाणे संस्था बेंचेस पुरवठा करु इच्छिते असे कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार पुरवठा आदेश देण्यात आले, त्यानुसार पुरवठादारने इ.एस.पी.ए. डयुएस डेस्क पुरवठा नग 2326 परिणामाची संख्या लक्षात घेता आम्हाला दिलेला कालावधी हा अतिशय कमी होता, असे नमुद केलेले आहे. तसेच प्रत्यक्षात 7304 नग डयुएल डेस्क पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. पुरवठादाराच्या पत्रात नमुद केलेले नग 2326 एवढे नमुद करण्यात आलेले आहेत व तेवढया नगासाठी मुदतवाढीसाठी अर्ज केलेला आहे. त्यामुळे 7304 डयुएल डेस्कचा पुरवठा करण्यात आला किंवा नाही याची पडळताणी होत नाही.

4) बाजारभावातील दराची पडळताणीसाठी सदर नस्तीत wood mail, Dee core furniture, wood land garden यांचे कोटेशन जोडण्यात आलेले असून, सदर कोटेशनवर सदर दुकानदाराचा / पुरवठादराचा दुरध्वनी क्रमांक, व्हॅट नंबर, रजिस्ट्रेशन इत्यादी बाबीची नोंद नाही. यावरुन पुरविण्यात आलेले डयुएल डेस्कची बाजारभावाशी तुलना केलेली नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेचे आर्थिक नुकसान झाल्याचे नाकारता येत नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक परास/1089/646/266/3,दिनांक 29/07/1989 अन्वये फलश्रूती अहवाल व मुल्यमापन पडळताणी न केल्याने योजनेचा उद्देश सफल झाला किंवा नाही याची पडताळणी होत नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त-9, मुंबई,दिनांक 20/06/2008 मधील मार्गदर्शक सुचनांनुसार लाभाच्या योजना राबविताना वेळापत्रकांनुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झालेली नाही.

**3.733 20 टक्के जिल्हा परिषद निधीतुन ग्रंथालयासाठी स्पर्धा परीक्षा पुस्तके खरेदी खर्चातील अनियमितताबाबत**.

**जिल्हा परिषद ठाणे**, **सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत समाजकल्याण विभाग यांनी 20 टक्के जिल्हा परिषद निधीतुन ग्रंथालयासाठी स्पर्धा परीक्षा पुस्तके खरेदीवर रुपये 59**,**81**,**300/- खर्च करण्यात आला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर मक्तेदाराने सदर पुस्तकांचा पुरवठा न करताच खोटे प्रमाणपत्र देवुन सदर पुर्ण रक्कम आहरीत करण्यात आल्याचे कळते. याबाबत सदर मक्तेदारच्या विरोधात दंडाची कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्या संदर्भातील अर्धसमास पत्र क्रमांक 7,दिनांक 03/12/2015 अन्वये मागणी करण्यात आली असताना ही सदर कागदपत्रे (नस्ती) लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

2) सदर खरेदी बाबत मुंबई वित्तीय नियम 1959 मधील तरतुदीनुसार वित्तीय औचित्याचा वापर केला किंवा कसे याबाबत खात्री करता आली नाही.

3) पंचायत समिती, मुरबाड, शहापुर, भिवंडी, कल्याण, अंबरनाथ, वसई, पालघर, डहाणु, तलासरी, वाडा, विक्रमगड, जव्हार, मोखाडा यांचे मंजुर केलेले प्रस्ताव लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक मागास-1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 अन्वये साहित्य खरेदी ज्या आर्थिक वर्षात झाली, त्या आर्थिक वर्षात वाटप होणे बंधनकारक आहे, त्यानुसार कार्यवाही झालेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्रमांक 1098/ प्र.क्र.73/34, मुंबई, दिनांक 20/10/1999 मधील 1 नुसार 20 टकके रक्कमेतुन आदिवासी उपयोजना क्षेत्रात एखादी सामुदायिक विकासाची योजना कार्यान्वित करण्यापुर्वी जिल्हा परिषदने संबंधित प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग यांच्याशी संपर्क साधून सदर योजना राबविणे आवश्यक होते, तरी त्यानुसार कार्यावाही केलेली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक परास/1089/646/266/3, दिनांक 29/07/1989 अन्वये फलश्रूती अहवाल व मुल्यमापन पडताळणी न केल्याने योजनेचा उद्देश सफल झाला किंवा नाही याची पडताळणी केल्याचे आढळुन आले नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, मुंबई, दिनांक 20/06/2008 मधील मार्गदर्शक सुचनांनुसार लाभाच्या योजना राबविताना वेळापत्रकांनुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झालेली नाही.

**3.734 दुर्गम भागातील विदयुत सोय नसलेल्या घटकांना सौर उर्जा संच पुरविणे.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** समाजकल्याण विभाग जिल्हा परिषद रायगड सन 2014-15 मध्ये जिल्हा परिषद सेस मधून 19,92,000/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 नुसार खरेदी साहित्य त्याच वर्षात वाटप करून लाभार्थ्यांच्या आर्थीक स्थीती अहवाल सादर करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

2) लाभार्थी निवड व वाटप नस्ती उपलब्ध झाली नाही. लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवली नाही.

3) पुरवठा आदेश दिनांक नमुद नाही. पुरवठा आदेशापुर्वी करारनामा करणे आवश्यक असतांना करारनामा खरेदी दिनांक 16/04/2015 रोजी केलेला आहे. त्यावर अतिरीक्त मुख्यकार्यकारी अधीकारी यांच्या सहया असून त्यावर दिनांक 31/03/2015 असा नमुद आहे. माल पुरवठा करण्याची मुदत दिनांक 31/03/2015 अशी आहे. व करारनामा मुद्रांक खरेदी दिनांक 16/04/2015 असा आहे या वरून पुरवठा उशिराने झाल्याचे स्पष्ट होते.

4) सौररीपाया हमी कालावधी असता 10 टक्के रक्कम राखून ठेवणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

5) लेखासंहिता 1968 चे नियम 83 नुसार साहीत्य गुणवत्ता प्रमाणपत्र तपासणीस उपलब्ध झाले नाही.

6) प्रशासकिय मान्यता व तांत्रीक मान्यता क्रमांक व दिनांक नमुद नाही.

7) लाभार्थी निवडीबाबत ग्रामसभेची मान्यता घेतल्याचे आवश्यक कागदपत्र तपासणीस नस्तीस उपलब्ध झाले नाही.

8) जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे फलश्रृती अहवाल प्राप्त करून मुल्यांकन होणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

9) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446,दिनांक 26/10/1989 अन्वये योजना राबविण्याचे वेळापत्रक निश्चीत केले आहे, त्यानुसार विभागाने कार्यवाही केली नाही.

**3.735 मागासवर्गीयांना वाचनालयास 73 कपाटे पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** समाजकल्याण विभाग जिल्हा परिषद रायगड यांनी जिल्हा परिषद सेस मधून 6,49,700/- रूपयाचे कपाट खरेदीकरीता खर्च करणेंत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक ओ.पी.आर./033/सी.आर.786/30, दिनांक 26/10/1989 अन्वये ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्याच वर्षात वाटप बंधनकारक असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

2) पंचायत समिती निहाय मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही. व लाभार्थीचे आर्थिक स्थितीचे अहवाल सादर केले नाही.

3) जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनाचे फलश्रुती अहवाल प्राप्त करून मुल्यांकन घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

4) लाभार्थी निवडीबाबत ग्रामसभेची मान्यता असलेले कागदपत्र उपलब्ध झाले नाहीत. व करारनामा केला नाही.

5) मागासवर्गीयांची लोकसंख्या 25 असल्याची खात्री आवश्यक कागदपत्राअभावी करता आली नाही.

6) प्रशासकिय मान्यता नस्तीत तपासणीस उपलब्ध झाली नाही. व तांत्रिक मान्यता आदेश क्रमांक व दिनांक नमुद नाही.

7) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र./446/वित्त-9,दिनांक 2/06/2008 अन्वये योजना राबविण्याचे वेळापत्रक निश्चीत केले आहे, त्यानुसार विभागाने कार्यवाही केली नाही.

8) दिनांक 03/01/1999 च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 11 नुसार वाटप केलेल्या लाभार्थ्यांची नोंदवही परीशीष्ट ड मध्ये ठेवणे आवश्यक आहे. तशी नोंदवही विभागाने ठेवलेली नाही.

9) कपाटे मागणी अर्ज नस्तीत तपासणीस उपलब्ध नाही. मागणी नसतांना पुरवठा काय आधारे केला.

10) अटी शर्ती क्र.1 नुसार समाज मंदिरामध्ये कपाटे पुरविण्यात येऊन ग्रामपंचायतींच्या सरपंच ग्रामसेवक यांची संयुक्त पोच देणे बंधनकारक असतांना तशी नोंदवही ठेवलेली नाही.

11) गट विकास अधीकारी यांना कपाटे पोच झाल्याची दिनांक 20/09/2014 ते 24/09/2014 अशी चलने नस्तीत उपलब्ध आहे. पुरवठा आदेशाअगोदर कपाटे पोहच कशी प्राप्त झाली खुलासा करावा.

12) दिनांक 31/3/2015 पर्यंत कपाटे वाटप करणे बंधनकारक असतांना रक्कम रूपये 6,49,700/- ची कपाटे वाटप न केल्याने रक्कम गुंतून पडली आहे.

**3.736 मागासवर्गीय महिला मंडळांना सतरंजी पुरविणे.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** समाजकल्याण विभाग जिल्हा परिषद रायगड यांनी महिला मंडळाकरीता सतरंजी पुरविणेसाठी जिल्हा परिषद सेस मधून रक्कम रूपये 9,91,579/- इतका खर्च केला आहे, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/प्र.क्र.1239/34,दिनांक 01/09/1993 नुसार खरेदी साहित्याची त्याच आर्थिक वर्षात वाटप करून लाभार्थ्यांची आर्थीक स्थीती अहवाल सादर करणे आवश्यक असतांना तशी कार्यवही केली नाही.

2) खर्च रक्कम रूपये 9,91,579/- चे बील नस्तीस उपलब्ध असून त्यावर दिनांक नमुद नाही. मालाचा पुरवठा केव्हा व त्याचे वाटप केव्हा झाले याची आवश्यक कागदपत्रे तपासणीस उपलब्ध झाले नाही.

3) मालाच्या / साहित्याच्या मागणीचे अर्ज तपासणीस उपलब्ध झाले नाही.

4) लाभार्थी निवडीबाबत ग्रामसभेची मान्यता घेतल्याचे आवश्यक कागदपत्रे तपासणीस नस्तीस उपलब्ध झाले नाहीत. तसेच फलश्रृती अहवाल प्राप्त झाला नाही.

5) लाभार्थी निवड यादी तपासणीस उपलब्ध झाली नाही. व साहित्य गुणप्रत तपासणी अहवाल तपासणीस उपलब्ध झाला नाही.

6) करारनामा दिनांक 20/04/215 रोजी केला आहे. व पुरवठा आदेश दिनांक 24/03/2015 रोजी दिलेला आहे. पुरवठा आदेश देण्यापुर्वी करारनामा करणे आवश्यक असतांना नंतर करारनामा केलेला आहे.

7) ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/ वित्त-9 दिनांक 20/9/2008 अन्वये योजना राबविण्याचे वेळापत्रक निश्चीत केले आहे त्यानुसार विभागाने कार्यवाही केली नाही.

8) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.मागास/प्रक्र.1239/34, दिनांक 01/09/1993 नुसार खरेदी साहित्य त्याच वर्षात वाटप करून लाभार्थींची आर्थिक स्थिती अहवाल सादर करणे आवश्यक असतांना तसे केले नाही.

9) दिनांक 03/01/1999 च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 11 नुसार वाटप केलेल्या लाभार्थ्यांची नोंदवही परीशीष्ट ड मध्ये ठेवणे आवश्यक आहे. तशी नोंदवही विभागाने ठेवलेली नाही.

10) प्रशासकीय व तांत्रीक मान्यता घेण्यात आली नाही.

11) मालाच्या/साहित्याच्या मागणीचे अर्ज तपासणीस उपलब्ध झाले नाही. त्यामूळे मागणी नसतांना पुरवठा केल्याचे दिसून येते.

12) साहित्य गुणप्रत तपासणी अहवाल तपासणीस उपलब्ध झाला नाही.

13) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासननिर्णय क्रमांक ओपीआर/1088/सी.आर 786/30, दिनांक 26/10/1989 नुसार ज्या वित्तीय वर्षात उपरोक्त साहित्य खरेदी केले आहे त्याच वर्षात वाटप करणे बंधनकारक असतांना तसे केले नाही.

**3.737 मागासवर्गीय वस्ती सौर उर्जा प्रकाश योजना राबविणे.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** समाजकल्याण विभाग अंतर्गत मागासवर्गीय वस्ती करीता 116 नग सौर उर्जा प्रकाश योजना राबविण्यासाठी जिल्हा परिषद सेस मधून 24,82,000/- इतका खर्च केला आहे, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक भाखस/1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 02/09/1993 मधील परिच्छेद क्रमांक 8 नुसार लाभार्थ्यांची पंचायत समितीनिहाय मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

2) जिल्हा परिषद पंचायत समिती लेखासंहिता नियम 1968 कलम 83 नुसार गुणवत्ता प्रमाणपत्र नस्तीत आढळून आले नाही.

3) लाभार्थी निवडीबाबत ग्रामसभेची मान्यता घेतल्याचे कागदपत्रे तपासणीस उपलब्ध झाली नाही. व योजना राबविण्याच्या निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविली नाही.

4) खरेदी केलेल्या वर्षातच साहित्य वाटप केले नाही. व लाभार्थी नोंदवही ठेवली नाही.

5) हमी कालावधीसाठी 10 टक्के रक्कम राखून ठेवली नाही व सदर लाभ अन्य कोणत्याही योजनेतून घेतला नसल्याचा दाखला नस्तीत तपासणीस उपलब्ध झाला नाही.

6) देयकासोबत असलेल्या बिलावर दिनांक नमुद नसलेने तसेच पुरवठा चलन नस्तीत उपलब्ध नसलेने माल केव्हा प्राप्त झाला याची खात्री करता आली नाही. तांत्रीक मान्यात आदेश अट क्र.3 नुसार देखभाल व सुरक्षा समीती नेमणूक करणे आवश्यक असतांना तसे केलेले नाही.

7) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निणर्य क्रमांक ओपीआर/1088/सीआर-786/30, दिनांक 26/10/1989 नुसार ज्या वित्तीय वर्षात उपरोक्त साहित्य खरेदी केले आहे. त्याच वर्षात वाटप करणे बंधनकारक असतांना तसे केलेले नाही.

8) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास प्र.क्र./1239/34,दिनांक 01/09/1993 नुसार खरेदी साहित्य त्याच वर्षात वाटप करून लाभार्थ्यांची आर्थिक स्थिती अहवाल सादर करणे आवश्यक असतांना तसे केले नाही.

9) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक मागास 1089/646/269/38,दिनांक 28/07/1989 अन्वये जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनाचे फलश्रृती अहवाल प्राप्त करून मुल्यांकन होणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

10) पुरवठा बिलावर माल सुस्थीतीत पोहोचला व रक्कम अदा करण्यास हरकत नाही असा दाखला नसल्याने बिल पारीत कसे केले याबाबत खुलासा करावा, तसेच मालाच्या नोंदी डेडस्टॉकमध्ये घेण्याच्या नोंदी नाही.

**3.738 जिल्हा परिषद सेस अंतर्गत महिलांना पिकोफॉल मशीन पुरविणे.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** जिल्हा परिषद सेस मधून समाजकल्याण विभागांतर्गत महिलांना पिको फॉल मशीन पुरविण्यासाठी 9,97,884/- इतका खर्च केला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेश दिनांक 26/03/2015 चा असतांना माल पुरवठा दिनांक 11/08/2015 रोजी विलंबाने करण्यात आला, पुरवठा विलंबाने केलेल्या एकूण मालाच्या 5 टक्के रक्कम रूपये 34,204/- इतकी रक्कम संबंधीत ठेकेदाराकडून वसूलात आणावी.

2) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक पं.रा.स.1089/646/269/38, दिनांक 28/07/1989 अन्वये जिल्हा परिषदेने राबविण्यात येणाऱ्या योजनाचे फलश्रुती / उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले नाही.

3) शासन निर्णय, झेडपीए/2012/प्र.क्र.680/वित्त-09 मंत्रालय मुंबई, दिनांक 21/01/2013 नुसार तांत्रिक व प्रशासकिय मंजूरीचे अधीकार रूपये 10,00,000/- ची खरेदी पर्यंत जिल्हा परिषद खाते प्रमुखांना आहे, परंतू सदर खरेदीसाठी तांत्रिक मान्यता व दिनांक नमुद नाही. तसेच प्रशासकिय मंजूरी घेतलेली नाही.

4) लाभार्थी अर्ज तपासणीस नस्तीत उपलब्ध झाले नाही.

5) उपयोगिता प्रमाणपत्र घेतले नाही.

### 3.739 20 टक्के जिल्हा परिषद सेस अंतर्गत महिलांना शिलाई मशीन पुरविणे.

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद रायगड सन 2014-15 मध्ये जिल्हा परिषद सेस अंतर्गत महिलांना शीलाई मशीन पुरविणेसाठी रक्कम रूपये 9,98,847/- इतका खर्च करणेंत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय, झेडपीए/2012/प्र.क्र.680/वित्त-9 मंत्रालय मुंबई, दिनांक 31/03/2013 नुसार तांत्रिक व प्रशासकिय मंजूरीच अधीकार 10 लाख खरेदीपर्यंत जिल्हा परिषदेस आहेत. परंतू सदरच्या खरेदीसाठी तांत्रिक मान्यता क्रमांक व दिनांक नमुद नाही, व प्रशासकिय मंजूरी घेतलेली नाही.

2) सदरची योजना सन 2014-15 या वित्तीय वर्षासाठी असतांना सदरचे वाटप दिनांक 11/08/2015 रोजी केलेले आहे. उशीरा पुरवठा केलेल्या मालाच्या 5 टक्के रक्कम विलंब आकार रूपये 33,108/- वसूल करणेत यावा.

3) जिल्हा परिषदेकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांचे फलश्रुती अहवाल/उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाले नाही.

4) रूपये 100/- चे स्टॅम्प पेपरवर ठेकेदाराकडून करारनामा करून घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

5) लाभार्थी अर्ज नस्तीत तपासणीस उपलब्ध झाले नाही.

6) लाभार्थ्यांना शीलाई मशीन वाटप झाल्याची पोच घेतली नाही.

7) लाभार्थी मागणी अर्ज तपासणीस उपलब्ध झाले नसल्याने लाभार्थी खरोखर पात्र असल्याची खात्री करता आली नाही.

8) पुरवठा आदेशातील अट क्र.4 नुसार पुरवठा झालेल्या मालाची तपासणी अहवाल प्राप्त झाला नसतांनाही देयक अदा केले आहे.

### 3.740 मागासवर्गीय विदयार्थ्यांना संगणक पुरविणे.

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद रायगड यांनी जिल्हा परिषद सेस अंतर्गत मागासवर्गीय विदयार्थ्यांना संगणक पुरविणेसाठी रूपये 74,51,044/- इतका खर्च करण्यात आला आहे, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेशानुसार संबंधीत ठेकेदारांच्याकडून अनुक्रमे रूपये 4,100/- व रूपये 1,600/- या रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून घेणे बंधनकारक असतांना अशी कार्यवाही केली नाही. त्यामूळे शासनाचा महसूल रक्कम रूपये 5,700/- नुकसान झाले.

2) मालाच्या पुरवठयाच्या रक्कमेवर प्रती आठवडा 0.5 टक्के व त्यांची कमाल मर्यादा एकूण रक्कमेच्या 5 टक्के असतांना पुरवठा आदेशानंतर पंधरा दिवसाच्या आत पुरवठा करावयाचा असतांना डिलीव्हरी चलनावरील 11/11/2014 क्र.09 अन्वये तालुक्यांना 9 आठवडे उशिराने पुरवठा केला आहे, त्यामूळे विलंब आकार रक्कम रूपये 2,23,644/- इतकी रक्कम संबंधीत ठेकेदाराकडून वसूलात आणावी.

3) अट क्र.5 व 6 नुसार 15 दिवसाच्या आत पुरवठा न करता प्रती आठवडा 0.5 टक्के म्हणजेच 6 महिने संगणक उशीराने पुरवठा केल्याने एकूण मालाच्या 5 टक्के रक्कम रूपये 1,24,059/- संबंधीत ठेकेदार यांचेकडून वसूलात आणावी.

4) संगणक वाटपानंतर तांत्रिक तपासणी अहवाल घेतला आहे.

5) पंचायत समिती अलीबाग यांना मंजूर यादीप्रमाणे 11 संगणक मंजूर आहेत, परंतू पोच 9 संगणकांची आहेत. 2 संगणक बाबत काय केले याचा बोध होत नाही.

6) लाभार्थींच्या प्रत्यक्ष वाटपाच्या पोच घेतल्या नाहीत. त्यामूळे लाभार्थींना संगणक वाटप झाले अगर कसे याचा बोध होत नाही.

7) शासन निर्णय, झेडपीए/2012/प्र.क्र./680/वित्त-9 मंत्रालय, मुंबई-400032,दिनांक 31/01/2013 चे भाग 4 नुसार एकाच वर्षात एकाच खरेदीसाठी 50 लाखावरील खरेदीसाठी तांत्रीक मंजूरीचे अधीकार समाजकल्याण आयुक्त पुणे यांना आहे. तसे असतांना तांत्रीक मंजुरी घेतली नाही.

**3.741 दुर्गम भागातील विदयुत सोय नसलेल्या घटकांना सौर उर्जा संच पुरविणे.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 19) -** समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद रायगड यांनी जिल्हा परिषद सेस अंतर्गत दुर्गम भागातील विदयुत सोय नसलेल्या घटकांना सौर उर्जा संच पुरविणेसाठी रक्कम रूपये 29,88,000/- इतका खर्च केलेला आहे, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 अन्वये योजना राबविण्याचे वेळापत्रक निश्चीत केले आहे. त्यानुसार विभागाने कार्यवाही केलेली नाही.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1239/34,दिनांक 01/09/1993 नुसार खरेदी साहित्य त्याच वर्षात वाटप करून लाभार्थींची आर्थीक स्थीती अहवाल सादर केलेला नाही. व लाभार्थींची मास्टर नोंदवही ठेवली नाही.

3) होमलाईट मागणी अर्ज तपासणीस उपलब्ध झाले नाहीत.

4) प्रमाणक क्रमांक 424 दिनांक 31/03/2015 अन्वये रक्कम रूपये 29,88,000/- अदा करण्यात आलेले आहे त्याप्रमाणे पहील्या 10 लाख रूपयेसाठी 100/- रूपये व पुढील प्रत्येक एक लाख रूपयांना 100/- याप्रमाणे एकूण रूपये 2,000/- च्या स्टॅम्प पेपर वर करारनामा करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5) लेखासंहिता 1968 चे नियम 83 नुसार साहित्य गुणवत्ता पुर्ण असल्याबाबतची खात्री आवश्यक प्रमाणपत्र अभावी करता आली नाही.

6) हमी कालावधीसाठी 10 टक्के रक्कम राखून ठेवली नाही.

7) अंदाजपत्रकीय तरतुद प्रशासकीय मान्यता व तांत्रीक मान्यता नस्तीस उपलब्ध नाही.

8) लाभार्थी निवडीबाबत ग्रामसभेची मान्यता घेतल्याचे आवश्यक कागदपत्रे तपासणीस नस्तीत उपलब्ध झाले नाहीत.

9) लाभार्थी नोंदवही परिशीष्ट ड मध्ये ठेवण्यात आले नाही.

10) ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक मागास 1089/646/269/38, दिनांक 28/07/1989 अन्वये जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे फलश्रुती अहवाल प्राप्त करून मुल्यांकन होणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

11) सदर चलन नंबर 174, दिनांक 30/03/2015 नुसार 180 नग प्राप्त असून वाटप करण्यात आलेले नाहीत.

12) बिलावर पेड व कॅनसल्ड चा दाखला नाही.

**3.742 20 टक्के जि.प.सेस अंतर्गत मागासवर्गीयांच्या व्यायाम शाळांना साहित्य पुरविणे योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 21) -** समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद रायगड यांनी 20 टक्के जि.प.सेस अंतर्गत मागासवर्गीयांच्या व्यायाम शाळांना साहित्य पुरविणे योजनेसाठी रक्कम रूपये 29,90,000/- इतका खर्च केलेला आहे, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) व्यायाम शाळा साहित्य पुरविणे बाबत वर्तमानपत्रात जाहिरात देणेत आलेली नाही.

2) पुरवठा आदेश शर्तीनुसार पुरवठा झालेल्या मालाचा तपासणी अहवाल शासनमान्य संस्थेकडून प्राप्त झालेनंतरच देयके अदा करावयाचे असतांना सदर अहवाल नसतांना देयक अदा केले आहे.

3) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक मागास/1098/प्र.क्र.555/34, दिनांक 05/10/1989 अन्वये जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनाचे सुचनेप्रमाणे मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

4) लाभार्थ्यांचे मागणी अर्ज लेखा परिक्षणास प्राप्त झालेले नाहीत, त्यामूळे योग्य लाभार्थ्यांची निवड झाल्याची खात्री करता आली नाही.

5) पुरवठा आदेशात नमुद केल्याप्रमाणे ठेकेदाराकडून रूपये 2,100/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा घेतलेबाबतची नस्ती लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. त्यामूळे शासनाचे रूपये 2,100/- चे नुकसान झाले आहे.

6) तालुक्यांना अदा केलेल्या चलनावर क्रमांक व नग संख्या नमुद केलेली नाही, त्यामूळे तालुक्यांना मंजूर यादीप्रमाणे साहित्य वाटप झाले अगर कसे याची खात्री करता येत नाही.

7) शासन निर्णय, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, क्रमांक परास/1089/646/269/38, दिनांक 28/07/1989 अन्वये जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे फलश्रुती अहवाल प्राप्त करून मुल्यांकन होणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

**3.743 7 टक्के वन महसूल अनुदान नियमबाहय खर्च केलेबाबत.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत समाजकल्याण विभाग यांनी ताडील बौध्दवाडी येथे संरक्षक भिंत बांधणे व सुरावाडी येथे संरक्षक भिंत बांधणे या कामांवर 7 टक्के वनमहसूल अनुदानातून एकूण रक्कम रुपये 4,07,000/- खर्च करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वर्षवार झालेल्या बांधकामांची नोंदवही ठेवलेली नाही.

2) वनक्षेत्रामध्ये समाविष्ट गावांची अधिकृत यादी नसून 92 गावांपैकी ताडीलसाठी दोन कामे एकाच गावासाठी मंजूर करून सर्व अनुदानाची रक्कम खर्च केलेली आहे.

3) सदर कामांबाबतचे प्रस्ताव नस्तीसोबत ठेवलेले नाहीत.

4) सदर कामांच्या निवडीबाबत विशेष सभेची मंजूरी न घेता रक्कम रुपये 5,00,000/- अनुदानापैकी रुपये 4,07,000/- खर्च करण्यात येऊन उर्वरित रक्कम रुपये 93,000/- अखर्चित ठेवण्यात आली आहे.

5) शासन निर्णय, दिनांक 13/02/2013 चे अनुक्रमांक 4 व शासन निर्णय, दिनांक 03/08/2013 नुसार सदर अनुदान जंगल क्षेत्रातील आदिवासींच्या विकासासाठी किंवा जंगलक्षेत्राच्या विकासासाठी खर्च करणे बंधनकारक असतांना नियमबाहय खर्च करण्यात आलेला आहे. सदर अनुदानाची रक्कम बिगर आदिवासी क्षेत्राकरिता नियमबाहय वापरण्यात आली आहे.

**3.744 कर्णबधिर, मूकबधिर, मतिमंद मुलांचे विद्यालय यांचे परिपोषण व वेतनेत्तर अनुदानाबाबत व इतर लेखे उपलब्ध न झालेबाबत.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** जिल्हा परिषद रत्नागिरी येथील समाजकल्याण विभागाने कर्णबधिर, मूकबधिर विद्यालय व मतिमंद शाळा यांना परिपोषण व वेतनेत्तर अनुदानातील एकत्रित रक्कम रुपये 14,40,000/- प्रदान करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

विद्यालयाकडील हजेरीपत्रके, वेतनदेयके, अनुदान रक्कमा, प्रदान पोहोच, विद्यार्थी हजेरी इत्यादी कोणतेही लेखे लेखापरिक्षणास उपलब्ध केलेले नाहीत. याबाबत मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, 1930 चे कलम 6(1अ) प्रमाणे अर्धसमास पत्र क्रमांक 04, दिनांक 09/05/2016 रोजी देण्यात येऊन देखील ती लेखा परिक्षणास लेखा परिक्षण मुदतीत सादर करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे सदर खर्चाबाबत अपहार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**3.745 दलित वस्ती योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** जिल्हा परिषद रत्नागिरी येथील समाजकल्याण विभागाकडील सन 2014-2015 आर्थिक वर्षाच्या लेख्यांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत. या परिच्छेदामध्ये रुपये 1,05,92,000/- एवढा निधी गुंतलेला आहे.

1) सन 2014-2015 मध्ये जिल्हा परिषद रत्नागिरी यांनी एकूण 20 मंजूर कामांना रुपये 105.92 लाख इतके अनुदान दिलेले आहे. शासन परिपत्रक, क्रमांक दवसु/कामे/कालावधी/ वाढ/2001/का.12/727/01/ सकस महाराष्ट्र राज्य, पुणे,दिनांक 20/08/2001 नुसार व महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसु-2011/ प्र.क्र.442/अजाक, मुंबई, दिनांक 05/12/2011 मधील परिशिष्ठ अ अट क्रमांक 9 नुसार कामे मंजूर केल्यापासून एक वर्षाचे आंत संबंधित ग्रामपंचायतीमार्फत त्या त्या तालुक्यातील गटविकास अधिकारी यांनी पूर्ण करुन घेणे बंधनकारक आहे. 20 कामांपैकी केवळ 3 कामे पूर्ण झाली आहेत.

2) कामे मुदतीत पूर्ण झाले नसतील तर वरील शासन निर्णयानुसार ग्रामपंचायतीला पुढील दोन वर्षाकरिता निधी देण्यात येऊ नये, असे स्पष्ट निर्देश आहेत. असे असतांना सन 2012-2013 व सन 2013-2014 चा निधी हा वित्तीय वर्ष 2014-2015 मध्ये देण्यात आलेला आहे. यामुळे योजनेचे उद्दिष्ट सफल होत नाही. त्यामुळे सन 2012-2013 व सन 2013-2014 मधील कामांची वितरित केलेली अनुदानांची रक्कम रुपये 29,42,208/- संबंधित ग्रामपंचायतींकडून वसुल करुन शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

**3.746 अनुदानित वसतिगृहांना स्वयंसेवी संस्थांना परिक्षण (परिपोषण) अनुदान पुरविणे व वसतीगृह कर्मचारी मानधन जादा प्रदान केलेबाबत.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** जिल्हा परिषद रत्नागिरीकडील समाजकल्याण विभागाने 31 वस्तिगृह कर्मचारी यांना मानधन व विद्यार्थी परिपोषण यांची एकूण रक्कम रुपये 2,23,57,000/- एवढा खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांचे परिपत्रक जावक क्रमांक सकआ/ शिक्षण/सा.ग्रहनिशा/व्यवस्थापन/2014-15/1181, दिनांक 03/05/2014 मधील अ.क्र. 4 नुसार बायोमॅट्रिकचे हजेरीपत्रक प्राप्त नसतांना नियमबाहयपणे प्रवेशितांची व कर्मचा-यांची परिपोषण रक्कम व कर्मचारी वेतन प्रदान केले आहे.

2) उक्त परिपत्रकातील अनु.क्र.20 नुसार नमुद लेखे रजिस्टर, तरतुद सादर करण्यात यावे. कर्मचारी हजेरीपट, प्रवेशित हजेरीपट, सेवापट रजिस्टर, कॅशबुक, बिल रजिस्टर, तरतुद वितरण नोंदवही, जडवस्तू संग्रह नोंदवही, मासिक पाळी रजिस्टर (मुलींच्याबाबत), ये जा हाजचाल नोंद रजिस्टर, कर्मचारी जॉब चार्ट नोंदवही 33 वसतिगृहांचे लेखे सादर करण्यात आलेले नाहीत.

3) उक्त परिपत्रकातील अनु.क्र. 8 नुसार भोजन ठेकेदार / स्वयंपाकी यांचे व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र व अन्न भेसळ प्रतिबंधक कायदे अंतर्गत परवाना घेतल्याची प्रमाणपत्रे नाहीत.

4) मागासवर्गीय विद्यार्थी वस्तिगृह देवळे, तालुका संगमेश्वर व विद्यार्थी वस्तिगृह धामणी, तालुका मंडणगड ही दोन वस्तिगृहे बंद असून सन 2013-2014 पासून सदर वस्तिगृहांवर हस्तांतरित व स्थलांतरित करणेबाबत किंवा शासनमान्यता रद्द करणेबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5) सदर कर्मचारी संस्थेचे व कंत्राटी कर्मचारी असून त्यांना वसतिगृह कालावधीत रक्कम अनुज्ञेय आहे. दिनांक 01/05/2014 ते  दिनांक 15/06/2014 पर्यंत वस्तिगृहास सुट्टी असल्याने या कालावधीत मानधन संबंधित कर्मचारी यांना अनुज्ञेय नाही. तसेच उन्हाळी, दिपावली सुट्टयांत मानधन अनुज्ञेय नसल्याने प्रदान रक्कमेची निश्चिती करुन वसूली करणे आवश्यक आहे.

6) उक्त परिपत्रकातील मधील अ.क्र.4 नुसार बायोमॅट्रिक मशिनचा पुरवठा करण्यात आला आहे. त्यानुसार बायोमॅट्रिक मशिन बसवून प्रवेशितांच्या हजेरीची नोंद ठेवण्यात यावी. त्यानुसार सकाळ / संध्याकाळ अशी दिवसातून दोनदा नोंद घेण्यात यावी. तथापि येथे सर्व ठिकाणी बायोमॅट्रिक मशिनचा पुरवठा केला असून देखिल बायोमॅट्रिक

मशिनची हजेरी न घेणे, ही बाब अत्यंत गंभिर असून येथे प्रवेशित व कर्मचारी यांची उपस्थिती नसतांना हजेरी नोंद केल्याची शक्यता नाकारता येत नाही. अनुपस्थित दिवसांची रक्कम निश्चित करुन वसूली करण्यात यावी.

7) कर्मचारी यांची नेमणूक संस्था कंत्राटी तत्वावर काम करत असल्याने त्यांना सेवा खंड दिलेला नाही. तसेच, माहे 1 मे ते 15 जून 2014 पर्यंत उन्हाळी सुट्टी कालावधीत (कंत्राटी) कर्मचा-यांना काम न करता व वसतिगृह बंद असतांना व प्रवेशित विद्यार्थ्यांना सुट्टया असतांना कर्मचारी वेतन नियमबाहयपणे प्रदान करण्यात आलेले आहे.

8) सदर कर्मचारी यांना बॅकेमार्फत रक्कम प्रदान करणेचे असतांना संबंधित संस्था यांचेकडे रक्कम वर्ग केली आहे. व संबंधितांना रोख रक्कमा दिल्या किंवा कसे ? याचे लेखा परिक्षण करता येत नाही. कर्मचारी यांना रक्कम दिल्याचे तारखेसह पोच पावत्या नाहीत. त्यामुळे खर्च रक्कम मान्य करता येत नाही.

9) उन्हाळी सुट्टी, दिपावली सुट्टी, गणपती सुट्टी इत्यादी कालावधी रजा देय असल्याचे व कामावर हजर नसतांना किंवा काम न करता कर्मचारी मानधनाची रक्कम प्रदान करणे बाबत शासन आदेश सादर करण्यात यावेत. याबाबत अर्धसमास पत्र क्र. 6 देण्यात आले आहे. तथापि कर्मचारी मानधनाची रक्कम उन्हाळी सुटटया व कर्मचारी कामावर गैरहजर असताना प्रदान करण्यात आलेली आहे. कंत्राटी कर्मचारी यांना कोणतीही रजा देय नाही. व सदर कर्मचारी कामावर गैरहजर असल्याने नियमबाहय प्रदान मानधन रक्कम मान्य करता येत नाही. त्याअन्वये 31 वसतिगृहांकडिल एकूण रक्कम रूपये 10,24,500/- वसूल करून भरणा करणे आवश्यक आहे.

10) संस्थांचे लेखा परिक्षण अहवाल न घेता नियमबाहयपणे अनुदानाच्या रक्कमा प्रदान करण्यात आल्या आहेत. व असल्यास ते सादर करावेत. तसेच शासन निर्णय स.क./सा.का. व क्रीडा विभाग क्रमांक बीसीएच1097/प्र.क्र.107,दिनांक 16/03/1998 नियमावली उपलब्ध केली नाही.

11) परिशिष्ठ क्रमांक 2 मधील अ.क्र.18 व 31 चे नमूद दोन वसतिगृहांना सन 2014-15 मध्ये अनुदान देण्यात आलेले नाही. अनुदान का देण्यात आले नाही ? याबाबत नोंदी ठेवण्यात आलेल्या नाहीत. वसतिगृह चालू असल्याबाबतचे कोणतेही लेखे नाहीत. म्हणजेच सदरचे वसतिगृह बंद असल्याने तशी नियमाप्रमाणे कोणतीही कार्यवाही केलेली नाही. जर लेखा परिक्षणात आक्षेप न निघाल्यास अशा खाजगी संस्थांचे वसतिगृहांना, कंत्राटी रक्कमा प्रदान करुन शकले असते. ही बाब गंभीर असून सदर वर्षात संस्थांना / वसतिगृहांना कोणतेही अनुदान देय नाही. तथापि यापुढे या संस्थांना अनुदानाचे रक्कमा प्रदान केल्यास ती निश्चित करुन वसूली करावी. याबाबत नियमाप्रमाणे योग्य ती चौकशी करुन त्याप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.

12) तसेच पोतकर विद्यामंदिर विद्यार्थी वसतिगृह, डोर्ले येथे माहे जानेवारी 2014 मध्ये अदा करण्यात आलेली जादा अनुदान रक्कम रुपये 69,420/- ची वसूली करावी. तसेच सर्व वसतिगृहांची जादा प्रदान रक्कम निश्चित करुन संबंधिताकडून वसूली करणे आवश्यक आहे. तसेच दिनांक 01/04/2014 ते 31/03/2015 या कालावधीचे सर्व वसतिगृहांचे बायोमॅट्रीक हजेरीपत्रक लेखापरीक्षणस उपलब्ध करुन देणेत आले नाहीत.

**3.747 दलित सुधारणा योजनेतील अनियमिततांबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** दलित सुधार योजनेचे सन 2014-2015 चे लेखे तपासले असता पुढील प्रमाणे अनियमितता आढळून आल्या.

1**)** शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक दवसु-2011/ प्र.क्र.442/अजाक, दिनांक 05/12/2011 परिशिष्ट अ नुसार सदर निधीचे वितरण सप्टेंबर महिन्यात करावयाचे असताना अनुदान माहे मार्च मध्ये वितरीत केलेले आहे.

2**)** वरील शासन निर्णया नुसार मंजुर कामाना 90 टक्के निधी गटस्तरावर गटविकास अधिका-यांना अदा करावयाचा असतांना सदरचे अनुदान ग्रामपंचायतींना 100 टक्के अदा करण्यात आले आहे. 90 टक्के निधी गटस्तरावर का वितरीत करणेत आला नाही?

3) 10 टक्के रक्कम समाजकल्याण अधिकारी यांनी पाहणी केल्यानंतर गटविकास अधिकारी यांना रक्कम अदा करावी. तसेच काम पूर्णत्वाचा दाखला घेऊन रक्कम वितरीत करावयाची असताना तशी कार्यवाही करणेत आलेली नाही.

**3.748 मागासवर्गीयांना जुने घर दुरुस्ती अर्थसहाय्य देणे योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** समाजकल्याण विभागाचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण केले असता 20 टक्के अनुदानातून मागासवर्गीयांना जुने घरदुरुस्तीसाठी रुपये 19,50,000/- अनुदान (अर्थसहाय्य) वितरीत केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेड पीए-2008/ प्र.क्र.444/वित्त-9,दिनांक 20/06/2008 परिशिष्ट क्र.3 इ मध्ये दर्शविल्याप्रमाणे विहीत कालावधीत लाभार्थ्यांना लाभ देणे आवश्यक आहे. तरी विभागाने गटस्तरावर वितरीत केलेले अनुदान प्रत्यक्ष लाभार्थींना वेळेत पोहोच झाले नाही. त्यामुळे योजनेचा मुळ उद्देश साध्य झाला नाही.

2) समाजकल्याण विभागाने लाभ दिलेल्या 78 लाभार्थ्यांपैकी किती लाभार्थ्यांचे जुने घर दुरुस्त केलेबाबत विभागाकडे माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे सदयस्थितीत 78 लाभार्थ्यांपैकी किती लाभार्थ्यांची जुने घरदुरुस्ती पूर्ण झाली व किती लाभार्थ्यांची घरे अपूर्ण आहेत याची खात्री करता आली नाही.

3) लाभार्थ्यांचे घर दुरुस्ती काम पूर्णत्वाचे दाखले लेखापरीक्षण तपासणीसाठी उपलब्ध झालेले नाहीत.

4) लाभार्थ्यांचे उपयोगिता प्रमाणपत्र व विनियोग दाखले लेखापरीक्षणाच्या तपासणीसाठी उपलब्ध झालेले नाहीत.

**3.749 जिल्हा परिषद सेस अनुदानातून 20 टक्के अनुदानाच्या समाज कल्याण योजनांच्या अंतर्गत दलित वस्ती सुधार योजनांतर्गत झालेल्या कामांच्या दुरुस्तीवर खर्च करणेबाबतची नियमबाहय योजना हाती घेतलेमुळे उपकराचा खर्च न झाल्याबाबत.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** समाजकल्याण विभागाचे सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात वर नमुद केल्याप्रमाणे योजनेवर खर्च न झाल्याचे दिसुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद सेस अनुदानातून समाज कल्याण विभागाच्या 20 टक्के अनुदानाच्या योजनातंर्गत जिल्हा परिषद सर्व साधारण सभा दिनांक 21/05/2014 अन्वये जिल्हा परिषद सेस सन 2013-2014 सुधारित व सन 2014-2015 अर्थसंकल्पास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी पत्र क्रमांक जिपना/अर्थ/अर्थसंकल्प/441/14,दिनांक 24/07/2014 अन्वये विभागांनी नमूद केलेप्रमाणे अंतिम करण्यात आलेला आहे. परंतू जिल्हा परिषद सर्व साधारण सभा दिनांक 20/08/2014 रोजी विषय क्रमांक 31, अन्वये दलितवस्ती सुधार योजनांतर्गत झालेल्या कामांवर दुरुस्ती करणे बाबत योजना हाती घेण्याकामी रक्कम रुपये 31,02,000/- इतक्या रक्कमेस मंजूरी दिलेली आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-100/प्र.क्र.73/34,दिनांक 20/10/1999 मधील परिच्छेद क्रमांक 1.2 नुसार सदरची योजना अनुसूचीत अंर्तभूत नसल्याने परिच्छेद क्रमांक 1.3 नुसार सदर योजनेचे तांत्रिक मान्यतेचे अधिकारी विभाग प्रमुख यांना असल्याने त्या अनुषंगाने सदर योजनेस तांत्रिक मान्यता प्राप्त करणेकामी पत्र क्रमांक जिपना/सकवि/योजना/1306 /2014, दिनांक 06/09/2014 रोजी मा. संचालक, समाज कल्याण विभाग, (महाराष्ट्र राज्य) पुणे यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला होता. सदर योजनेस तांत्रिक मंजूरी मा.संचालक, समाजकल्याण विभाग (महाराष्ट्र राज्य), पुणे यांचेकडून प्रदान केलेली दिसून येत नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेचे नियोजन आणि अंमलबजावणी नमूद वेळापत्रकानुसार केलेली नाही.

2) तांत्रिक मान्यता न मिळाल्याने सदर योजना रदद करुन त्याऐवजी सन 2014-2015 चे मुळ अंदाजपत्रकानुसार पुर्वीच्या 08 योजनेवर खर्च करण्यास सर्वसाधारण सभा दिनांक 30/12/2014 विषय क्रमांक 9, ठराव क्रमांक 579, अन्वये मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

3) सन 2014-2015 या वित्तीय वर्षात नियोजनबध्द योजना हाती न घेतल्यामुळे वेळे अभावी योजना राबविण्यात विलंब झालेला असल्याने 20 टक्के अनुदानाचा खर्च सन 2014-2015 मध्ये झालेला नाही. मागासवर्गीय लाभार्थ्यांना वैयक्तिक तसेच सामुहिक योजनांपासून वंचित रहावे लागले आहे.

**3.750 जिल्हा परिषद सेस अनुदानातून 3 टक्के अनुदानाच्या समाज कल्याण योजनांतर्गत अपंगाना स्वयंरोजगारासाठी 100 टक्के अनुदानावर झेरॉक्स मशिन पुरविणे योजनेसाठी अनुदान, प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्राप्त असतांना खर्च न करणेबाबत.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** समाजकल्याण विभागाचे सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात वर नमुद केल्याप्रमाणे योजनेवर खर्च न झाल्याचे दिसुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेचे नियोजन आणि अंमलबजावणी नमूद वेळापत्रकानुसार केलेली नाही.

2) जिल्हा परिषद सेस अनुदानातुन समाज कल्याण योजनांतर्गत 3 टक्के अनुदानाच्या योजनांतर्गत जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक 23/01/2014 अन्वये ठराव क्रमांक 88 नुसार अपंगाना 100 टक्के अनुदानावर स्वयंरोजगारासाठी झेरॉक्स मशिन पुरविणेकामी रक्कम रुपये 82,50,000/- रकमेच्या योजनेस मंजूरी दिलेली आहे. त्या अनुषंगाने सन 2014-2015 या वित्तीय वर्षात अंदाजपत्रकात तरतूद करण्यात येवुनही खर्च न करणेबाबत प्रयोजन विशद करावे. त्यामुळे सदर योजनेतील लाभार्थ्यांना वैयक्तिक लाभापासून वंचित रहावे लागले आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभागाकडील, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2012/ प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 19/03/2012 नुसार रुपये 50,00,001/- पेक्षा अधिक रक्कमेच्या योजनेस प्रशासकीय मान्यतेचे अधिकार जिल्हा परिषदेला आहे. तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक मागास-100/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील परिच्छेद 1.2 नुसार सदरची योजना यादीत अंर्तभूत नसल्याने परिच्छेद क्रमांक 1.3 नुसार तांत्रिक मान्यतेचे अधिकार मा. आयुक्त, अंपग कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य पुणे यांना असल्याने तांत्रिक मान्यता प्राप्त नसल्यामुळे सदरच्या योजनेवर सन 2014-2015 या वित्तीय वर्षात खर्च केलेला नाही. परंतु सदर योजनेस सन 2013-2014 या वित्तीय वर्षासाठी आयुक्त, यांचेकडील पत्र क्रमांक अकआ/प्र-7/सेस अनुदान/2013-14/4442, दिनांक 18/09/2013 अन्वये सन 2013-2014 या वित्तीय वर्षात तांत्रिक मान्यता प्रदान केलेबाबत दिसून येते त्यामुळे फक्त योजना मंजूरीसाठी विलंब करण्यात येवून खर्च करण्यास टाळाटाळ केल्याने अपंग लाभार्थ्यांना योजनेच्या लाभापासुन वंचित राहावे लागले आहे.

**3.751 समाजकल्याण विभागांतर्गत वस्तीगृह अनुदान निर्धारण प्रस्तावातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** समाजकल्याण विभागांतर्गत वस्तीगृहांना रुपये 5,30,45,773/- रुपये अनुदान वितरीत करण्यात आले असुन अनुदान निर्धारण प्रस्तावातील खर्चाची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, समाज कल्याण, सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्रक्र.107/मावक/4,दिनांक 16/03/1998 मधील जोडपत्र अ नुसार मार्गदर्शक सुचनेनुसार विदयार्थीनींसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था पुरेशी नाही, स्वच्छ़तागृह, स्नानगृहाची व्यवस्था अपुर्ण आहे. सोयीसुविधा अपुर्ण असल्याने दंडात्मक कार्यवाही केलेली नाही. सन 2014-15 या वर्षाचे सनदी लेखापालांचा अहवाल जोडण्यात आलेला

नाही. अहवालासोबत ताळेबंद व तेरीजपत्रक संलग्न नाही. औषधसाठा व धान्यसाठा ठेवण्यात आलेला आहे याबाबत समाज कल्याण निरीक्षक यांचे शेरे नाहीत. याबाबत विहित दंड आकारणी केलेली नाही.

आदर्श विदयार्थी छात्रालय वलवाडी, मंजुर मुलींपैकी 6 मुलींचे उत्पन्नाचे दाखले नसल्याने 6 मुली x रुपये 9,000 = 54,000/- संबंधित संस्थेकडुन वसुल करावी.

**3.752 इयत्ता 8 वी ते 10 वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय मुलींसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** समाजकल्याण विभागांतर्गत इयत्ता 8 वी ते 10 वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय मुलींसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीतील खर्चाची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक इ.बी.सी./2003/प्र.क्र.116/मावक-2,दिनांक 23/05/2003 अन्वये दरमहा रुपये 100/- प्रमाणे दहा महिने जुन ते मार्च या कालावधीसाठी शिष्यवृत्ती योजना सन 2003-04 या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात आलेली आहे.

1) उपरोक्त शासन निर्णयातील परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेप्रमाणे नियमावलीतील नियम 11 नुसार शिष्यवृत्ती वर्षातुन तिनदा म्हणजे जून व जुलै या महिन्यातील दिनांक 26 जुलै रोजी, सप्टेंबर या महिन्यासाठी 22 सप्टेंबर रोजी व आक्टोबर ते उर्वरित कालावधीसाठी 3 जानेवारी या ठरावीक दिवशीच सर्व राज्यात सर्व अनुसुचित जातीच्या मुलींना देण्यात यावी, असे नमुद असताना नमुद केलेल्या प्रमाणकावरुन मार्च महिन्यात अनुसुचित जातीच्या मुलींना सदर शिष्यवृत्तीचे वाटप केलेले आहे. त्यामुळे सन 2014-15 मध्ये 2013-14 च्या योजनेचा लाभ व 2014-15 च्या योजनेचा लाभ लाभार्थ्यास प्रदान केलेला आहे. सदर शिष्यवृत्ती उद्दीष्टानुसार लाभार्थ्यास प्रदान झालेली नाही. त्यामुळे योजनेची फलश्रृती झालेली नाही.

2) अनुक्रमांक 14 प्रमाणे नुतन हायस्कुल इंधवे, तालुका साक्री यांनी कु. मालती इंदास बेडसे, कु. पुनम राजेंद्र पानपाटील व कु. वीना शालीकराम इंडिस यांना प्रत्येकी 1,000/- प्रमाणे रक्कम प्रदान केलेली आहे. परंतु तिघांचा बँक खाते क्रमांक एकच दर्शविण्यात आलेला आहे. त्यामुळे संबंधित विदयार्थ्यांस रक्कम मिळाल्याबाबतची खात्री करता येत नाही.

3) अनुक्रमांक 11 प्रमाणे न्यु इंग्लिश हायस्कुल, पिंपळनेर, तालुका साक्री येथील 10 विदयार्थ्यांना रुपये 1,000/- प्रमाणे रुपये 10,000/- प्रदान केलेले आहेत. परंतु सर्व लाभार्थ्यांचे खाते सेंट्रल बँक ऑफ इंडिया, कासारे येथील नमुद आहेत. सदर विदयार्थी पिंपळनेर येथे शिकत असताना कासारे येथे बँक खाते क्रमांक नमुद केलेले आहेत. त्यामुळे सदर विदयार्थ्यांना रक्कम मिळाल्याबाबत खात्री करता येत नाही. तसेच कु. भारती भटु पानपाटील, कु. हर्षाली भटु पानपाटील, कु. काजल भटु पानपाटील सर्व इयत्ता 8 वी मध्ये शिकत असुन प्रत्येकी रुपये 1,000/- अदा केलेले आहेत. तरी सदर विदयार्थी वेगवेगळे असल्याबाबतची खात्री पटत नाही.

4) सदर योजनेचे 2013-14 चे शिल्लक अनुदान रुपये 33,00,000/- जिल्हा निधीत शिल्लक असून मार्च 2015 अखेर 31,95,000/- एवढा खर्च नोंदवलेला आहे. रक्कम रुपये 1,05,000/- एवढे सन 2013-14 चे अनुदान शिल्लक असताना समाज कल्याण विभागाने कोषागारातील प्रमाणक क्रमांक 218, दिनांक 29/01/2015 नुसार रक्कम रपये 10,00,000/- बी.डी.एस. व्दारे काढून जिल्हा निधीत जमा करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे. त्यामुळे जिल्हा परिषदेने शासनाचे अनुदान आवश्यक नसताना रक्कम काढुन शासन निधीचा अपव्यय केलेला दिसुन येतो.

5) इयत्ता 5 वी ते 7 वी चे 155 विदयार्थ्यांच्या बँक खात्यात (155 विदयार्थ्याचे रुपये 600/- प्रमाणे रक्कम रुपये 93,000/-) व इयत्ता 8 वी ते 10 च्या (5 विदयार्थ्यांचे 5,000/-) असे एकुण 98,000/- एवढी रक्कम मार्च 2016 अखेर जमा झालेली नाही. त्यामुळे सदर रक्कम बँक व्यवहाराबाहेर दिसुन येते.

**3.753 अस्वच्छ व्यवसायांत काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेतील रक्कम अदायगी मधील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** एकूण 56 मुलांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेतील रक्कम रुपये 1,03,600/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक इबीसी-2008/प्र.क्र.-62/भा व क-2, दिनांक 17/03/2009 ग्रामपंचायत क्षेत्रातील व्यक्तींनी ग्रामसेवक व सरपंच यांचा दाखला प्राप्त करुन प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

2) नगरपालिका क्षेत्रातील व्यक्तींनी नगर पालिका मुख्याधिकारी यांचा दाखला प्राप्त करुन प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

3) आणी महानगर पालिका क्षेत्रातील व्यक्तींनी आयुक्त / उपआयुक्त / प्रभारी अधिकारी यांचा दाखला प्राप्त करुन प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

परिपत्रकात नमुद केलेल्या अधिकाऱ्यां व्यतिरिक्त इतर अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र जोडलेले आहे. त्यामुळे सदर एकूण 56 विद्यार्थ्यांपैकी 51 विद्यार्थ्यांच्या बाबतीत शिष्यवृत्ती मंजुर करतांना शासन परिपत्रकातील निकषाचे उल्लंघन झालेले आहे.

**3.754 अस्वच्छ व्यवसाय करणारे कागद, काच उचलणारे सफाई कामगारांच्या मुलांना मॅट्रीक पुर्व शिष्यवृत्ती रक्कम रुपये 9,78,650/- चे मुळ प्रस्ताव लेखापरिक्षणास सादर न करणे बाबतची अनियमितता.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** मुलांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेतील 56 शाळा मार्फत 529 विद्यार्थ्यांच्या पालकांना प्रति विद्यार्थी रुपये 1,850/- प्रमाणे रक्कम रुपये 9,78,650/- इतका खर्च केला आहे. सदर शिष्यवृत्तीच्या विद्यार्थ्याचा मुळ प्रस्ताव व त्यासंबंधीचे मुळ अभिलेख आणी त्यासंबंधिच्या नोंदवह्या असे संपुर्ण दफ्तर लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यांत आलेले नाही. त्यामुळे सदर बाबींवर झालेल्या खर्चाची सत्यता व अचुकता लेखापरिक्षणात पळताळता आली नाही.

**3.755 समाज कल्याण विभाग 20 टक्के सेस अंतर्गत सन-2014-15 मध्ये मागासवर्गीयांना सौरकंदिल खरेदीमधील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** सौरकंदिल खरेदीसाठी रक्कम रुपये 22,98,900/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद नंदुरबार यांचे दिनांक 30/08/2014 चे पुरवठा आदेशात नमुद केल्याप्रमाणे सौर कंदिल पुरवठा झाल्यानंतर 90 टक्के रक्कमेचे प्रदान व गुणवत्ता तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर 10 टक्के रक्कमेचे प्रदान करणे आवश्यक आहे. सदर वस्तु सौर कंदिलांचा पुरवठा 10/09/2014 रोजी करण्यात आलेला असुन त्याच सोबत 30/07/2013 रोजीचा तपासणी अहवाल जोडलेला आहे व त्यावरुन समाज कल्याण विभागाने 100 टक्के रक्कमेचे प्रदान केलेले आहे. संबंधित पुरवठादार संस्थेकडुन तपासणी अहवाल दिलेला आहे तो अहवाल 30/07/2013 राजीचा आहे म्हणजेच तपासणी अहवाल हा जवळ जवळ 8 ते 9 महिने अगोदरचा आहे.

2) विभागाकडुन विद्यार्थ्यांचे मुळ प्रस्ताव तपासणीसाठी लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही.

3) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 च्या नियमातील तरतुदी नुसार संबंधीत पुरवठादाराकडुन एकुण रक्कमेवर 5 टक्के सुरक्षा अनामत घेणे आवश्यक असतांना रुपये 22,98,900/- एवढया रक्कमेवर सुरक्षा अनामत रक्कम रुपये 1,14,945/- घेण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2009/प्र.क्र.514/वित्त-9, दिनांक 20/11/2009 मध्ये नमुद केल्याप्रमाणे रुपये 2,400/- एवढया रक्कमेच्या स्टॅम्प् पेपरवर करारनामा करणे आवश्यक असतांना करारनामा केलेला नाही.

5) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक बीडीजी-2005/प्र.क्र-324/ इमारती-2,दिनांक 03/03/2006 व आता सुधारीत शासन निर्णयानुसार एकूण रक्कमेच्या 5 टक्के मुल्यवर्धीत कर व आयकर 2.06 टक्के वसुल करणे आवश्य्क असतांना संबंधीत पुरवठादार संस्थेकडुन मुल्यवर्धीत कर रक्क्म रुपये 1,14,945/- आणी आयकर रक्कम रुपये 47,357/- अशी एकुण रक्कम रुपये 1,62,302/- संबंधीत पुरवठादार संस्थेकडुन त्वरीत वसुल करुन जिल्हा परिषदेच्या सेस फंडामध्ये जमा करण्यात यावी.

6) सदरचे सौरकंदिल आज सुस्थित असुन सुरु आहेत व त्यापासुन संबंधित लाभार्थ्यांना आवश्यक तो फायदा होत आहे किंवा नाही या बाबत क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडुन अहवाल प्राप्त करुन लेखापरिक्षणास सादर करणे आवश्यक आहे.

**3.756 वसतिगृहात विद्यार्थी हजर नसतांना अनुदान प्रदान केले बाबत.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2,4,5,8,9,10,11) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

| अ.क्र. | वसतिगृहाचे नांव | गैरहजर विद्यार्थी संख्या | वसूलपात्र रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | हरिप्रसाद महाराज समिश्र वसतिगृह शेंदुर्णी, ता.जामनेर.(परिच्छेद क्रमांक 2) | 10 | 50,926/- |
| 2 | कै.श्रीम.गजराबाई उर्फ काळीसो माधवराव पवार विद्यार्थी वसतिगृह, नगरदेवळा. (परिच्छेक क्रमांक 4) | 10 | 28,130/- |
| 3 | वसंतराव फुलचंद नाईक दलित वसतिगृह, वरखेडी, ता.पाचोरा. (परिच्छेद क्रमांक 5) | 06 | 7,256/- |
| 4 | सरस्वती विद्याप्रसारक मंडळ संचलित कै.बाबुराव भाऊजी पाटील मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, सतखेडा. (परिच्छेद क्रमांक 8) | 16 | 17,679/- |
| 5 | किसान बॅकवर्ड छात्रालय, तामसवाडी, ता.पारोळा (परिच्छेद क्रमांक 9) | 14 | 15,622/- |
| 6 | जवाहरलाल नेहरू दलित वसतिगृह, पाळधी, ता.जामनेर. (परिच्छेद क्रमांक 10) | 04 | 4,317/- |
| 7 | दलित मित्र बापूजी दिवाण चव्हाण विद्यार्थी वसतिगृह चाळीसगांव. (परिच्छेद क्रमांक 11) | 07 | 12,600/- |

वसतीगृहातील एकूण 67 विद्यार्थी नमुद महीन्यात गैरहजर असल्याने संबधित विद्यार्थ्यांना रुपये 1,36,530/- जादा अदा करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन, समाज कल्याण / सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्र.क./107/मावक-4, दिनांक 16/03/1998 जोडपत्र अ मधील 7 (2) नुसार संबधित विद्यार्थ्यांना देय नसतांना रुपये 50,926/- इतके अनुदान अदा करण्यात आले आहे.

**3.757 20 टक्के सेस फंडातुन मागासवर्गीय भजनी किर्तन करणा-या भजनी मंडळास साहित्य पुरविणे.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदर योजनेवर प्रमाणक क्रमांक 507,दिनांक 31/03/2015 अन्वये रक्कम रुपये 11,95,954/- एकूण 46 लाभार्थ्यांना प्रति लाभार्थी रुपये 25,999/- प्रमाणे खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/ प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1994 मधील परिच्छेंद क्रमांक 4 प्रमाणे मागासवर्गीय जाती व गावनिहाय यादया तयार करणे व लाभार्थ्यास वैयक्तिक लाभ साहित्य दिल्यानंतर त्याची नोंद त्या नोंदवहीत करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे एकाच लाभार्थ्यास दोनदा /दुबार लाभ दिला गेला नसल्याची पूर्ण खात्री लेखा परीक्षणात करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्राक क्रमांक झेडपीए-2006/प्र.क्र.446/वित्त 9,दिनांक 20/6/2008 नुसार योजनेची निवड प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, लाभार्थी निवड, निविदा प्रक्रिया ,साहित्य वाटप व प्रदान इत्यादी बाबीसाठी विहीत दिनांक निहाय वेळापत्रक ठरवून दिलेले आहे. सदर वेळापत्रकाचे पालन झालेचे दिसून येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1093/ प्र.क्र.1239/34, दिनांक 1/9/1993 अन्वये ज्या वर्षात साहित्य खरेदी केले त्याच आर्थिक वर्षात साहित्य वाटप करणे बंधनकारक आहे. तथापि, विभागाने सन 2014-2015 या वित्तीय वर्षात खरेदी केलेले साहित्य सन 2015-2016 या आर्थिक वर्षात वाटप केल्याचे बहुतांशी सर्व पंचायत समिती कडील साठा नोंदवहीवरुन दिसून येते. त्यामुळे वरील नियमांचे पालन झालेले नाही. नियमबाहयतेस सक्षम प्राधिका-यांची मंजूरी प्राप्त होणे आवश्यक आहे.

4) पंचायत समितीनिहाय आढावा घेतला असता या अहवाला सोबतच्या परिशिष्टानुसार 3 भजनी मंडळ साहित्य लेखा परीक्षण पावेतो पंचायत समिती स्तरावरुन शिल्लक असल्याचे दिसून आले. म्हणजेच 3X नग रुपये 25,999 = रुपये 77,997/- लेखा परीक्षण पावेतो विनावापर गुंतुन पडलेले आहेत.तरी याबाबत वेळीच नियमाप्रमाणे वाटप का करण्यात आले नाही याचा खुलासा सादर होणे आवश्यक आहे.

5) तालुकास्तरावरील साठा नोंदवही तपासली असता नोंदवहीत सर्व रकाने भरण्यात येत नाहीत. साहित्य वाटपाची तारीख नमुद नाही तसेच ज्यांनी साहित्य दिले त्यांची विहीत नमुन्यात स्वाक्षरी नाही. ज्या लाभार्थ्यांचे अंगठयाचे ठसे आहेत त्यांना दस्तुर लावलेला नाही.

### 3.758 मागासवर्गीय मुलींना लेडीज सायकल पुरवीणे (5 वी ते 10 वी)

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदर योजनेवर प्रमाणक क्रमांक 656, दिनांक 31/03/2015 अन्वये रक्कम रुपये 49,98,150/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट शासन, ग्रामविकास विभाग परिपत्रक क्रमांक मागास/1089/प्र.क्र.555/34, दिनांक 05/10/1989 अन्वये जातनिहाय व गावनिहाय नोंदवही तयार केलेली नाही. त्यामुळे एकाच कुटुंबातील एकाच व्यक्तीला दुबार लाभ दिला किंवा कसे याची खात्री करता येत नाही.

2) सदर खरेदी ही मार्च 2015 मध्ये केलेली असून प्रत्येक पुरवठा 30 मार्च पर्यत करण्यात आलेला आहे व प्रत्येक लाभार्थीस सदर लाभ दिनांक 31/03/2015 ला दिलेला आहे. शासन परिपत्रक मागास/1091/प्र.क्र.व921/34, दिनांक 31/07/1991 नुसार योजनेचा कार्यक्रम माहे एप्रिल ते सप्टेंबर अखेर असून त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

3) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील परिच्छेद क्रमांक 1.5 प्रमाणे लाभार्थी निवड ही ग्रामसभेत केल्याबाबत तसा ठराव आढळुन आला नाही.

4) इयत्ता 10 वी मध्ये शिकत असलेल्या विदयार्थ्यांकरीता सदर लाभ हा इयत्ता 10 वी ची परीक्षा झाल्यानंतर मिळाल्याने योजनेचे अटींचे पालन झाले नाही. अशा लाभार्थींवरील खर्च वसुल करणत यावा.

5) अर्धसमास पत्र क्रमांक 1, दिनांक 21/4/2016 ने मागणी करुनही मंजूर लाभार्थी यादी प्राप्त झाली नाही.

6) लेखा परीक्षण कालावधी पर्यंत 1,450 पैकी 1,374 सायकली वाटप झालेल्या असून 76 सायकली वाटप होणे बाकी आहे. सदर विलंबाबाबत संबंधितांकडुन समर्पक खुलासा प्राप्त करून जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. शिल्लक साहित्य वाटप करुन विनियोग दाखले प्राप्त करुन पुर्तता होणे आवश्यक आहे.

7) पंचायत समितीने सायकली प्राप्त झाल्याची पोहोच ही दिनांकासह न दिल्याने पुरवठा विहीत मुदतीत झाला हे स्पष्ट होत नाही. तरी याबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

**3.759 मागासवर्गीय मुलांना सायकल पुरवीणे (5 वी ते 10 वी)**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदर योजनेवर प्रमाणक क्रमांक 653,दिनांक 31/03/2015 अन्वये रक्कम रुपये 49,97,601/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक मागास/1089/प्र.क्र.555/34, दिनांक 05/10/1989 अन्वये जिल्हा परिषदेने प्रपत्र-अ जातनिहाय व गावनिहाय नोंदवही तयार केलेली नाही. व लाभ दिलेल्या साहित्याचा तपशिल नमुद केलेला नाही. त्यामुळे एकाच कुटुंबातील एकाच व्यक्तीला दुबार लाभ मिळाले किंवा कसे याची खात्री करता आली नाही.

2) सदर खरेदी ही मार्च 2015 मध्ये आहे. प्रत्येक पुरवठा 30 मार्च पर्यत करण्यात आलेला आहे व प्रत्येक लाभार्थीस सदर लाभ दिनांक 31/03/2015 ला दिलेला आहे. शासन परिपत्रक मागास/1091/प्र.क्र.व921/34, दिनांक 31/07/1991 नुसार योजनेचा कार्यक्रम माहे एप्रिल ते सप्टेंबर अखेर असून त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक मागास-1098/ प्र.क्र.73/34,दिनांक 20/10/1999 मधील परि.क्र.1.5 प्रमाणे लाभार्थी निवड ही ग्रामसभेतुन केल्याबाबत ठराव आढळुन आला नाही.

4) इयत्ता 10 वी मध्ये शिकत असलेल्या विदयार्थ्यांनां सदर लाभ इयत्ता 10 वी ची परीक्षा झाल्यानंतर मिळाल्याने योजनेचे अटींचे पालन झाले नाही. अशा लाभार्थीवरील खर्च वसुल करण्यात यावा.

5) अर्धसमास पत्र क्रमाक 1,दिनांक 21/4/2016 ने मागणी करुनही मंजूर लाभार्थी यादी प्राप्त झाली नाही.

6) पंचायत समितीने सायकली प्राप्त झाल्याची पोहोच दिनांकासह न दिल्याने पुरवठा विहीत मुदतीत झाला हे स्पष्ट होत नाही. तरी याबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

**3.760 २० टक्के सेस फंडातील योजनेतून मागासवर्गीय महिलांना पिको फॉल मशीन पुरविणे.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदर योजनेवर प्रमाणक क्रमांक 506, दिनांक 31/03/2015 अन्वये रक्कम रुपये 29,99,928/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/34,दिनांक 20/10/1994 मधील परि.क्र.4 प्रमाणे मागासवर्गीय जाती व गावनिहाय यादया तयार केल्या पाहिजेत व लाभार्थ्यास वैयक्तीक लाभ साहित्य दिल्यानंतर त्याची नोंद त्या नोंदवहीत केली पाहिजे अशी तरतुद असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-2006/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/6/2008 नुसार योजनेची निवड प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, लाभार्थी निवड, निविदा प्रक्रिया, साहित्य वाटप व प्रदान इत्यादी बाबीसाठी विहीत दिनांक निहाय वेळापत्रक ठरवून दिलेले आहे. सदर वेळापत्रकाचे पालन झालेचे दिसून येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1093/ प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 अन्वये ज्या वर्षात साहित्य खरेदी केले त्याच आर्थिक वर्षात साहित्य वाटप करणे बंधनकारक आहे. तथापि विभागाने सन 2014-2015 या वित्तिय वर्षात खरेदी केलेले साहित्य सन 2015-

2016 या आर्थिक वर्षात वाटप केल्याचे बहुतांशी सर्व पंचायत समिती कडील साठा नोंदवहीवरुन दिसून येते. त्यामुळे वरील नियमांचे पालन झाले नाही. नियमबाहयतेस सक्षम प्राधिका-यांची मंजूरी प्राप्त होणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/ प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 नुसार गटविकास अधिकारी / सक्षम अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन लाभार्थ्यांच्या आर्थिक परिस्थितीत काय सुधारणा झाली, तसा अहवाल सादर करणे आवश्यक आहे. तथापि, तसा अहवाल दप्तरी नसल्याने योजनेचे उदिदष्ट साध्य झाले असल्याची पडताळणी करता आली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83 (3) आणि आयुक्त, पुणे यांचे पत्र क्रमांक सीपीएसपी.एस.आ.नी/117/गुणी-5, दिनांक 23/8/2004 नुसार शासकीय प्रयोगशाळेकडून साहित्य विहित मापदंडात असल्या बाबतची चाचणी अहवाल प्राप्त करणे आवश्यक आहे. तथापि तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

6) पंचायत समिती निहाय आढावा घेतला असता अहवालासोबत जोडलेल्या परिशिष्टा प्रमाणे 20 नग पिकोफॉल मशिन लेखा परीक्षणा पावेतो पंचायत समिती स्तरावरुन पडुन आहेत. म्हणजेच 20 नग X रुपये 6276 = रुपये 1,25,520/- लेखा परीक्षणपावेतो विनावापर गुंतुन पडलेले आहेत. तरी याबाबत वेळीच नियमाप्रमाणे वाटप का करण्यात आले नाही?

**3.761 20 टक्के सेस फंडातुन मागासवर्गीय शेतक-यांना इलेक्ट्रीक मोटार पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदर योजनेवर प्रमाणक क्रमांक 599, दिनांक 31/03/2015 अन्वये रक्कम रुपये 50,00,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1093/ प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 आणि मागास-1098/प्र.क्र.79/34, दिनांक 20/10/1999 मधील तरतुदींनुसार मागासवर्गीयांसाठी असलेल्या शासकीय अनुदान प्राप्त योजनांवर जिल्हा परिषदेने स्वत: उत्पन्नातुन खर्च करु नये, असे स्पष्ट आदेश असतांनाही (प्रस्तृत योजना कृषी विभागा मार्फत राबविली जात असूनही) समाजकल्याण विभाग आदेश बाहय समांतर योजना राबवून सदर योजनेवर खर्च केलेला आहे.

2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/ प्र.क्र.79/34, दिनांक 20/10/1999 मधील परि.4 प्रमाणे मागासवर्गीय जाती व गावनिहाय यादया तयार केल्या पाहिजेत. लाभार्थ्यास वैयक्तिक लाभ/साहित्य दिल्यानंतर त्याची नोंद त्या नोंदवहीत केली पाहिजे अशी तरतुद असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-2006/ प्र.क्र.446/वित्त 9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेची निवड प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, लाभार्थी निवड, निविदा प्रक्रिया, साहित्य वाटप व प्रदान इत्यादी बाबीसाठी विहीत दिनांक निहाय वेळापत्रक ठरवून दिलेले आहे. सदर वेळापत्रकाचे पालन झालेचे दिसून येत नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1093/ प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 अन्वये ज्या वर्षात साहित्य खरेदी केले त्याच आर्थिक वर्षात साहित्य वाटप करणे बंधनकारक आहे. तथापि, विभागाने सन 2014-2015 या वित्तीय वर्षात खरेदी केलेले साहित्य सन 2015-2016 या आर्थिक वर्षात वाटप केल्याचे बहुतांशी सर्व पंचायत समिती कडीलसाठा नोंदवहीवरुन दिसून येते. त्यामुळे वरील नियमांचे पालन झालेले नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/ प्र.क्र.79/34, दिनांक 20/10/1999 मधील तरतुदींनुसार गटविकास अधिकारी / सक्षम अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन लाभार्थ्यांच्या आर्थीक परिस्थितीत काय सुधारणा झाली तसा अहवाल सादर करणे आवश्यक आहे. तथापि, तसा अहवाल दप्तरी नसल्याने योजनेचे उदिदष्ट साध्य झाले असल्याची पडताळणी करता आली नाही.

6) आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक सीपीएसपीएसआर/117/गुनी-5, दिनांक 23/08/2004 मधील परिच्छेद 6 नुसार जिल्हा परिषदेने महाराष्ट्र राज्य, लघुउदयोग महामंडळ यांचे दरसुचीतील दर व खुल्या बाजारातील दर व दर्जा यांची तुलना करुन दरसुचीतील दर हे कमी असल्याची खात्री करणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. असे असतांनाही विभागाने सदर महामंडळाचे दरसुचीला दरकरार समजून खुल्या बाजारातील दराची तुलना केलेली नाही, ही बाब नियमबाहय आहे.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83 (3) आणि आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक सीपीएसपीएसआर/117/गुनी-5 दिनांक 23/08/2004 नुसार शासकीय प्रयोग शाळेकडुन साहित्य विहीत मापदंडात असल्या बाबतची चाचणी अहवाल प्राप्त करणे आवश्यक आहे. तथापि, अशा प्रकारे विभागाने चाचणी अहवाल प्राप्त न केल्याने वापरलेले साहित्य विहित केलेल्या मापदंडात असल्याची लेखा परीक्षणात पडताळणी करता आली नाही.

8) पंचायत समितीनिहाय आढावा घेतला असता या अहवाला सोबतच्या परिशिष्ठ/ विवरणपत्राप्रमाणे 11 नग इलेक्ट्रीक मोटार लेखा परीक्षणापावतो पंचायतसमिती स्तरावर पडुन आहेत. म्हणजेच 11X नग रुपये 20,000 = 2,20,000/- लेखा परीक्षणपावेतो विनावापर गुंतून पडलेले आहेत. तरी याबाबत वेळीच नियमाप्रमाणे वाटप का करण्यात आले नाही याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

9) तालुका स्तरावरील साठा नोंदवही तपासली असता नोंदवहीत सर्व रकाने भरण्यात येत नाहीत. साहित्य दिले वाटपाची तारीख नमुद करण्यात आली नाही. ज्यांनी साहित्य दिले त्यांची विहीत नमुन्यात स्वाक्षरी नाही. ज्या लाभार्थ्यांचे अंगठयाचे ठसे आहेत त्यांना दस्तुर लावलेला नाही.

**3.762 मागासवर्गीय वसतीगृहांना सहाय्यक अनुदान वितरणातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** समाजकल्याण विभागाने सन 2014-15 मध्ये शासन निधीमधुन रक्कम रुपये 4,44,30,334/- मागासवर्गीय वसतीगृहांना सहाय्यक अनुदान वितरीत केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) समाजकल्याण विभागाने सन 2013-14 मधील अखर्चित रक्कम रुपये 2,47,54,198/- व सन 2014-15 करीता प्राप्त अनुदान रक्कम रुपये 3,34,16,000/- अशी एकूण रक्कम रुपये 5,81,70,198/- मधुन रक्कम रुपये 4,44,30,334/- जिल्ह्यातील मान्यताप्राप्त मागासवर्गीय अनुदानीत वस्तीगृहांना परिपोषन अनुदान,इमारतभाडे,कर्मचारी मानधन अदा करतांना महाराष्ट्र शासन समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक विसीएच-1097/प्र.क्र100/माकव-4 मुंबई,दिनांक 23/11/2007 अन्वये मंजूर केलेल्या प्रवेशितांच्या टक्केवारी मध्ये शासकीय वसतीगृहातील मागासवर्गीय मुलामुलींच्या जिल्हानिहाय टक्केवारीप्रमाणे परिशिष्ठ “अ” मध्ये दर्शविल्या प्रमाणे अनुदानित वसतीगृहांसाठी जिल्हानिहाय सुधारित टक्केवारीत वसतीगृहातील मुलामुलींना प्रवेश बाबत कार्यवाही करावी असे असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक विसीएच-1097/प्र.क्र.100/माकव-4 मुंबई,दिनांक 16/03/1998 अन्वये अनुदान मागणी प्रस्तावा सोबत सेवाभावी संस्थांनी चालविलेल्या वसतीगृहाच्या जमा-खर्चाचे लेखे सनदी लेखापालच्या लेखापरीक्षण अहवाल प्रत्येक वर्षी ऑक्टोबर अखेर पर्यंत प्राप्त करून घ्यावेत व संस्थांनी विहित मुदतीत अहवाल सादर न केल्यास एकूण देय अनुदानाच्या 5 टक्के रक्कम कपात करण्याच्या दंडात्मक कार्यवाहीस संस्था पात्र राहील असे असताना, अनुदान निर्धारणाचे मागणी प्रस्ताव तपासणीसाठी प्राप्त झाले नाहीत.

3) निवडक वसतीगृहाच्या दप्तराची तपासणी केली असता त्या बाबत खालील अभिप्राय आहेत. सेवाभावी संस्थांनी चालविलेल्या वसतीगृहांनी नोंदवहया ठेवलेल्या आहेत. परंतु महाराष्ट्र शासन समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक विसीएच-1097/प्र.क्र.100/माकव-5 मुंबई, दिनांक 16/03/1998 अन्वये विहित केलेल्या नमुन्यात नोंदवहया ठेवणे आवश्यक असताना वसतीगृहांनी विहित नमुन्यात लेखे ठेवलेले नाहीत.

4) सेवाभावी संस्थांनी चालविलेल्या वसतिगृहांनी नोंदवहया ठेवलेल्या आहेत परंतु त्या प्रमाणित केलेल्या नाहीत.

5) महाराष्ट्र शासन समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक विसीएच-1097/प्र.क्र.100/माकव-4 मुंबई दिनांक 16 मार्च 1998 अन्वये सेवाभावी संस्था चालवीत असलेल्या वसतीगृहांनी विहित मुदतीत अनुदान मागणी प्रस्ताव सादर करणे आवश्यक असताना 4 वसतीगृहांनी जिल्हा परिषदेकडे उशिरा अनुदान मागणी प्रस्ताव सादर केलेला आहे.

**3.763 मागसवर्गीय वस्तीत 20 टक्के निधीतून समाजमंदीर बांधणे, जोडरस्ते करणे व शौचालय बांधणे या कामावर झालेल्या खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, सातारा यांनी 20 टक्के समाजकल्याण निधीतून मागासवर्गीय वस्तीत समाजमंदीर बांधणे, जोडरस्ता करणे व शौचालय बांधकामावर रुपये 1,81,12,360/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एकूण कामापैकी 55 कामे अद्याप अपुर्ण आहेत त्यामुळे महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक 20/10/1999 व दिनांक 20/5/2001 अनुसार योजनेची प्रभावी अंमलबजावणी झाली नाही.

2) उपरोक्त शासन निर्णयानुसार लाभ घेणाऱ्या सर्व गावांची यादी तयार केली नाही. त्यामुळे उतरत्या क्रमाने निवड केल्याची पुर्तता दाखवणे आवश्यक आहे.

3) शासन निर्णयात नमूद केल्यानुसार जिल्हा परिषद व पंचायत समितीने गावनिहाय उद्दीष्ट पूर्ण करण्याबाबत योग्य ते नियोजन करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक द व सु-2011/प्र.क्र.442/अजाक मुंबई,दिनांक 05/12/2011 अनुसार मंजूर कामे एका वर्षाच्या आत पुर्ण करणे आवश्यक असतांना सलग दोन वर्षापासून कामे अपुर्ण आहेत.

**3.764 यशवंत घरकुल योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, सातारा यांनी यशवंत घरकुल योजनेकरीता रक्कम रुपये 17906000/- एवढे अनुदान वितरीत केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक 20/10/1999 अनुसार त्या त्या वर्षात अनुदान खर्च करणे आवश्यक असतांना रक्कम रुपये 1,84,000/- एवढे अनुदान शिल्लक आहे. पंचायत समितींनी उद्दीष्टाप्रमाणे खर्च केला किंवा कसे याबाबत विभागाने आढावा घेतलेला नाही.

2) शासन निर्णय दिनांक 20/04/2001 मधील मुद्दा क्रमांक 2 मध्ये नमूद केल्याप्रमाणे समाजकल्याण समितीने लाभार्थी निवडीस प्रसिध्दी देऊन त्यास सुचना व आक्षेप मागवून त्याचा विचार करुन अंतिम यादीस सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि तशी कार्यवाही केली नाही.

3) मंजूर लाभार्थ्यांचे प्रस्ताव ठेवलेले नाहीत.

4) शासन निर्णयामधील मुद्दा क्रमांक 4 अन्वये विहीत प्रपत्रातील लाभार्थ्यांची नोंदवही ठेवली नाही.

5) प्रशासकीय मान्यतामधील मुद्दा क्रमांक 5 व 6 अनुसार उपअभियंता यांनी पारीत केलेल्या आराखडयानुसार बांधकाम व शौचालय बांधणे बंधनकारक आहे. तथापि त्याबाबत शासन निर्णयानुसार योजना प्रभावी राबविल्याचे दिसत नाही. मोजमाप पुस्तक व 8अ उतारेवरुन खात्री न करता अनुदान वाटप केले आहे. तसेच मुद्दा क्रमांक 12 प्रमाणे तांत्रिक मान्यता घेतली नाही. मुद्दा क्रमांक 11 नुसार गटविकास अधिकारी यांचेकडून दरमहा मासिक प्रगती अहवाल प्राप्त झाले नाहीत.

**3.765 अपंग कल्याण कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद 3 टक्के अपंग निधीतून अपंग लाभार्थींना घरकुल अनुदान वाटपाबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 25) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, सातारा यांनी 74 लाभार्थींना रक्कम रुपये 67000/- प्रमाणे व एका लाभार्थ्याला रुपये 42,000/- असे एकूण रक्कम रुपये 50,00,000/- एवढे अनुदान वितरण केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर कामास प्रशासकीय मान्यता व लाभार्थी निवड मंजूरी एकाच वेळी माहे मार्च 2015 मध्ये केलेली आहे.

2) समाजकल्याण विभागाने तालुका व गावनिहाय अपंग लाभार्थी यादी तयार करणे आवश्यक होते. तथापि तशी यादी व नोंदवही तयार केलेली नाही.

3) शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 अनुसार विशिष्ट मुदतीत न करता योजनेची अंमलबजावणी विलंबाने केलेली आहे.

4) प्रशासकीय मंजूरीतील अट क्रमांक 11 अनुसार सर्व गटविकास अधिकारी यांनी दरमहा प्रगती अहवाल पाठवावा असे सुचित केले आहे. तथापि तशी कार्यवाही केली नाही. पुर्ण/अपुर्ण कामे व अहवालाची पुर्तता करणे आवश्यक आहे.

5) प्रशासकीय मान्यता आदेशातील अट क्रमांक 5 अनुसार उपअभियंता यांनी मंजूर केलेला आराखडा व अंदाजपत्रकानुसार घरकुल बांधकाम करणे आवश्यक आहे. अट क्रमांक 12 नुसार त्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजूरी घेण्यात यावी असे आदेश आहेत. तथापि तशी कार्यवाही केली नाही.

6) प्रशासकीय मान्यतेमधील अट क्रमांक 8 नुसार काम पुर्णत्वाचा दाखला, घरकुलाचा फोटो, उपयोगिता प्रमाणपत्र इत्यादी पुर्तता करणे आवश्यक आहे.

7) विभागाने पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करून त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक असतांना मंजूर लाभार्थी व्यतिरिक्त प्रस्ताव पंचायत समितीकडे परत पाठविले आहेत.

8) संबंधित घरकुलाच्या मोजमाप पुस्तिका बाबत पुर्तता दाखविणे आवश्यक आहे.

9) लाभार्थी मास्टर नोंदवही अद्यावत ठेवणे आवश्यक आहे.

10) योजनेचा निधी खर्ची टाकण्याचे उद्देशाने अनुदान वितरण केले असून त्याबाबत कोणताही आढावा घेतलेला नाही. यामध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे.

**3.766 आंतरजातीय विवाहीत जोडप्यांना केलेल्या अर्थसहाय्याबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 27) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, सातारा यांनी आंतरजातीय विवाहीत जोडप्यांना अर्थसहाय्य म्हणून केंद्र हिस्सा रुपये 25,90,000/- व राज्य हिस्सा रक्कम रुपये 20,40,000/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक युटीएल-1099/प्र.क्र.45/मबाक2,दिनांक 31/01/1999 मधील अ.क्र. 12 अनुसार सप्टेंबर व मार्च अखेर वाटप अर्थसहाय्याबाबत अहवाल संचालक, समाजकल्याण यांचेकडे पाठविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

2) समाजकल्याण विभाग सुधारीत शासन निर्णयदिनांक 01/02/2010 नुसार करावयाचे अर्थसहाय्य रक्कम रुपये 50,000/- पती-पत्नीच्या संयुक्त नावे धनादेशाद्वारे दिलेबाबत स्थळप्रती व स्क्रोल पहावयास मिळाले नाहीत.

3) अर्थसहाय्य वाटप करताना 50 टक्के राज्य हिस्सा व 50 टक्के केंद्र हिस्सा प्रमाणे वाटप करावयाचे असतांना प्रमाणक क्रमांक 98,दिनांक 25/11/2014 अन्वये रक्कम रुपये 5,50,000/- शिल्लक अनुदानातून सहाय्य केले असून राज्य हिस्सा खर्च केला नाही.

**3.767 इयत्ता 5 वी ते 7 वी मध्ये माध्यमिक शिक्षण घेणा-या अनुसुचित जातीतील मुले / मुलींना गुणवत्ता शिष्यवृत्ती वाटपाबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** इयत्ता 5 वी ते 7 वी मध्ये माध्यमिक शिक्षण घेणा-या अनुसूचित जातीतील मुले/मुलींना गुणवत्ता शिष्यवृत्ती रक्कम रुपये 7,20,000/- वाटप केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम क्रमांक 244 अन्वये नमुना नंबर 10 मध्ये शासकीय अनुदानाची नोंदवही ठेवलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 परिशिष्ठ क्रमांक 4 नियम क्रमांक 42 अन्वये नमुना नंबर एपीपी 6 मध्ये सहाय्यक अनुदानाची नोंदवही ठेवलेली नाही.

3) तासगाव तालुक्यातील प्रस्तावांची तपासणी केली असता समाजकल्याण निरीक्षक यांनी प्रस्तावांची छाननी केलेली नाही. तसेच मंजूर प्रस्तावाबाबत मा.जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांची मान्यता घेवुन तसा आदेश संबंधित शाळांना दिलेचे दिसुन येत नाही.

ब) तासगाव तालुक्यातील मंजूर यादीतील अनुक्रमांक 618 ते 1087 प्रस्तावांची छाननी मध्ये एकाच लाभार्थ्याला दुबार प्रदान झालेचे दिसुन येते.फरक रक्कम रुपये 20,000/- वसूल करुन शासन खाती जमा करावी.

क) प्रस्तावासोबत जातीचा दाखला घेतलेला नसुन बोनाफाईड प्रमाणपत्रानूसार रक्कम अदा केल्या असून जातीचा पुरावा बाबत खात्री करता आली नाही. सदर शिष्यवृत्ती अनुसूचित जातीतील मुलींना अनुज्ञेय असताना, 1) कु.शिवकन्या श्रीमंत कोळी 2) कु.श्रृती राकेश जाधव 3) कु.प्रतिभा शहाजी कोळी 4) कु.निकिता मिनिल एडके 5) कु.तृप्ती उत्तम थोरात या विदयार्थीनी इतर जातीतील असताना त्यांना शिष्यवृत्ती मंजूर करुन अदा केली आहे.

वरील विदयार्थीनी अनूसुचित जातीत समाविष्ठ असलेचा पुरावा सादर केला नसल्याने प्रती विदयार्थी 500/- प्रमाणे 5 विदयार्थ्यांचे 2,500/- वसुलात आणावे.

ड) अनु क्रमांक 738 ते 743, 925 ते 929, 1008 ते 1013, 1032 ते 1041 व 1052 ते 1057 व 1071 ते 1075 प्रस्ताव तपासणीस उपलब्ध झाले नाहीत.

4) मंजूर रक्कम रुपये 7,20,000/- यादीमधील अनुक्रमांक 25,27,114,210 ते 213, 405, 741,1032 ते 1037,1041 व 1045 यादीमध्ये बँक खाते व इतर मजकुर अपूर्ण असलेने संबंधित खात्यावर जमा झालेची खात्री पटवावी.

5) सदर देयकातील मंजूर रक्कमेतील तासगाव तालूक्यातील प्रस्तावांची छाननी केली असता वरीलप्रमाणे गंभीर उणिवा आढळून आल्या असुन योग्य प्रकारे प्रस्तावांची तपासणी झाली नसलेचे दिसुन येते. तरी समाजकल्याण निरीक्षक यांनी उर्वरीत मिरज व कवठेमहांकाळ तालुक्यातील लाभार्थ्यांची शासन निर्णयातील तरतूदीनुसार तपासणी करुन अहवाल सादर करावा.

6) शिष्यवृत्ती वर्षातून 3 वेळा वाटप करणे आवश्यक असताना त्या नुसार कार्यवाही झालेचे दिसून येत नाही.

**3.768 आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन अनुदान वाटपाबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन अनुदान वाटपाबाबत रक्कम रुपये 41,60,000/- इतका खर्च करण्यात आलेला आहे याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

अ) प्रमाणक क्रमांक 118 दिनांक 14/8/2014 रुपये 10,15,000/-

1) श्री.मल्हारी तानाजी जाधव/अश्विनी रमेश कुंभार सोनकिरे विवाह दाखला पडताळणी केलेचा पुरावा नस्तीला नाही.

2) श्री.अमित भगवान दंडवते व संध्या रामचंद्र कांबळे यांचे पैकी संध्या रामचंद्र कांबळे रा.चंद्राई ता.रत्नागिरी यांच्या शाळा सोडल्याचा दाखल्यावर जन्म दिनांक 19/04/1993 असुन विवाह दाखल्यावर दिनांक 15/09/2008 रोजी विवाह झालेची नोंद आहे. विवाह वेळीचे संध्याचे वय 15 वर्षे असुन बालविवाह कायदया अंतर्गत

मुलीचे वय लग्नावेळी 18 वर्षे पुर्ण होणे आवश्यक असून त्यानुसार विवाहावेळी संध्याचे वय 15 वर्षे असलेने शासन लाभ अनुज्ञेय नाही.

ब) प्रमाणक क्रमांक 229,दिनांक 20/03/2015 रुपये 8,00,000/-

1) श्री.शहाजी मारुती पाटील व मिनाक्षी बाबासो काटे रा.टाकळी विवाह नोंदणीचा दाखला व पडताळणी नाही.

2) श्री.सचित कोंडीभाऊ डामसे हा बाहेरील जिल्हयातील असलेने यापुर्वी लाभ इतर जिल्हयातून घेतला नसल्याचे ना हरकत दाखला सादर केला नाही.

क) प्रमाणक क्रमांक 169ख्दिनांक 24/12/2014 रुपये 7,50,000/-.

1) श्री.श्रीकांत जोती कांबळे व सोनाली वसंत शिंदे रा.माडग्याळ ता.जत यांचे पैकी सोनाली वसंत शिंदे यांचे डोमिसाईल सर्टीफिकेट नाही.

ड) प्रमाणक क्रमांक 167 दिनांक 24/02/2015 रुपये 6,65,000/-.

1) श्री.दयानंद राजाराम खोत व अलका बसापा माळी यांनी रजिस्टर पध्दतीने नंदूरबार येथे दिनांक 09/11/2013 रोजी विवाह केल्याबाबत प्रतिज्ञापत्राव्दारे जबाब नोंदविला आहे. जस्टीस मॅजिस्ट्रेट नंदूरबार यांचा विवाह नोंदीचा दाखला प्रस्तावासोबत सादर केलेला नाही.

2) वरील सर्व प्रस्तावातील जातीच्या मूळ दाखल्यावर मागील बाजूस आंतरजातीय विवाह प्रोत्साहन अनुदान देणेत आले आहे. असा रबरी शिक्का मारणेत आलेचे (अट क्रमांक 6 नुसार) दाखले पहावयास मिळाले नाहीत.

3) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम क्रमांक 244 अन्वये नमुना नंबर10 मध्ये शासकीय अनुदानाची व खर्चाची नोंदवही विहित नमुन्यात ठेवलेली नाही.

4) अखर्चित रक्कम रुपये 14,12,000/- राज्य व 55,72,000 केंद्र शासन एकुण 69,84,000/-शासन निधीत भरणा करुन कोषागार प्रमाणित केलेले चलन लेखापरीक्षणास सादर करावे.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 कलम 187 अन्वये केंद्र व राज्य विशेष घटक योजनेनुसार 50:50 प्रमाणात राज्यात राबविणे आावश्यक असून त्यानुसार कार्यवाही झालेचे दिसून येत नाही.

**3.769 20 टक्के राखीव निधीतून मागासवर्गीय व्यक्तींना, महिलांना तसेच 3 टक्के राखीव निधीतून अपंगाना झेरॉक्स मशीन पुरवणे योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** समाजकल्याण विभागाने वीस टक्के राखीव निधीतून मागासवर्गीयांना व तीन टक्के राखीव निधीतून अपंगाना स्वयंरोजगारासाठी झेरॉक्स मशीन पुरवणे योजनेअंतर्गत प्रति झेरॉक्स मशिन रक्कम रुपये 54,605/- प्रमाणे 549 खरेदीची रक्कम रुपये 2,99,74,416/- रिको इंडिया लि. यांना प्रमाणक क्रमांक 16,17, व 18 दिनांक 10/10/2014 अन्वये अदा केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय मागास 1098/प्र.क्र.78/ 34,दिनांक 20/10/1999 प्रमाणे लाभार्थी निवडीची कार्यपद्धती निश्चित केली आहे. त्याप्रमाणे लाभार्थी निवड ही ग्रामसभेत करणेची आहे. ग्रामसभेत निवड केलेले लाभार्थी यादी गट विकास अधिकारी यांनी छाननी करून जिल्हा परिषद समाजकल्याण विभाग यांना सादर केल्यानंतर समाजकल्याण समितीने त्यास मान्यता देऊन साहित्य खरेदी करण्याची आहे. सबब पुरवठा आदेशाचा दिनांक 22/08/2014 पर्यंत अपेक्षित 549 लाभार्थ्या पैकी केवळ 296 लाभार्थी प्रस्तावांना तालुकास्तरावरून शिफारशी प्राप्त झालेल्या आहेत. म्हणजे 253 लाभार्थी निश्चित केलेले नसताना झेरॉक्स मशीन खरेदी करून तालुक्यास पुरवठा केल्या आहेत. त्यामुळे लाभार्थी निश्चित नसताना 253 x 54605 =1,38,15,065/- इतक्या रकमेची अतिरिक्त खरेदी करण्यात आलेली आहे.

2) लाभार्थी प्रस्तावांची तपासणी केली असता 179 लाभार्थ्यांची ग्रामसभेत निवड झाली नसताना व गट विकास अधिकारी यांनी लाभार्थ्यांची छाननी करून प्राप्त झालेल्या यादीत लाभार्थ्यांचा समावेश नसताना साहित्य खरेदी करून पुरवठा केले आहे. त्यामुळे गरजू व पात्र लाभार्थी यापासून वंचित राहिले व अपात्र लाभार्थ्यांना साहित्य

वाटप झाले आहे. रीतसर निवड न झालेल्या अपात्र लाभार्थ्यांना नियमबाह्य झेरॉक्स वाटप केल्याने यावरील खर्च रक्कम रुपये 179 x 54605=97,74,295/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

3) महिलांना झेरॉक्स मशीन पुरवणे करिता आजरा गटाकडील सौ.कुसुम लक्ष्मण कांबळे रा. सुळे यांच्या गटविकास अधिकारी यांनी सादर केलेल्या लाभार्थी निवड तपासणी यादीत सन 2010-2011 या आर्थिक वर्षात लाभ दिल्याचे नमूद केले आहे. सदर निधीतून दुबार लाभ देता येत नसताना नियमबाह्य दुबार लाभ दिल्याने दुबार लाभाची रक्कम रुपये 54,605/- वसूल होणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 प्रमाणे जिल्हा परिषद निधीतून राबवावयाच्या योजनाचे वेळापत्रक निश्चित केले असून 31 मे पर्यंत लाभार्थी निवड प्रक्रिया पूर्ण करून करणे आवश्यक आहे. पुरवठा आदेशाचा दिनांक 22/08/2014 पर्यंत 549 लाभार्थ्यापैकी केवळ 296 लाभार्थ्यांची निवड झाल्याने लाभार्थी निवड प्रक्रिया विहित समय मर्यादेत पूर्ण केली नाही.

5) खरेदी साहित्य वाटपाचा आढावा घेतला असता लाभार्थी निश्चित न करता झेरॉक्स मशीन खरेदी केल्याने माहे जुलै 2016 अखेर म्हणजे साहित्य खरेदी करून सुमारे दोन वर्ष पूर्ण होऊनही शिरोळ तालुक्याकडे 03 नग शिल्लक असल्याचे दिसून आले त्यामुळे याची रक्कम रुपये 1,63,815/- नाहक अडकून पडली आहे.

6) पुरवठा आदेश अट क्रमांक तीन प्रमाणे झेरॉक्स मशीन पुरवठा तालुक्याच्या ठिकाणी करून ते लाभार्थ्यास वाटप केल्यावर ते पुरवठादार यांनी लाभार्थ्याच्या घरी बसवून सुरु करून देण्याचे आहे व लाभार्थ्यास ते चालवण्या बाबत प्रशिक्षण देणेचे आहे. परंतु अशी कार्यवाही झालेली नाही.

**3.770 अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी साधने व उपकरणे अंतर्गत पत्रावळी मशिन पुरविणे.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** समाजकल्याण विभागा मार्फत अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी साधने व उपकरणे अंतर्गत पत्रावळी मशिन पुरविणे योजनेतंर्गत प्रमाणक क्रमांक 586 दिनांक 30/03/2015 अन्वये प्रति नग 23,600/- प्रमाणे 84 मशिन खरेदीची रक्कम रुपये 19,82,400/- सुदर्शन ॲग्रो इंजिनिरींग, सांगली यांना अदा केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक 20/10/1999 प्रमाणे लाभार्थ्यांची निवड ग्रामसभेत करून त्याची गटविकास अधिकारी यांनी छाननी करणे आवश्यक आहे. अशी निवड व शिफारशी नसताना 37 लाभार्थ्यांची जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाने निवड करून साहित्य वाटप केले आहे. सदर लाभार्थ्यांचे प्रस्ताव लेखापरीक्षणास सादर केलेले नाहीत. सबब विहित मार्गाने निवड न करता साहित्य वाटप केलेल्या साहित्याची रक्कम रूपये 8,73,200/- वसुल होणे आवश्यक आहे.

2) लाभार्थी निवड प्रस्ताव लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याने सदर 37 लाभार्थी योजनेंतर्गत लाभास पात्र असल्याबाबतची तपासणी करता आली नाही.

3) रक्कम प्राप्त झाल्या बाबत पुरवठादाराची मुद्रांकित पोच घेण्यात आली नाही.

4) गटविकास अधिकारी यांची साहित्य कधी प्राप्त झाले व त्याची नोंद साठा रजिस्टर मध्ये घेतल्याचे प्रमाणपत्र साहित्य पुरवठा चलनावर नमूद केलेले नाही. त्यामुळे खरेदी साहित्य विहित मुदतीत प्राप्त झाले असल्याचे व पात्र लाभार्थ्यांना वाटप झाले असल्याची पडताळणी करता आली नाही.

5) शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक डिपीए-2008/प्र.क्रं.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ट-इ नुसार जिल्हा परिषदांकडील वैयक्तीक लाभांच्या योजनांस साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश 30 सप्टेंबर अखेरपर्येत देणे व त्यानुसार 30 नोव्हेंबर अखेरपर्यंत लाभार्थ्यांना साहित्य वाटप करणे आवश्यक असतांना माहे फेब्रुवारी महिन्यामध्ये पुरवठा आदेश दिलेले आहेत व माहे मार्च महिन्यामध्ये साहित्य पुरवठा केलेला आहे. त्यामुळे योजनेच्या वेळापत्रकाचे पालन केलेले नाही.

6) साहित्य पुरवठा बिजाकावर (bill) VAT & TIN नंबर नमुद नाहीत. निवीदा दर सर्व करासहीत ठरवलेला असलेने एकूण खरेदी रक्कमेवरील मुल्यवर्धीत कराची रक्कम वसुल करून शासन भरणा करणे आवश्यक आहे.

**3.771 वीस टक्के राखीव निधीतून 5 वी ते 10 वी तील मागासवर्गीय मुलींना सायकल पुरवणे योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** समाजकल्याण विभागा मार्फत वीस टक्के राखीव निधीतून 5 वी ते 10 वी मध्ये शिकत असलेल्या मागासवर्गीय मुलींना सायकल वाटप करणे करिता प्रति नग रुपये 3,555/- प्रमाणे 4913 नग सायकल खरेदीची रक्कम रुपये 1,74,65,715/- प्रमाणक क्रमांक 1136 दिनांक 31/03/2015 अन्वये पुरवठादार कोहिनूर सायकल प्रा.लि. लुधियाना यांना अदा केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2014-2015 या वर्षा करिता 5 वी ते 12 वी च्या मागासवर्गीय मुलींना सायकल पुरवणे रक्कम रुपये 1,74,67,000/- इतक्या रकमेच्या प्रस्तावास आयुक्त समाजकल्याण यांनी तांत्रिक मंजुरी दिलेली नाही.

2) पुरवठा आदेश दिनांक 25/03/2015 रोजी पर्यंत 3536 लाभार्थी निश्चित झाले आहेत. उर्वरित 1377 लाभार्थ्यांचे प्रस्ताव कालांतराने समाजकल्याण विभागाने प्राप्त करून घेतले असून त्यांना सायकली वाटप केले आहे. सदर 1377 लाभार्थ्यांची निवड विहित कार्यपद्धती नुसार झाली नाही. त्यामुळे अपात्र लाभार्थ्यांना साहित्य वाटप झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. लाभार्थी निवड झाली नसताना रक्कम रुपये 48,95,235/- ची अनावश्यक खरेदी केली आहे.

3) लाभार्थी निश्चित न करता साहित्य खरेदी केल्याने माहे जुलै 2016 अखेर म्हणजे साहित्य खरेदी करून सुमारे दोन वर्ष पूर्ण होऊनही साहित्य शिल्लक असल्याचे दिसून आले. त्यामुळे 76 शिल्लक नगाची रक्कम रुपये 2,71,180/- नाहक अडकून पडली आहे. व साहित्य लाभार्थ्यांना वाटप न करता विनावापर पडून आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्र.446/वित्त 09,दिनांक 20/06/2008 जिल्हा परिषद निधीतून राबवावयाच्या योजनाचे वेळापत्रक निश्चित केले असून 31 मे पर्यंत लाभार्थी निवड प्रक्रिया पूर्ण करून करणे आवश्यक आहे. पुरवठा आदेशाचा दिनांक 25/03/2015 पर्यंत निवड झालेली नाही. त्यामुळे लाभार्थी निवड प्रक्रिया विहित समय मर्यादेत पूर्ण केली नाही परिणामी शासन वेळापत्रकानुसार योजना राबवली नाही.

5) पंचायत समिती करवीर, हातकणंगले, चंदगड, गगनबावडा व कागल या गटाकडील साठा नोंदवह्या लेखापरीक्षण कालावधीत उपलब्ध झाल्या नाहीत. तसेच कागल गटाकडील गट विकास अधिकारी यांनी शिफारस केलेली लाभार्थ्यांची यादी उपलब्ध झालेली नाही.

6) सायकल खरेदी समितीच्या दिनांक 21/02/2015 च्या बैठकीत पुरवठा केलेल्या सायकली निर्धारित स्पेसिफिकेशन प्रमाणे पुरवठा केल्या असल्या बाबत तालुका निहाय यादृच्छ (RANDOM) पद्धतीने तपासणी करून शासकीय तंत्रशाळेचा तांत्रिक अहवाल घेणे बाबत सूचित केले असताना हातकणंगले वगळता कोणत्याही गटाकडून अशी तपासणी केल्याचा तांत्रिक अहवाल सादर केलेला नाही.

7) ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2009/प्र.क्र.1794,दिनांक 07/12/2009 प्रमाणे सदर प्रकरणी खरेदी करार करून मुद्रांक न वापरल्याने मुद्रांका पासून शासनास मिळणारे उत्पन्नापासून शासनास वंचित राहावे लागल्याने रक्कम रुपये 17,500/- मक्तेदार कडून वसूल करून शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे.

**3.772 वीस टक्के राखीव निधीतून मागासवर्गीयांना स्वयंरोजगारासाठी दळप यंत्र पुरवणे.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** समाजकल्याण विभागा मार्फत वीस टक्के राखीव निधीतून मागासवर्गीयांना स्वयंरोजगारासाठी दळप यंत्र वाटप करणे करिता प्रति नग रुपये 12,000/-

प्रमाणे 1275 नग खरेदीची रक्कम रुपये 1,53,00,000/- प्रमाणक क्रमांक 19 दिनांक 10/10/2014 अन्वये पुरवठादार श्री. व्यंकटेश एन्टरप्राईज, कल्याण यांना अदा केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय मागास 1098/प्र.क्र.78/ 34,दिनांक 20/10/1999 प्रमाणे लाभार्थी निवडीची कार्य पद्धती निश्चित केली आहे. त्याप्रमाणे लाभार्थी निवड ही ग्रामसभेत करणेची आहे. ग्रामसभेत निवड केलेले लाभार्थी यादी गट विकास अधिकारी यांनी छाननी करून जिल्हा परिषद समाजकल्याण विभाग यांना सादर केल्यानंतर समाजकल्याण समितीने त्यास मान्यता देऊन साहित्य खरेदी करण्याची आहे. दिनांक 19/08/2014 रोजी 1275 नग खरेदीचा आदेश देणेत आलेला आहे. पुरवठा आदेशापर्यंत 766 लाभार्थींची निवड झालेली दिसते उर्वरीत 509 लाभार्थी निवड झाली नसताना साहित्य खरेदी केल्याने प्रति नग 12,000/- प्रमाणे रक्कम रुपये 61,08,000/- इतक्या रकमेची नियमबाह्य जादा खरेदी केली आहे.

2) सबब 509 लाभार्थ्यांची निवड रीतसर निवड व गटनिहाय लाभार्थी संख्या निश्चित झालेली नसताना व्यंकटेश एन्टरप्राईज कल्याण यांना समाजकल्याण विभागाने 1275 नग दळपयंत्र पुरवठा आदेश आहेत. पुरवठादार यांनी तालुकानिहाय दळप यंत्रे दिनांक 15/09/2014 रोजी वाटप केली आहेत. 509 लाभार्थ्यांचे प्रस्ताव कालांतराने प्राप्त करून घेतले आहेत. सबब उशिरा प्राप्त प्रस्तावांची सविस्तर छाननी न झाल्यामुळे अपात्र लाभार्थ्यांना साहित्य वाटप झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) निवड लाभार्थ्यापैकी पंचायत समिती शिरोळ व पन्हाळा कडील अनुक्रमे 38 व 13 लाभार्थ्यांची ग्रामसभेत निवड होऊन गट विकास अधिकारी यांनी लाभार्थ्यांची छाननी करून प्राप्त झालेल्या यादीत लाभार्थ्यांचा समावेश नाही. त्यामुळे गरजू व पात्र लाभार्थी यापासून वंचित राहिले व अपात्र लाभार्थ्यांना साहित्य वाटप झाले आहे त्यामुळे अशा 51 लाभार्थ्यांना नियमबाह्य निवड लाभार्थ्यांना साहित्य वाटप केल्याने यावरील खर्च रक्कम रुपये 51 x 12000= 6,12,000/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

4) पंचायत समिती शिरोळ कडून केवळ 146 लाभार्थी निवड यादी प्राप्त झाली असताना 174 नग साहित्य पुरवठा केले आहे. म्हणजे 28 नियमबाह्य लाभार्थ्यांना साहित्य खरेदी करून पुरवठा केले आहे. सदर 28 लाभार्थ्यांना दिलेले लाभ वसुल होणे आवश्यक आहे.

5) लाभार्थी निश्चित न करता साहित्य खरेदी केल्याने माहे जुलै 2016 अखेर म्हणजे साहित्य खरेदी करून सुमारे दोन वर्ष पूर्ण होऊनही 32 नग साहित्य शिल्लक असल्याचे दिसून आले. त्यामुळे शिल्लक नगाची किंमत रक्कम रुपये 3,84,000/- नाहक अडकून पडली आहे.

6) पंचायत समिती भुदरगड यांना 35 नग पुरवठा केले असताना साठा नोंदवहीत 38 नोंद केले आहेत. तर हातकणंगले गटास 224 नग पुरवठा केले असताना 254 नग साठा नोंदवहीत नमूद केले आहेत. म्हणजे पंचायत समिती भुदरगड यांना इतर गटाकडून 03 नग व पंचायत समिती हातकणंगले यांना इतर गटाकडून 30 नग अतिरिक्त प्राप्त झाले आहेत. गट निहाय लाभार्थी संख्या निश्चित न करता साहित्य खरेदी केल्याने ज्या गटाकडे पात्र लाभार्थी नाहीत अशा गटाकडून साहित्य दुसऱ्या गटास पुरवठा केले आहे. त्यामुळे योजना नियोजनबद्धरीत्या राबवली नाही.

7) पुरवठा आदेश अट क्रमांक तीन प्रमाणे यंत्राचा पुरवठा तालुक्याच्या ठिकाणी करून ते लाभार्थ्यास वाटप केल्यावर ते पुरवठादार यांनी लाभार्थ्याच्या घरी बस्ते करून सुरु करून देण्याचे असून लाभार्थ्यास ते चालवण्या बाबत प्रशिक्षण देणेचे आहे व तसे प्रमाणपत्र समाजकल्याण विभागास सादर करणेचे आहे. अशी कार्यवाही झालेली नाही.

### 3.773 20 टक्के मागासवर्गीयांना सौर कंदील पुरविणे.

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 21) -** समाजकल्याण विभागा मार्फत जिल्हा परीषद वीस टक्के राखीव निधीतून मागासवर्गीयांना सौर कंदील वाटप करणे योजनेअंतर्गत समाजकल्याण विभागाने प्रमाणक क्रमांक 132, दिनांक 31/03/2015 अन्वये मे.ऐन्फोस पॉवर सोल्युशन, सातारा यांचेकडून प्रति नग 2,370/- प्रमाणे 632 नग खरेदी रक्कम रूपये 14,97,840/- अदा केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सौरकंदील खरेदी नग 632 पैकी पन्हाळा व आजरा तालुक्यासाठी 51 लाभार्थी निश्चितीनुसार वाटप करण्यात आले असून करवीर, हातकणंगले, शिरोळ, चंदगड, गडहिंग्लज, भुदरगड, गगनबावडा, शाहुवाडी, राधानगरी व कागल या दहा तालुक्यातून केवळ 227 लाभार्थी निश्चित झाले असताना उपरोक्त 10 तालुक्यांसाठी 581 नग सौरकंदील खरेदी केलेले आहेत त्यामुळे 354 इतक्या लाभार्थ्यांची निवड झालेली नसताना सौरकंदील खरेदी केल्याने ते वाटप न झाल्यामुळे रक्कम रुपये 8,38,980/- नाहक गुंतून पडल्याचे निर्दशनास येते.

2) गटविकास अधिकारी यांची साहित्य कधी प्राप्त झाले व त्याची नोंद साठा रजिस्टर मध्ये घेतल्याचे प्रमाणपत्र साहित्य पुरवठा चलनावर नमूद केलेले नाही. त्यामुळे खरेदी साहित्य विहित मुदतीत प्राप्त झाले असल्याचे व पात्र लाभार्थ्यांना वाटप झाले असल्याची पडताळणी करता आली नाही.

3) शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्रं.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ट-ई नुसार जिल्हा परिषदांकडील वैयक्तीक लाभांच्या योजनांस साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश 30 सप्टेंबर अखेरपर्यंत देणे व त्यानुसार 30 नोव्हेंबर अखेरपर्यंत लाभार्थ्यांना साहित्य वाटप करणे आवश्यक असतांना माहे फेब्रुवारी महिन्यामध्ये पुरवठा आदेश दिलेले असून माहे मार्च महिन्यामध्ये पुरवठा केलेला आहे. त्यामुळे सदर वेळापत्रकाचे पालन केलेले नाही.

4) महाराष्ट्र ऊर्जा विकास महामंडळ यांचे मार्फत खरेदी सौरकंदीलांसाठी 5 वर्षाची वॉरंटी दरकरारामध्ये नमुद केलेली असताना पुरवठा आदेशामध्ये वॉरंटी 1 वर्ष नमुद केली आहे. ही बाब दरकराराशी विसंगत आहे.

5) साहित्याची रक्कम पुरवठादार यांना अदा केल्यानंतर दिनांकित व मुद्रांकित पोहोच घेण्यात आली नाही.

6) कोल्हापूर जिल्हयातील पुरवठादार महा उर्जाच्या शासन दरकरार यादीमध्ये उपलब्ध असताना दुस-या जिल्हयातील पुरवठादारास आदेश दिला आहे. सदर पुरवठादार यांचे सेवा केंद्र कोल्हापूर शहरामध्ये असल्याची खात्री केली नाही. त्यामुळे साहित्य खरेदी पश्च्यात पुरवावयाच्या सेवेची परिणामकारक अंमलबजावणी झाली नाही.

7) याकामी खरेदी करार करणेसाठी मुद्रांक खरेदी केलेला असून त्यावर करार लिखित केलेला नाही.

**3.774 वस्तीगृह मान्यतेचे अधिकार शासन स्तरावर असताना नियमबाहयपणे शासनाचे अधिकार वापरुन जिल्हा परिषद स्तरावर वस्तीगृहांना मंजुरी दिल्याबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा परिषद सोलापूर समाजकल्याण विभागाने वस्तीगृहांना वेतन व वेतनेत्तर अनुदानापोटी रक्कम रुपये 1,23,84,300/- वितरीत केलेले असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/ प्र.क्र.107/मावक-4, दिनांक 16/03/1998 अन्वये वसतीगृह मान्यतेचे अधिकार हे शासनास आहेत. तथापि, जिल्हा परिषद स्तरावर 62 वस्तीगृहांना परवानगी देऊन वित्तीय औचित्याचा भंग करुन गंभीर स्वरुपाची अनियमितता, गैरव्यवहार केलेला आहे. त्यामुळे शासनाचे रुपये 1,23,84,300/- इतक्या रकमेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

समाजकल्याण विभागाकडे एकूण किती वस्तीगृहांना अनुदान देण्यांत येते, त्यांना मंजुरी कधी देण्यांत आली, वस्तीगृहांना वेळोवेळी विदयार्थी संख्योत दिलेली वाढ, वस्तीगृहांचे स्थलांतर याबाबतचे कोणतेही अभिलेखे विभागाकडे नाहीत.

**3.775 मिनी लॅपटॉप खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** जिल्हा परिषद सोलापूर समाजकल्याण विभागाने मिनी लॅपटॉप खरेदीकरीता रुपये 39,93,750/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मिनी लॅपटॉप खरेदीसाठी मागविण्यात आलेल्या निविदेमध्ये साई कॉम्प्युटर सोलापूर यांनी ते विप्रो कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्याचे प्रमाणपत्र सादर केले होते. व मिनी लॅपटॉप प्रतिनग रुपये 17,750/- प्रमाणे पुरवठा करण्यांचे मान्य केले होते. त्यामुळे लॅपटॉप बाबतचे देयक सादर करताना विप्रो कंपनी कडील देयक सादर

करणे आवश्यक होते. तथापि त्यांनी त्यांच्या साई कॉम्प्युटर सोलापूर या दुकानाचे देयक सादर केले आहे. देयकावर मिनी लॅपटॉपचा मॉडेल नंबर, सिरीयल नंबर इत्यादी आवश्यक माहिती नमुद केली नाही.

2) पुरवठा केलेल्या मिनी लॅपटॉप सोबत विप्रो कंपनीचे वॉरंटी कार्ड, मान्यताप्राप्त सर्विस सेंटर, मिनी लॅपटॉपचे Configuration इत्यादी आवश्यक माहिती विभागाकडून उपलब्ध झाली नाही.

3) जिल्हा परिषदेच्या दिनांक 22/04/2015 च्या स्थायी समितीच्या बैठकीत उपाध्यक्ष यांनी प्राप्त झालेले मिनी लॅपटॉप हे ब्रॅन्डेड कंपनीचे नाहीत. यापुढे तरी नामांकित कंपनीचे (ब्रॅन्डेड) कंपनीचे मिनी लॅपटॉप खरेदी करावेत अशी सुचना केली होती. तसेच मिनी लॅपटॉपचे लाभार्थी यांनी तक्रार करुन लॅपटॉप चायनामेड असल्याचे सादर केले होते. त्यानुसार विभागाने मिनी लॅपटॉप विप्रो कंपनीकडे तपासणी करुन घेऊनच देयक आदा करणे आवश्यक होते. तथापि, तशी कार्यवाही केली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008 प्र.क्र.446/वित्त 9 मंत्रालय मुंबई,दिनांक 20/06/2008 नुसार योजनेची अंमलबजावणी झाली नाही.

5) लाभार्थी निवड झाली नसताना सभापती कोटा म्हणून 23 नग मिनी लॅपटॉप राखीव ठेवल्याने रुपये 4,08,250/- गुंतुन राहिलेली आहे.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1089/प्र.क्र./55/ 34,दिनांक 05/10/1999 नुसार वैयक्तीक लाभ देण्यात आलेल्या लाभार्थीची माष्टर नोंदवही ठेवली नाही.

7) समाजकल्याण विभागाकडील समाजकल्याण समितीची इतिवृत्त नोंदवही नसल्याने पात्र लाभार्थ्यांची निवड झाली असलेबाबत पडताळणी करता आली नाही.

8) योजनेचा फलनिष्पती अहवाल लेखी मागणी करुनही लेखापरीक्षणांस सादर केला नाही.

**3.776 ग्रामीण भागातील मागासवर्गीय शेतक-यांना स्प्रिंकलर (तुषार सिंचन) सेट पुरविणे.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** जिल्हा परिषद सोलापूर समाजकल्याण विभागाने ग्रामीण भागातील मागासवर्गीय शेतक-यांना स्प्रिंकलर (तुषार सिंचन) सेट पुरविणेकरीता रुपये 43,85,745/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्र झेडपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नाही.

2) तालुकानिहाय लाभार्थ्यांची मागणी गटविकास अधिकारी यांचेमार्फत समाजकल्याण विभागाकडे सादर करणे आवश्यक असताना तालुकानिहाय मागणी न घेताच 245 नग खरेदी करण्यांत आलेले आहेत.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1089/ प्र.क्र./55/34,दिनांक 05/10/1999 नुसार वैयक्तीक लाभ देण्यात आलेल्या लाभार्थीची माष्टर नोंदवही तालुकास्तरावर ठेवण्यात आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक डीपीआर/1088/ सीआर786/30,दिनांक 26/11/1989 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केलेली आहे त्या वित्तीय वर्षात वाटप करणे आवश्यक असताना पुढील आर्थिक वर्ष सन 2015-2016 मध्ये माहे नोव्हेंबर 2015 या कालावधी अखेर विलंबाने साहित्याचे वाटप केलेले आहे.

5) पंचायत समिती दक्षिण सोलापूर, करमाळा, पंढरपूर, मोहोळ, सांगोला कडील लाभार्थ्यांच्या प्रस्तांवाना गटविकास अधिकारी यांची मंजुरी नसताना संबधित लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे.

6) स्प्रिंकलर सेट पंचायत समितींना पुरवठा केल्यानंतर डिलिव्हरी चलनावर गटविकास अधिकारी यांच्या दिनांकित स्वाक्ष-या नाहीत. तसेच पंचायत समिती सांगोला यांना 18 नग स्प्रिंकलर सेट मिळाले बाबत डिलिव्हरी चलन नस्तीसोबत नाही.

7) पंचायत समिती मोहोळ तालुक्यासाठी सभापती कोटा म्हणून 30 नग स्प्रिंकलर सेट कोणत्या शासन निर्णयाच्या आधारे राखून ठेवले आहेत याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

8) पंचायत समिती मोहोळ यांना स्प्रिंकलर सेट पुरवठा करण्यात आल्यानंतर पुरवठा आदेशातील स्पेशिफीकेशन नुसार आयएसआय मार्क व साहित्य सुस्थितीत असलेबाबत औदयोगिक प्रशिक्षण संस्था यांचा तपासणी अहवाल घेतलेला नाही.

9) पंचायत समिती स्तरावर साहित्य दिनांक 31/03/2015 अखेर प्राप्त झाले असून त्याचे वाटप सन 2015-16 मध्ये झाले आहे.तसेच पंचायत समिती स्तरावर साहित्य वाटपाअभावी शिल्लक असल्याने मोठया प्रमाणावर साहित्याच्या खरेदीपोटी रक्कम गुंतुन पडलेली आहे.

**3.777 अनुदान निर्धारणाबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** आयुक्त, समाजकल्याण विभाग (महाराष्ट्र राज्य) पुणे यांचे कडील पत्र क्रमांक सकआ/नियोजन/मूल्यनिर्धारण/जि.प.सोलापूर/2013-2014/आ1350/, दिनांक 31/01/2014 अन्वये सन 2002-2003 ते 2008-2009 पर्यंतचे अनुदान निर्धारण झालेले असून सदर अनुदान निर्धारण अहवालानुसार जिल्हा परिषदेकडून शासनास देणे असलेली रक्कम रुपये 3,61,04,512/- शासन खाती भरणा करनेबाबत सूचित केलेले असतानाही सदरची रक्कम शासन निधीत भरणा केलेली नाही. तसेच सन 2009-2010 ते 2014-2015 अखेरचे अनुदान निर्धारण करणेत आलेले नाही.

**3.778 आंतरजातीय विवाह प्रोत्साहनपर अनुदान वाटपातील अनियमितेबाबत व अखर्चित रकमेबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** जिल्हा परिषद सोलापूर समाजकल्याण विभागाने आंतरजातीय विवाह प्रोत्साहनपर अनुदान वाटप योजनेवर रक्कम रुपये 45,20,000/- इतका खर्च करण्यांत आला असून त्यापैकी रुपये 7,50,800/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्धारीत केल्यानुसार वधुचे वय 18 व वराचे वय 21 आसणे आवश्यक असताना जिल्हा परिषदेने 4 विवाहीतांना वयाची अट पुर्ण होत नसतानाही योजनेचा लाभ दिलेला आहे.

2) दिनांक 31/03/2015 अखेर प्राप्त झालेल्या अनुदानापैकी रुपये 57,54,000/- इतकी रक्कम अखर्चित राहिलेली आहे.

3) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्र.युटीए-1099/प्र.क्र.45/मवाक-2, दिनांक 30/01/1999 मधील अनुक्रमांक 11 “परिशिष्ट ड” मध्ये नमुद केलेप्रमाणे लाभार्थ्याचे संपूर्ण माहितीबाबतची नोंदवही विहीत नमुन्यात ठेवली नाही.

4) उपरोक्त शासन निर्णयातील अट क्रमांक 12 परिशिष्ट “क” मध्ये विवाहीत जोडप्यांचा सत्कार समारंभ पूर्ण झाल्यानंतर त्याची माहिती संचालक समाजकल्याण यांना पाठविणेबाबत कार्यवाही केली नाही.

5) तसेच उपरोक्त शासन निर्णयातील अट क्रमांक 5 मधील “ब” मध्ये नमुद केलेनुसार रुपये 7,000/- रोखीने आदा करणे आवश्यक असतांना रुपये 7,500/- रोख व रुपये 7,500/- अल्पबचत ठेवीची पावती घेणे आवश्यक असतांना रुपये 7,000/- एवढया रक्कमेच्या ठेव पावत्या घेण्यात आलेल्या आहेत. तसेच रुपये 400/- ची संसार उपयोगी साहित्य खरेदी करुन तशा पावत्या घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाहीदे केलेली नाही.

6) संबंधित योजनेचे 15 लाभार्थी यांचे प्रस्ताव न घेताच रुपये 50,000/- प्रमाणे एकूण रुपये 7,50,000/- खर्च केला आहे.

**3.779 वसतीगृहांना अनुदान वाटपातील अनियमितेबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद सोलापूर यांचेकडून जिल्हयातील 33 वस्तीगृहांना वेतन व वेतनेत्तर अनुदान वाटपावर रुपये 1,32,79,628/- इतका खर्च करण्यांत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/ प्र.क्र.107/मावक-4,दिनांक 16/03/1998 अन्वये शासनाने सन 1998 पुर्वीचे सर्व आदेश रद्द केलेले आहेत. त्यानुसार सर्व वसतीगृहांना

नव्याने मान्यता घेणे आवश्यक होते. तथापि, परिच्छेदातील 33 पैकी 23 वसतीगृहांना शासन मान्यता न घेताच अनुदान मंजूर केले आहे. व शासन स्तरावर मान्यता दिलेल्या 10 वसतीगृहांना जिल्हा परिषद स्तरावर विदयार्थी संख्येत वाढ, दिलेली आहे. त्यामुळे वेतन अनुदानाचे रक्कम रुपये 30,03,000/- इतक्या रकमेचे अतिप्रदान झाले आहे. तसेच वेतनेत्तर अनुदानाची अतिप्रदान होणारी रक्कम परिगणित करण्यात यावी. व अतिप्रदान रक्कम वसुल करणेत यावी.

**3.780 वस्तीगृहांना शासन मान्यता न घेताच वेतन व वेतनेत्तर अनुदान मंजुर केलेबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** महाराष्ट्र शासन, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/प्र.क्र.107/मावक-4,दिनांक 16/03/1998 अन्वये, शासनाने सन 1998 पुर्वीचे सर्व आदेश रद्द केलेले आहेत. त्यामुळे 1998 पुर्वी पासून कार्यरत असलेल्या वसतीगृहांना सुधारीत मान्यता घेणे आवश्यक होते. परिच्छेदात नमुद केलेल्या 68 वसतीगृहांपैकी 56 वसतीगृहे 1998 पुर्वीपासून कार्यरत आहेत. तर 12 वसतीगृहांना शासनाने मान्यता दिली आहे. तथापी शासन स्तरावरुन मान्यता न घेताच 56 वसतीगृहांना रुपये 2,27,29,482/- इतक्या रकमेचे प्रदान जिल्हा परिषदेने केले आहे.

**3.781 मागासवर्गीय महिलाना पिको फॉल मशिन पुरविणे. (सेस फडं)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत समाज कल्याण विभागाने मागासवर्गीय महिलांना पिको फॉल मशिन पुरविणे करीता रुपये 40 लक्ष ची तरतूद केली. त्यापैकी रक्कम रुपये 39,97,812/- पुरवठादारास प्रदान करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र. 446/वित्त-9, दिनांक 20 जुन 2008 मधील परिशिष्ट ई नुसार दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे योजना राबविली नाही.

2) पुरवठादारास प्रदान केलेल्या रक्कमेतून 2% प्रमाणे मुल्यावर्धीत कराची रक्कम रुपये 79,956/- कपात केली नाही.

3) पुरवठादाराने पुरवठा केलेले साहित्य तपशिलाप्रमाणे योग्य असल्याबाबत, सक्षम प्राधिका-याचा चाचणी अहवाल घेण्यात आला नाही.

4) पंचायत समिती वरुड कडुन प्राप्त झालेल्या काही अर्जावर गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

5) पंचायत समिती अंजनगाव सुर्जीने साहित्य वाटपानंतर साठा नोंदवहीला शिल्लक दर्शविली नाही.

6) पंचायत समिती तिवसा येथील समाज कल्याण विभागाच्या मुळ मंजूर यादी मध्ये वंदना भाऊराव पांडे असे लाभार्थ्याचे नाव आहे आणि प्रत्यक्ष अर्जावर संध्या गुणवंत पांडे राहणार डेहणी असे नमुद आहे परंतु प्रत्यक्ष लाभ संध्या गावंडे यांना देण्यात आला. सदर लाभार्थी बदल आदेशावर समाजकल्याण अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. तर विभागातील कर्मचा-याची आहे.

7) पंचायत समिती चिखलदरा अंतर्गत छाया बेलसरे व पुनम जामुनकर यांचे शिवणकला प्रशिक्षण 2015-16 मधील असताना त्यांना सन 2014-2015 मध्ये लाभ दिला आहे.

8) पंचायत समिती स्तरावर वाटप करण्यात आलेल्या 367 शिलाई मशिन पैकी 31 मार्च 2015 पर्यत केवळ 50 नगाचे वाटप झाले आहे. 115 शिलाई मशिनचे लेखापरीक्षण दिनांकापर्यत वाटप करण्यात आले नाही.

**3.782 मागासवर्गीयांना टिनपत्रे पुरविणेबाबत. (सेसफंड)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत समाज कल्याण विभागाने मागासवर्गीयांना टिनपत्रे पुरविणे साठी सन 2014-2015 मधे रुपये 25 लक्ष इतकी तरतुद केली त्यापैकी रक्कम रुपये 3,09,658/- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र. 446/वित्त-9, दिनांक 20 जुन 2008 मधील परिशिष्ट ई नुसार दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे योजना राबविली नाही.

2) पुरवठादारास प्रदान केलेल्या रक्क्मेतून 2% प्रमाणे मुल्यावर्धीत कराची रक्कम रुपये 79,956/- कपात केली नाही.

3) सन 2014-2015 साठी पुरेशी तरतुद असतांनाही स्टिल ऑथोरीटी ऑफ इंडीया नागपूर यांनी रक्कम रुपये 10,48,171/- रकमेचे टिनपत्रे पूरवठा केला असतांना खर्च नोंदविला नाही. उलट रक्कम रुपये 3,09,658/- चा खर्च प्रलंबीत देयकांचे प्रदान करण्यासाठी केला आहे.

4) समाजकल्याण अधिकारी यांनी स्टिल ऑथोरीटी ऑफ इंडीया शाखा नागपूर यांचे कडे दिनांक 17 मार्च 2015 रोजी 35 मेट्रीक टन टिनपत्रे पुरविण्याबाबत मागणी नोंदविली व त्यासाठी रक्कम रुपये 19,22,982/- अग्रीम देण्यात आला परंतु पुरवठादाराने केवळ रुपये 10,48,717/- इतक्या रकमेच्या टिनपत्रांचा पूरवठा केला व उर्वरीत रक्कम रुपये 8,74,265/- व व्याज रक्कम रुपये 1,940/- दिनांक 28 ऑक्टोबर 2015 रोजी परत केले. त्यामुळे पुरवठादाराकडे पुरेसा माल आहे किंवा नाही याची खात्री न करताच पुरवठा आदेश देण्यात आला.

5) पुरवठादाराला घेतलेल्या अग्रीमापैकी शिल्लक रक्कम आठ महिने उशिरान परत केल्याने जिल्हा परिषदेचे व्याजाचे नुकसान झाले आहे.

6) पुरवठादारासोबत करारनामा करण्यात आला नाही. त्यामुळे साहित्य न पुरवल्याबाबत दंडाची आकारणी करण्यात आली नाही.

7) कर्याकारी अभियंता बांधकाम यांना केलेले रुपये 1,94,184/- व साप्ताहीक पांचजन्य यांना केलेले रुपये 5,760/- चे प्रदान 3 वर्षावरील असतांना सक्षम प्राधिकारी यांची मंजुरी न घेता केले आहे.

8) सन 2013-14 च्या मंजूर यादीप्रमाणे सर्व टिनपत्रे वाटप झाली असतांना त्या वर्षातील काही लाभार्थ्यांना सन 2014-2015 च्या साठयातून लाभ दिला आहे.

9) पंचायत समिती स्तरावर वाटप केलेल्या 1315 नग टिनपत्र पैकी 31 मार्च 15 अखेर एकही नग वाटप करण्यात आले नाही.

**3.783 जिल्हा परिषद 3 टक्के सेस मधुन अपंगांना शेवया मशिन वाटप करणे खर्चातील अनियमिततेबाबत. (सेसफंड)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** जिल्हा परीषद अमरावती अंतर्गत समाज कल्याण विभागाने अपंगांकरीता शेवया मशिन पूरविणेसाठी रुपये 22 लक्ष तरतूद केली होती त्यापैकी रक्कम रुपये 21,76,775/- इतका खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्तं-9/ मंत्रालय मुंबई दिनांक 20 जुन 2008 मधील परिशिष्ट ई नुसार दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे योजना राबविली नाही.

2) पुरवठादारास प्रदान केलेल्या रक्कंमेतून 2 % मुल्यवर्धीतकर रक्कम रुपये 43,376/- कपात केली नाही.

3) पुरवठादाराने पुरवठा केलेले साहित्य तपशिलाप्रमाणे वर्गीकृत योग्य असल्याबाबत चाचणी अहवाल घेण्यात आले नाही.

4) कार्यलयाकडे 67 लाभार्थी अर्ज प्राप्त असतांना 81 शेवया मशिनचा पुरवठा आदेश देण्यात आला.

5) निविदा धारकाकडुन जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 141 नुसार बयाणा रक्कमेचा धनाकर्ष घेतल्याचे आढळुन आले नाही.

6) पंचायत समित स्तरावर वाटप केलेल्या 81 नग शेवया मशिनचे वाटप 31 मार्च 2015 पर्यत करण्यात आले नाही.

**3.784 मागासवर्गीय लाभार्थ्यांच्या घरावरील गवती छपरे बदलून टिनपत्रे पुरविणे योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** मागासवर्गीय लाभर्थ्यांच्या घरावरील गवती छपरे बदलून टिनपत्रे पुरविणे योजने अंतर्गत समाज कल्याण विभागाने एकूण रुपये 1,98,29,295/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद उपकर निधीतून 100 टक्के अनुदानावर मागासवर्गीय लाभार्थ्यांना प्रति लाभार्थी 5 टिनपत्रे पुरविणे योजनेत महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविण्याचे वेळापत्रकानुसार कार्यवाही केली नाही.

2) पंचायत समिती,मुर्तिजापूर ला DM क्रमांक 30 दिनांक 22/03/2014 प्रमाणे 2405 नग वितरित केले. पंचायत समिती कार्यालयाने तहसिलदार मुर्तिजापूर यांच्या तोंडी परवानगीने तहसिल कार्यालयाच्या गोडावून मध्ये टिनपत्रे ठेवून लाभार्थ्यांना वाटप केली. त्यानुसार पंचायत समिती चे साठा नोंदवहीनुसार 2130 टिनपत्रे 426 लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले. दिनांक 11/09/2014 रोजी तहसीलदार मुर्तिजापूर यांना गोडावून खाली करून देण्यात आले, त्यावेळी 77 टिनपत्रे आढळून आली. म्हणजे 198 टिनपत्रे कमी आढळले. याबाबत रक्कम रुपये 2,11,812/- संबधितांकडून वसूल करण्यात यावी.

3) साहित्याचा विनियोग त्याच आर्थिक वर्षात करण्यात आला नाही.

4) पंचायत समिती अकोट व बाळापूर यांचे लाभार्थ्यांचे अर्ज व साठा नोंदवही उपलब्ध केली नाही.

5) पंचायत समिती पातूर लाभार्थ्यांचे अर्ज उपलब्ध केले नाही. दादाराव पवार,दिनबंधू तायडे,संजय मते यांना दुबार टिनपत्रे वाटप केले तरी संबधीताकडून रक्कम रुपये 16,046.40/- वसूल करण्यात यावी.

6) पंचायत समिती पातुर ला मंजूर यादीत नाव नसलेल्या लाभार्थ्यांना टिनपत्रे वाटप केले व मंजूर यादीत नाव असलेल्या लाभार्थ्यांना टिनपत्रे वाटप केली नाहीत.

**3.785 दलित वस्ती सुधार योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** समाज कल्याण विभाग,जिल्हा परिष्द अकोला अंतर्गत दलित वस्ती सुधार योजनेमध्ये वाटप करण्यात आलेले अनुदान रुपये 12,16,33,568/- असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय क्रमांक दवसु/1098/353/मानांक/1/दिनांक 04/03/1999 मधील अटी व शर्तीनुसार दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत कामे विहीत मुदतीत पूर्ण झाली नाहीत.

2) शासन निर्णय दलित वस्ती सुधार योजना दिनांक 14/11/2008 मधील परिशिष्ट अ (13) नुसार कामांची तपासणी झाली नाही.

3) अनुदानाच्या पावत्या नमुना क्रंमांक 7 तसेच काम करण्यात ग्रामपंचायत सफल झाल्याची आवश्यक कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत.

4) मंजूर 180 कामांपैकी एकही काम पूर्ण न झाल्याने उपरोक्त दिनांक 4 मार्च 1999 च्या अटी व शर्ती पूर्ण केल्या नाहीत.

5) विकास कामाची नोंदवही,भेट पुस्तिका ठेवण्यात आली नाही.

6) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक दवसु2011प्र.क्र.442/ अजाक/मंत्रालय विस्तार भवन मुंबई दिनांक 05/12/2011 मधील मुद्दा क्रमांक 4 अन्वये या योजनेअंतर्गत घेण्यात येणारे पाहोच रस्ते गावातील मुख्य रस्त्यापासुन जिथपर्यंत अनुसुचीत जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्या आहेत तिथपर्यंत घेण्यात यावेत. असे शासन आदेश असतांना त्याप्रमाणे अभिलेखे आढळले नाहीत त्यामुळे सदर रक्कम वस्तींच्या कामाकरीता मंजूर झाले व त्याच कामावर त्याच वस्तीत खर्च झाल्याचे प्रमाणीत करून दर्शवावे.

**3.786 आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्याची योजने अंतर्गत प्रदानामधील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** समाज कल्याण विभागाने सन 2014-15 मध्ये आंतरजातीय विवाह प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्य योजने अन्वये 76 लाभार्थ्यांना 37,95,000/- ऐवढे आर्थिक सहाय्यक अनुदान वितरीत केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन समाज कल्याण, सांस्कृतीक कार्य व क्रिडा राज्य विभाग शासन निर्णय क्रमांक युटीए 1099/प्र.क्र.45/मावक-2/ दिनांक 30/01/1999 मार्गदर्शक सुचना अट क्रमांक 10 नुसार लाभार्थ्यांना दुबार लाभ देण्यात येवु नये मात्र श्री.अविनाश दिगांबर वरठी, रा.कामठा बेलखेड, ता.कारंजा व रिना प्रकाश मुंढे, रा.कुपटी, तालुका कारंजा यांना दुबार लाभ दिल्यामुळे जादा प्रदान रुपये 50,000/- वसुल करणे आवश्यक आहे.

2) यासंबंधी सन 2013-14 मध्ये धनादेश क्रमांक 005371 दिनांक 03/03/2014 तसेच सन 2014-15 मध्ये धनादेश क्रमांक 007896 दिनांक 02/07/2014 काढलेला आहे. सन 2013-14 चे धनादेश वितरण नोंदवहीमध्ये संबंधितांची पोच नाही. सन 2014-15 मध्ये 2013-14 चार धनादेश अदा केल्याचे दाखवुन एकाचीच पोहोच घेतली आहे.

3) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक आजावि-2007/प्र.क्र.191/मावक-2/2010 दिनांक 01/02/2010 अन्वये आर्थिकसहाय्यामध्ये रुपये 15,000/- वरुन रुपये 50,000/- इतकी वाढ केलेली आहे. मात्र सदर वाढ शासन निर्णय निर्गमित झाल्याच दिनांकापासुन अनुज्ञेय आहे. पुर्वीच्या विवाहांना अनुज्ञेय नाही. मात्र नितीन पुंडलीक खडसे, रा.काटा व हर्षा चंद्रमणी खंडारे, रा.पारस यांचा विवाह दिनांक 17/03/2006 रोजीचा असतांना त्यांना रुपये 50,000/- प्रदान केलेले आहे. सदर रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

4) वरील जोडप्याने सादर केलेले विवहाप्रमाणपत्रावर जावक क्रमांक नाही. प्रमाणपत्र संशयास्पद वाटते.

5) शासन निर्णय दिनांक 30/01/1999 सुचना क्रमांक 5(ब) मंजुर अनुदान रुपये 15,000/- पैकी रुपये 7,500/- ठेवीच्या स्वरुपात पती पत्नीच्या नावाने, रुपये 7,000/- रोखीने व रुपये 400/- संसारपयोगी साहित्य व रुपये 100/- स्वागत समारंभ याप्रमाणे अर्थसहाय्य देणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

6) महाराष्ट्र शासन समाज कल्याण, सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक युटीए 1099/प्र.क्र.45/मावक-2 दिनांक 30/01/1999 सुचना क्रमांक 1 नुसार आंतरजातीय विवाह योजना ही अनुसुचित जाती/ अनुसुचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती पैकी एक व्यक्ती दुसरी व्यक्ती सवर्ण हिंदु, जैन, लिंगायत बौध्द पैकी एक असावा तसेच शासन निर्णय क्रमांक अजावी-2003/प्र.क्र.501/मावक-2 दिनांक 06/08/2004 दोन्ही व्यक्ती मागासप्रवर्गातील असल्यासच लाभ देणे आवश्यक असतांना शे.रिजवान शे.नजीर, रा.मोठेगाव मुस्लिम व रेश्मा रॉय मराठा, रा.विजयनगरर अंधेरी ठाणे दोन्ही पैकी एकही मागासप्रवर्गातील नसतांना लाभ दिले. नियमबाहयपणे दिलेल्या लाभाची रक्कम रुपये 50,000/- वसुल करणे आवश्यक आहे.

7) खालील लाभार्थ्यांचे अर्ज लेखापरीक्षणास तपासणीस उपलब्ध झालेले नाही -

a) शिरीषकुमार हरीचंद चव्हाण व रुपाली समाधान वानखडे, b) विशाल अशोक जाधव व अर्चना हरीहर सरकटे, c) वृषभ नेमिचंद रोकडे व लक्ष्मी प्रल्हाद राठोड, d) सुधिर जयकृष्ण काळे व शिल्पा भाष्कर अंगाईतकर, e) पंकज सुरेश बांडे व प्रिती अर्जुनराव तायडे

8) उपलब्ध अर्जांची तपासणी केली असता सहा अर्जांमध्ये आंतरजातीय विवाह केलेले एक व्यक्ती इतर जिल्हयातील असतांना त्या जिल्हयातील समाज कल्याण विभागाकडून अर्थसहाय्य न दिल्याबाबत नाहरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांना याप्रमाणे घेतलेले नाही.

9) तपासणी केलेल्या अर्जांपैकी काही अर्जांबाबत लाभ दिलेला असतांना पोच घेतलेली नाही. अर्जास विवाह नोंदणी प्रमाणपत्र नसणे, अर्थसहाय्याचे धनादेशावर पती पत्नी पैकी एकाचीच स्वाक्षरी घेतलेली आहे. दोन लाभार्थ्यांचे धनादेश वितरीत केलेले नाहीत. याप्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

10) वरील धनादेशा बाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांचे कडील रोख पुस्तकाची तपासणी केली असता सदरचा धनादेश अरोखिकृत नसल्याचे आढळून आले.

**3.787 100 टक्के अनुदानावर मागासवर्गीय शेतकऱ्यांना डिझेल इंजिन पुरविणे.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** जिल्हा परिषद उपकराअंतर्गत 100 टक्के अनुदानावर मागासवर्गीय शेतकऱ्यांना डिझेल इंजिन पुरविणे योजनेकरीता प्रशासकीय तसेच तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यांनतर शासन दर करारानुसार महाराष्ट्र कृषी उदयोग महामंडळ यांचे कडून डिझेल इंजिन खरेदी करीता सन 2014-15 मध्ये रुपये 29,76,000/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त-9 दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबवितांना वेळापत्रकाचे पालन केलेले नाही.

2) शासन निर्णय 19/03/2012 नुसार अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रशासकीय मान्यता व खर्चास मंजुरीचे आदेश असतांना एकाच खरेदीस दोन वेळा प्रशासकीय मान्यता घेवुन पुरवठा आदेश दिलेले आहेत. तसेच सदर प्रशासकीय मान्यता प्राप्त केल्याचे दस्तावेज, टिप्पणी व प्रशासकीय मंजुरी व पुरवठा आदेश लेखापरिक्षणास प्राप्त केले नाही. दुसरा पुरवठा आदेशान्वये प्राप्त साहित्याची नोंद नमुना 33 ला नाही. वित्त विभागाकडे सदर बिलावर चुकीचा साठा पुस्तक पान क्रमांक टाकलेला आहे. सबब पुरवठा दाराची मागणी व साहित्य प्राप्त नसतांना धनादेश काढून महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 27 चा भंग केल्याचे आढळून येते.

3) योजनेस व्यापक प्रसिध्दी दिलेली नाही. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग मागास 2001/प्र.क्र.408/34 दिनांक 20/04/2001 परिच्छेद 2 लाभार्थी निवड तांत्रिक निकषानुसार केली असल्याचा अभिलेख नाही. प्राप्त अर्ज मंजुर लाभार्थी यादी व मुळ अर्ज उपलब्ध झालेली नाही.

4) पंचायत समितीला लाभार्थी यादी 5 ते 6 वेळा प्राप्त झालेली आहे. प्रारंभिचे मुळ यादीत फेरफार करुन लाभार्थी नाव बदलुन, दुसऱ्या पंचायत समिती व तालुक्यातील नावे असलेल्या यादीस समाज कल्याण समितीची मंजुरी न घेता त्यावर केवळ सामजकल्याण सभापती व जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांची सही घेवुन तुटक पध्दतीने पंचायत समितीस देवून साहित्याचे वाटप केले आहे. निवड लाभार्थी लाभापासून वंचीत ठेवून पदाधिकारी यांचे हितसंबंध साधुन लाभार्थ्यास लाभ दिल्याने जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 277 चा भंग केलेला आहे. दुबार लाभ दिलेला असण्याची शक्यता आहे. लेखापरिक्षण तारखेपावेतो पंचायत समितीला साहित्य शिल्लक असल्याचे दिसुन आले आहे.

5) निजाम पिरु मोहनावाले, रा.कोळंबी, ता.मंगरुळपीर, पिरु बुध्दु परसुवाले, रा.कोळंबी, ता.मंगरुळपीर, रन्नु पिरु मोहनावाले, रा.कोळंबी, ता.मंगरुळपीर यांना पंचायत समिती कारंजा येथुन लाभ दिलेला आहे. पंचायत समिती मंजुर लाभार्थी यादी नसतांना जादा पुरवठा केला आहे.

6) पंचायत समिती मालेगाव येथे मोठया प्रमाणात 38 नग ऑईल इंजिनचा पुरवठा केला आहे. साठा नोंदवहीची तपासणी केली असता 3 ऑईल इंजिन शिल्लक असतांना साठा नोंदवहीमध्ये शिल्लक साहित्य निरंक दाखविले आहे. मंजुर लाभार्थी नसतांना जादा साहित्याचे पुरवठा आदेश देवुन साहित्य खरेदी केल्याने जिल्हा परिषद उपकर निधीचे नुकसान झाले आहे. त्यामुळे रुपये 72,000/- रक्कमेची वसुली करणे आवश्यक आहे.

7) पुरवठा केलेल्या साहित्याचा गुणवत्ता तपासणी अहवाल नाही. साहित्य मानकानुसार योग्य गुणवत्तेचे प्राप्त झाल्याबाबत बिलावर प्रमाणित केले नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83(3) नुसार विभाग प्रमुखाने साहित्याची तपासणी करुन प्रमाणपत्र नोंदविलेले नाही.

8) लाभार्थ्यांकडून साहित्याचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त केले नसल्यामुळे योजनेचा उददेश व फलश्रृती तपासणीस उपलब्ध झाले नाही.

**3.788 100 टक्के अनुदानावर आदिवासी शेतकऱ्यांना पेट्रोकेरोसीन इंजिन पुरविणे खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** जिल्हा परिषद उपकराअंतर्गत 100 टक्के अनुदानावर आदिवासी शेतकऱ्यांना पेट्रोकेरोसीन इंजिन पुरविणे योजनेकरीता प्रशासकीय तसेच तांत्रिक मान्यता प्राप्त

झाल्यानंतर शासन दर करारानुसार महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळ यांचे कडून डिझेल इंजिन खरेदी करीता सन 2014-15 मध्ये रुपये 1,92,000/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थी निवड उपवनसंरक्षक वनक्षेत्र घोषित गावातील आदिवासी शेतकऱ्यांचे लाभार्थी चे प्राप्त अर्ज घेऊन त्यासोबत तांत्रिक मान्यतेतील निकषास लागणारे कागदपत्रे नुसार समाज कल्याण समितीने पात्र लाभार्थींचे निवड करुन सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. मात्र लाभार्थी मंजुर यादी पात्र अपात्र लाभार्थी यादी, लाभार्थी अर्ज लेखापरिक्षणास उपलब्ध केले नाही.

2) मुळ यादीत एकही लाभार्थी पंचायत समिती मानोरा येथील नसतांना पंचायत समिती मानोराला साहित्याचा पुरवठा केला आहे. विभागाने यादी मध्ये लाभार्थीचे नावांचे बदलास मंजुरी प्राप्त न करता आदिवासी अनुसुचित जमाती व वनक्षेत्राबाहेरील मागासवर्गीयांना डिझेल इंजिनचा लाभ अदा केलेला आहे. तसेच निवड केलेल्या लाभार्थी व्यतीरीक्त त्यांचे कोणतेही अर्ज प्राप्त नसतांना व अर्जासोबत 7/12, 8अ, जसस्त्रोत दाखला व घोषित वनक्षेत्रातील ग्रामसेवक व रहिवासी दाखला नसतांना लाभ अदा केला आहे. यानुसार सुरेश सीताराम नांदे, रा.कुत्तरडोह, मुरलीधर नांदे, रा.पिंपळवाडी, दत्ता सीताराम फाडे, रा.टणका, सुमन नथ्थुजी गिऱ्हे, रा.रामगांव आदींना मंजुर यादीत नाव नसतांना त्यांचे कागदपत्र कररनामे न घेता दिलेला लाभ वसुल करणे आवश्यक आहे.

**3.789 मागासवर्गीयांना 100 टक्के अनुदानावर टिनपत्रे पुरविणे योजना खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** जिल्हा परिषद उपकराअंतर्गत 100 टक्के अनुदानावर मागासवर्गीयांना टिनपत्रे पुरविणे योजनेकरीता प्रशासकीय तसेच तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा पध्दतीव्दारे शेतकरी भांडार कळमनुरी जिल्हा हिंगोली यांना पुरवठा आदेश देवुन 30 मे.टन टिनपत्रे खरेदी करीता रुपये 29,72,070/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) टिनपत्राचे व्यापक निविदा प्रसिध्दी केली नाही. ई-निविदा प्रणालीचा वापर योग्य रीतीने केला नाही. तसेच स्टील अथॉरीटी ऑफ इंडिया कंपनीचे दर कमी असतांना जादा दराने टिनपत्रे खरेदी केलेली आहे. स्टील अथॉरीटी ऑफ इंडिया कंपनीचे दरापेक्षा किमान रुपये 33,569/- प्रती मे.टन जादा दर दिल्याने जिल्हा परिषदेचे रुपये 10,07,070/- चे नुकसान झालेली रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त-9 दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबवितांना वेळापत्रकाचे पालन केलेले नाही.

3) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्र.क्र.73/34 दिनांक 20/10/1999 अन्वये मागासवर्गीयांचे कल्याणासाठी राखुन ठेवलेला निधी खर्च करण्यासंदर्भात परिच्छेद 1.2 चे अनुक्रमांक 22 मध्ये नमुद केल्यानुसार टिनपत्रे वितरणापुर्वी लाभार्थी यांचे घरावर गवती छप्पर असल्याचे तांत्रिक निकषामध्ये कोणतेही अट नाही. त्यासंबंधीचा दाखला मागणी केला नाही.

4) लाभार्थी मंजुर यादी पात्र अपात्र लाभार्थी यादी, लाभार्थी अर्ज लेखापरिक्षणास वारंवार मागणी करुन उपलब्ध केले नाही. सभेचे इतीवृत्त नोंदवहीमध्ये लाभार्थींचे नावे नाहीत. केवळ संख्या दर्शविली आहे. लाभार्थींचे बदलास मंजुरी न घेता पंचायत समितीस परस्पर लाभार्थी यादी देवुन मंजुर लाभार्थ्याव्यतीरीक्त इतर लाभार्थ्यास नियमबाहयपणे लाभ दिलेला आहे.

5) वाहन व वजन पावती उपलब्ध केली नाही.

6) पंचायत समिती साठा पुस्तकानुसार लेखापरिक्षण तारखेपावेतो साहित्य शिल्लक आहे. पंचायत समिती कडील मागणी अर्ज नसतांना व लाभार्थी निवड नसतांना पंचायत समिती मंगरुळपीर, रिसोड, मालेगाव व मानोराला जादा साहित्याचा पुरवठा केल्याने 85 नग टिनपत्रे शिल्लक आहेत. याबाबत रुपये 1,52,107/- ची संबंधीतावर जबाबदारी निश्चीत करण्यात यावी. मानोरा साठा पंजी नुसार 5 टिनपत्रे श्री.कोकर, कनिष्ठ लिपीक यांनी परस्पर वाटप केल्याचे दर्शविल्याने 5 टिनपत्रांची किंमत रुपये 9,006/- वसुल करणे आवश्यक आहे.

7) पंचायत समिती वाशिम कडील यादीमध्ये श्री.गजानन नामदेव मनवर व राजु नामदेव मनवर, रा.बाभुळगाव यांचे नाव नसतांना मंजुरी व्यतीरीक्त दिलेला लाभ रक्कम रुपये 18,012/- वसुल करणे आवश्यक आहे.

8) पंचायत समिती मानोरा श्री.पुंडलीक मारोती वंजारी यांना 5 नग टिनपत्रे वाटप केल्यानंतर प्राप्त म्हणून पोच अंगठा किंवा स्वाक्षरी नाही. पंचायत समिती कारंजा येथून पंचायत समिती मंगरुळपीर येथील 5 लाभार्थ्यांना लाभ दिल्याने दुबार लाभ दिलेला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. योजनेचे वर्ष निहाय तसेच लाभार्थी निहाय मास्टर रजिस्टर ठेवण्यात आले नसल्याने दुबार लाभ दिल्याचे नाकारता येणार नाही.

9) पुरवठा केलेल्या साहित्याचा गुणवत्ता तपासणी अहवाल नाही. साहित्य मानकानुसार योग्य गुणवत्तेचे प्राप्त झाल्याबाबत बिलावर प्रमाणित केले नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83(3) नुसार विभाग प्रमुखाने साहित्याची तपासणी करुन प्रमाणपत्र नोंदविलेले नाही.

10) संबंधीत पुरवठा दाराकडून आयकर तसेच विक्रीकर कपात न करता बिले पारीत केलेली आहेत. पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार वजन पावती प्राप्त न करता तसेच चाचणी अहवाल प्राप्त केल्याखेरीज ठेव रक्कम कपात न करता संपुर्ण रक्कम पुरवठादारास अदा केले आहे.

11) लाभार्थ्यांकडून साहित्याचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त केले नसल्यामुळे योजनेचा उददेश् व फलश्रृती तपासणी उपलब्ध झाले नाही.

### 3.790 3 टक्के अपंग मधुन 100 टक्के अनुदानावर अपंगाकरीता तीन चाकी सायकल पुरविणे योजनेतील अनियमितता.

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** जिल्हा परिषद उपकराअंतर्गत 3 टक्के अपंग मधुन 100 टक्के अनुदानावर अपंगाकरीता तीन चाकी सायकल पुरविणे योजनेकरीता प्रशासकीय तसेच तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर शासन दर करारानुसार महात्मा गांधी सेवा संघ गांधी नगर समर्थ नगर औरंगाबाद यांचे कडून तीन चाकी सायकल खरेदी करीता सन 2014-15 मध्ये रुपये 10,29,300/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त-9 दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबवितांना वेळापत्रकाचे पालन केलेले नाही.

2) अपंग व्यक्तींना तीन चाकी सायकल पुरविणे करीता 141 सायकलींचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. मात्र नस्ती मध्ये केवळ 85 लाभार्थी निवडीबाबतचा ठराव आहे. 56 लाभार्थी मंजुर यादी पात्र अपात्र लाभार्थी यादी, लाभार्थी अर्ज लेखापरिक्षणास वारंवार मागणी करुन उपलब्ध केले नाही. सभेचे इतिवृत्त नोंदवहीमध्ये लाभार्थींचे नावे नाहीत. केवळ संख्या दर्शविली आहे. त्यामुळे मंजुर लाभार्थ्यांनाच तसेच तांत्रिक मंजुरी आदेशातील अटी व शर्ती पुर्ण करणाऱ्या लाभार्थ्यांनाच लाभ दिलेला असल्याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

3) साहित्याचा पुरवठा संमिश्र अपंग केंद्र वाशिम यांना करावयाचा आहे. मात्र तेथील साठा पुस्तक लेखापरिक्षणास वारंवार मागणी करुन देखील उपलब्ध झालेले नाही. त्यामुळेसाहित्य प्रत्यक्षात कोणत्या दिनांकास प्राप्त झाले याबाबत तपासणी करता आली नाही. तसेच वाटप केलेले साहित्य कोणत्या लाभार्थ्यांना वाटप केले, शिल्लक साहित्य किती याची तपासणी करता आलेली नाही.

4) 141 नग तीन चाकी सायकल केवळ पंचायत समिती वाशिमला वाटप केलेले आहे. मात्र त्यांचा मागणी अहवाल नस्तीमध्ये नाही. पंचायत समिती वाशिम यांनी 2014-15 मध्ये पंचायत समिती सेस फंड योजनेतून अपंगांना तीन चाकी सायकल पुरविणे योजना राबविली असल्यामुळे दुबार लाभ दिलेला असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

5) योजना नस्ती मध्ये शासन दर कराराची प्रत नाही. साहित्य पुरवठा केल्याची वाहन पावती नाही. साहित्याचा गुणवत्ता तपासणी अहवाल नाही.

6) पुरवठा दाराचे देयकातुन आयकर अधिनियमाचे 194 सी नुसार 2 टक्के दराने आयकराची रक्कम रुपये 20,568/- कपात केलेली नाही.

7) योजनेबाबत कुठलाही अभिलेख अर्धसमास पत्रान्वये मागणी करुन देखील उपलब्ध न झाल्याने योजनेचे फलश्रृतीबाबत अभिप्राय नमुद करता आला नाही.

**3.791 जिल्हा परिषद उपकर निधी 20 टक्के मागासवर्गीयांचे कल्याणकारी योजना अंतर्गत मागसवर्गीय शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर एचडीपीई ताडपत्री पुरविणे योजनेतील अनियमिततांबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** जिल्हा परिषद उपकर निधी 20 टक्के मागासवर्गीयांचे कल्याणकारी योजना अंतर्गत मागासवर्गीय शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर एचडीपीई ताडपत्री पुरविणे योजनेकरीता प्रशासकीय तसेच तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर शासन दर करारानुसार लॅमीफॅब ॲण्ड पेपर्स लिमीटेड, औरंगाबाद यांचे कडून एचडीपीई ताडपत्री खरेदी करीता सन 2014-15 मध्ये रुपये 28,79,712/- एवढा खर्च केलेला आहे. खर्चाबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त-9 दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबवितांना वेळापत्रकाचे पालन केलेले नाही.

2) योजनेस व्यापक प्रसिध्दी देवुन लाभार्थी अर्ज मागविले नाहीत. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक पंरास 2012/प्र.क्र.104/वित्त-3 दिनांक 16/10/2012 नुसार सभेमध्ये लाभार्थी यादीस मंजुरी घेवुन लाभार्थी निश्चित करणे आवश्यक असतांना मंजुर लाभार्थी यादी लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाही. निवड लाभार्थ्यांची नावे ठरावात नमुद नाही. पात्र अपात्र लाभार्थ्यांची संख्या यादी टिपणीत नस्तीत नमुद नाही.

3) दुसऱ्यांदा दिलेला 441 नग पुरवठा आदेशाची प्रशासकीय मंजुरी तांत्रिक मंजुरी नस्तीत नाही. लाभार्थी निवड निश्चित न करताच पुरवठा आदेश दिलेला आहे.

4) दुबार व वारंवार लाभ दिला जाऊ नये म्हणून गावनिहाय तालुका निहाय मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना नोंदवही ठेवलेली नाही.

5) पंचायत समिती कडील लाभार्थी यादी संभेने मंजुर केलेल्या नाहीत. त्यावर समाज कल्याण सभापती व समाज कल्याण अधिकारी यांचे स्वाक्षरिनीशी दिलेल्या आहेत. यादी गट विकास अधिकारी यांचे कार्यालयाचे पत्रानिशी पाठविणे आवश्यक असतांना तसे न करता लाभार्थींच्या यादी जिल्हा परिषदेचे व पंचायत समितीचे सभापती उपसभापती यांचे नावे तुटक पणे दिलेल्या आहेत. उदा. पंचायत समिती रिसोड अंतर्गत कु.जोगदंड, जिल्हा परिषद अध्यक्षा, श्री.शिंदे, सभापती, श्री.बिजोरे, श्री.शंकरराव बोरकर, जिल्हा परिषद सदस्य, श्री.सानप, श्री.मोरे, श्री.रोळे, श्री.स्वप्नील सरनाईक इत्यादी यावरुन जिल्हा परिषदेचे व पंचायत समितीचे पदाधिकारी यांचे वैयक्तीक हितसंबंध साधुन योजनेचा लाभ दिल्याचे आढळून आले. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 277 चा भंग केला आहे.

6) पंचायत समिती मानोरा यांना 142 नग ताडपत्री प्राप्त झाल्याची नोंद आहे. त्यापैकी 49 नग दिनांक 31/07/2015 पर्यंत वाटप केले आहेत. सदरचा वाटप दिनांकीत केला नाही. श्री.कोकरे, कनिष्ठ सहाय्यक यांनी माहे ऑक्टोंबर 2015 मध्ये श्री.ठोंबरे, कनिष्ठ सहाय्यक यांना प्रभार देतांना 93 नग ताडपत्रीसह प्रभार देणे आवश्यक असतांना श्री.ठोंबरे यांचे ताब्यात 71 नग ताडपत्री दिलेल्या आहेत. कमी आढळून आलेल्या 22 नगाची किंमत रुपये 69,696/- संबंधीतावर जबाबदारी निश्चित करुन वसुल वसुल करणे आवश्यक आहे.

7) पंचायत समिती वाशिम, मानोरा, मालेगाव यांचे साठा पुस्तकातील नोंदी कार्यालय प्रमुखांनी प्रमाणित केलेल्या नाहीत. तसेच साठा कधी प्राप्त झाला याची दिनांकीत नोंद घेतली नाही.

8) पंचायत समिती मालेगाव यांचेकडील साठा व वाटप नोंदवही मध्ये 8 लाभार्थ्यांना लाभ दिल्याबाबतच्या नोंदी नाहीत. तसेच संबंधीताचे करारनामे उपलब्ध नाहीत. संबंधीतास लाभ दिल्याबाबत स्वाक्षरी नसल्यामुळे संबंधीत

लिपीक यांनी साहित्याचा गैरवापर केला असल्याची शक्यता नाकारता येत नाही. तरीही 8 नग तापडपत्रीची किंमत रुपये 25,344/- संबंधीतावर जबाबदारी निश्चित करुन वसुल वसुल करणे आवश्यक आहे.

9) पंचायत समिती निहाय साठा पुस्तकाची तपासणी केली असता लेखापरीक्षण दिनांकापर्यंत 119 नग ताडपत्री शिल्लक आहेत. विभागाकडे लाभार्थी निश्चित नसतांना व साहित्याची आवश्यकता नसतांना साहित्याची अनावश्यक खरेदी केली असल्याचे दिसुन येते याबाबत संबंधीतावर जबाबदारी निश्चित करुन रुपये 3,76,992/- वसुल वसुल करणे आवश्यक आहे.

10) दरारातील अटी व शर्ती नुसार साहित्याचा पुरवठा पुरवठा आदेशापासुन 4 आठवडयात करणे आवश्यक असतांना पंचायत समिती मानोरा यांचा पुरवठा आदेश क्रमांक 808 दिनांक 23/03/2015 अन्वये मागणी केलेले साहित्य दिनांक 19/05/2015 रोजी 3 आठवडे उशीरा प्राप्त झालेले आहे. सबब प्रत्येक पंचायत समितीला साहित्य 3 आठवडे उशीरा पोचल्यामुळे दरकरारातील तरतुदीनुसार प्रती आठवडा 0.5 टक्के दराने रुपये 20,955/- दंडाची रक्कम कपात करणे आवश्यक असतांना दंडाची कपात केलेली नाही. सदर रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

11) कंत्राटदाराचे देयकातुन आयकर रक्कम कपात करणे अथवा आयकर क्लिअरंस प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. सबब आयकराची रक्कम अधिक सरचार्ज एकुण रक्कम रुपये 66,233/- वसुल करणे आवश्यक आहे.

**3.792 जिल्हा परिषद उपकर निधी 20 टक्के मागासवर्गीयांचे कल्याणकारी योजने अंतर्गत मागासवर्गीय शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर एचडीपीई पाईप पुरविणे योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** जिल्हा परिषद उपकर निधी 20 टक्के मागासवर्गीयांचे कल्याणकारी योजना अंतर्गत मागासवर्गीय शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर एचडीपीई पाईप पुरविणे योजनेकरीता प्रशासकीय तसेच तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर शासन दर करारानुसार विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित अकोला यांचे कडून एचडीपीई पाईप खरेदी करीता सन 2014-15 मध्ये 29,66,170/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त-9 दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबवितांना वेळापत्रकाचे पालन केलेले नाही.

2) योजनेस व्यापक प्रसिध्दी देवुन लाभार्थी अर्ज मागविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे अभिलेख नाही. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक पंरास 2012/प्र.क्र.104 वित्त-3 दिनांक 16/10/2012 नुसार सभेमध्ये लाभार्थी यादीस मंजुरी घेवून लाभार्थी निश्चित करणे आवश्यक असतांना समाज कल्याण सभा दिनांक 12/11/2014 ठराव क्रमांक 5 मध्ये मोघमपणे लाभार्थी संख्या नमुद करुन लाभार्थी निवड करणे बाबत प्रस्तावित केले आहे. सभेमध्ये लाभार्थी निवड झाली नाही. मंजुर लाभार्थी यादी नसतांना दुसरा पुरवठा आदेश क्रमांक 806 दिनांक 23/03/2015 अन्वये 3120 एचडीपीई पाईप खरेदी केले.

3) दुसरा पुरवठा आदेशानुसार 3120 एचडीपीई पाईप खरेदी केले त्याचे प्रशासकीय मंजुरी व तांत्रिक मंजुरी आदेशावर अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. जावक क्रमांक दिनांक नमुद नाही. सबब खरेदीस प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी न घेताच मंजुर लाभार्थी नसतांना नियमबाहयपणे साहित्याची खरेदी केली आहे.

4) दुबार व वारंवार लाभ दिला जाऊ नये म्हणून गावनिहाय तालुका निहाय मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना नोंदवही ठेवलेली नाही.

5) पात्र अपात्र लाभार्थी संख्या नस्तीत नमुद नाही. मंजुर लाभार्थी अर्ज लेखापरिक्षणास सादर केले नाही. प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी आदेशातील अटी व शर्तीनुसार लाभार्थी निवड केलेली असल्यबाबत तपासणी करता आलेली नाही. पंचायत समितीला प्राप्त लाभार्थी यादीर हया सभेने मंजुर केलेल्या लाभार्थी यादी नाहीत. त्यावर समाज कल्याण सभापती व समाज कल्याण अधिकारी यांचे स्वाक्षरी घेवून पाठविलेल्या आहेत. यादी गट विकास अधिकारी यांचे कार्यालयाचे पत्रानिशी पाठविणे आवश्यक असतांना तसे न करता लाभार्थ्यींच्या यादी जिल्हा परिषदेचे व पंचायत समितीचे सभापती उपसभापती यांचे नावे तुटक पणे दिलेल्या आहेत. जिल्हा परिषदेचे व पंचायत

समितीचे पदाधिकारी यांचे वैयक्तीक हितसंबंध साधुन योजनेचा लाभ दिल्याचे आढळून आले. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 277 चा भंग केला आहे.

6) पंचायत समिती वाशिम, मानोरा, मालेगाव यांचे साठा पुस्तकातील नोंदी कार्यालय प्रमुखांनी प्रमाणित केलेल्या नाहीत तसेच साठा कधी प्राप्त झाला याची दिनांकीत नोंद घेतली नाही.

7) पंचायत समिती मानोरा यांना 960 नग एचडीपीई पाईप प्राप्त झाल्याची नोंद आहे. त्यापैकी ऑक्टोंबर 2015 पर्यंत 420 नग वाटप केले आहेत. सदरचा वाटप दिनांकीत केला नाही. श्री.कोकरे, कनिष्ठ सहाय्यक, यांनी माहे ऑक्टोंबर 2015 मध्ये श्री.ठोंबरे, कनिष्ठ सहाय्यक, यांना प्रभार देतांना 540 नग पाईपचा प्रभार देणे आवश्यक असतांना श्री.ठोंबरे यांचे ताब्यात 530 नग पाईप दिलेले आहेत. कमी आढळून आलेल्या 10 नगाची किंमत रुपये 4,700/- संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन वसुल वसुल करणे आवश्यक आहे.

8) पंचायत समिती मानोरा येथील एचडीपीई पाईप वाटप नोंदवही नुसार अनुक्रमांक 1 ते 42 लाभार्थ्यांचे नावासमोर संबंधितास साहित्य प्राप्त झाल्याबाबत स्वाक्षरी नाहीत. तसेच सदर लाभार्थ्यांचे प्रमाणपत्र व करारनामे उपलब्ध झालेले नाहीत. सबब सभेने निवड केलेल्या व साठा पुस्तकात नमुद लाभार्थ्यांनाच लाभ दिलेला नसल्याचे दिसुन येते याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन लाभार्थी पोच नसतांना वितरीत केलेल्या 420 नग साहित्याची किंमत प्रशासकीय चौकशी करुन रक्कम रुपये 1,97,400/- वसुल वसुल करणे आवश्यक आहे.

9) पंचायत समिती मालेगाव येथील साठा पुस्तकात 11 व पंचायत समिती मंगरुळपीर येथील साठा पुस्तकात 1 लाभार्थीचे पाईप मिळाल्याबाबत स्वाक्षरी पोच नाही. तसेच सदर लाभार्थ्यांचे प्रमाणपत्र व करारनामे उपलब्ध झालेले नाहीत. याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन लाभार्थी पोच नसतांना वितरीत केलेल्या 120 नग साहित्याची किंमत प्रशासकीय चौकशी करुन रक्कम रुपये 56,400/- वसुल करण्यात यावे.

10) पंचायत समिती निहाय साठा पुस्तकाची तपासणी केली असता लेखापरिक्षण दिनांकापर्यत 910 नग एचडीपीई पाईप शिल्लक आहेत. विभागाकडे लाभार्थी निश्चित नसतांना व साहित्याची आवश्यकता नसतांना साहित्याची अनावश्यक खरेदी केली असल्याचे दिसुन येते याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन रुपये 4,27,700/- वसुल वसुल करणे आवश्यक आहे.

11) प्रती लाभार्थी 10 पाईप वितरीत करावयाचे असल्याने विभागाने पुरवठा आदेश 10 च्या पटीत न देता 3191 चा पुरवठा आदेश दिलेला आहे. 1 जास्त पाईप पंचायत समिती मालेगाव ला वितरीत केलेला आहे. पंचायत समितीने 1 नग पाईप वितरीत केल्याचे अभिलेखे नसल्यामुळे रुपये 470/- वसुल वसुल करणे आवश्यक आहे.

12) योजना ज्या वित्तीय वर्षात राबविली त्या वर्षातच वाटप केलेले नाही. योजनेच्या फलश्रृती बाबत अभिलेख नाही.

**3.793 20 टक्के जिल्हा परिषद सेस योजने अंतर्गत 100 टक्के अनुदानावर मागासवर्गीय शेतकऱ्यांना सौर कंदिल पुरविणे योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** जिल्हा परिषद उपकर निधी 20 टक्के जिल्हा परिषद सेस योजने अंतर्गत 100 टक्के अनुदानावर मागासवर्गीय शेतकऱ्यांना सौर कंदिल पुरविणे योजनेकरीता प्रशासकीय तसेच तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सी मेडा यांचे शासन दर करारानुसार ग्लोमिंग पॉवर सिस्टिम यांचे कडुन सोलर कंदिल खरेदी करीता सन 2014-15 मध्ये रुपये 27,87,120/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त-9 दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबवितांना वेळापत्रकाचे पालन केलेले नाही.

2) सुधारीत तरतुद करुन 544 सौर कंदिलांचा पुरवठा आदेश देण्यात आला मात्र 544 लाभार्थींचा ठराव मंजुर लाभार्थी यादी नस्ती मध्ये नाही. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक दिनांक 20/06/2008 नुसार 31 मे पुर्वी लाभार्थी निवड केलेली नाही.

3) समाज कल्याण समिती सभा ठरावामध्ये निवड केलेल्या लाभार्थीची संख्या आहे. मात्र त्याची नावे नमुद नाहीत पात्र अपात्र लाभार्थींची संख्या नाही. व्यापक प्रसिध्दी देवुन लाभार्थी निवड केलेली नाही.

4) पंचायत समिती स्तरावर 20 टक्के मागासवर्गीय व 7 टक्के वन महसुल अंतर्गत प्राप्त साहित्याची एकत्रित नोंद घेतलेली आहे. दोन्ही मिळून लेखापरिक्षण तारखेपावेतो 414 नग शिल्लक आहेत. मंजुर लाभार्थी नसतांना पुरवठा आदेश देवुन साहित्य खरेदी केलेली आहे.

5) पंचायत समिती मानोरा यांना 205 नग सौर कंदिल प्राप्त झालेले आहेत. साठा पुस्तकानुसार ऑक्टोंबर 2015 दुसरे लिपीकास प्रभार देतांना शिल्लक 127 नग पैकी 126 नग प्रभारात दिलेत. कमी देण्यात आलेल्या 1 नग सौर कंदिलाची किंमत रुपये 2,370/- संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन वसुल वसुल करणे आवश्यक आहे.

6) विभागाने साठा पुस्तकात 544 सौर कंदिलाची नोंद नाही. देयकावर साठा पुस्तक पान क्रमांक नमुद नसतांना वित्त विभागाने देयक मंजुर केले आहे. साहित्याची वाहन पावती नस्तीत नाही.

7) पंचायत समिती रिसोड, वाशिम, मालेगाव साठा पुस्तकावर गट विकास अधिकारी यांच्या स्वाक्षरी नाही. साहित्य प्राप्त व वाटप वर दिनांक टाकलेला नाही.

8) पंचायत समिती वाशिम, श्री.कृष्णा शिवा भोसले यांना मंजुर लाभार्थी यादीत नाव नसतांना लाभ दिलेला आहे. तसेच ज्ञानेश्वर विठठल मोरे व धनंजय विठठल मोरे व साहेबराव तुकाराम इंगळे व पांडुरंग तुकाराम इंगळे या एकाच कुटुंबातील दोन व्यक्तींना नियमबाहयपणे लाभ दिलेला आहे. संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन तीन सौर कंदिल किंमत रुपये 7,110/- वसुल करणे आवश्यक आहे.

9) दुबार व वारंवार लाभ दिला जाऊ नये म्हणून गावनिहाय तालुका निहाय मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना नोंदवही ठेवलेली नाही.

10) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 3 व 5 साहित्याचा पुरवठा दिनांक 31/03/2015 चे आत न केल्यास एकुण रक्कमेच्या 0.5 टक्के दराने दंड आकारण्यात येईल पंचायत समिती रिसोड साठा पुस्तकात साहित्य प्राप्त दिनांक 09/06/2015 दाखविली आहे. पंचायत समिती मंगरुळपीर साहित्य प्राप्त दिनांकामध्ये खोडतोड केलेली आहे. सबब सर्व पंचायत समितींना साहित्य उशीराने दिनांक 09/06/2015 ला नऊ आठवडा विलंबाने पुरविण्यात आल्याने प्रति आठवडा 0.5 टक्के दराने दंडाची रक्कम रुपये 58,017/- वसुल करणे आवश्यक आहे.

11) दर करारातील अट क्रमांक 34(a) नुसार साहित्य प्राप्त झाल्यानंतर 90 टक्के रक्कम द्यायची आहे व उर्वरीत 10 टक्के रक्कम सौर कंदिल इन्स्टॉल करुन त्याबाबतचा कमीशनींग रिपोर्ट प्राप्त झाल्यानंतर देणे आवश्यक असतांना रक्कम कमीशनींग रिपोर्ट प्राप्त करवुन न घेता 100 टक्के रक्कम अदा केलेली आहे.

12) साहित्याचा चाचणी अहवाल शासन मान्य संस्थेकडून घेतलेला नाही.

13) आयकराचे अधिनियम 1964 कलम 194 सी नुसार पुरवठा दाराचे देयकातुन 2 टक्के दराने वसुल करणे आवश्यक असतांना प्रमाणक क्रमांक 600 दिनांक 30/03/2015 चे देयकातुन कपात न केलेली आयकर रक्कम रुपये 29,956/- वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**3.794 7 टक्के वन महसुल योजने अंतर्गत आदिवासी शेतकऱ्यांना सौर कंदिल पुरविणे योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** जिल्हा परिषद उपकर निधी 7 टक्के वन महसुल योजने अंतर्गत् आदिवासी शेतकऱ्यांना सौर कंदिल पुरविणे योजनेकरीता प्रशासकीय तसेच तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सी मेडा यांचे शासन दर करारानुसार ग्लोमिंग पॉवर सिस्टिम यांचे कडून सोलर कंदिल खरेदी करीता सन 2014-15 मध्ये रुपये 4,64,520/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त-9 दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबवितांना वेळापत्रकाचे पालन केलेले नाही.

2) 196 लाभार्थीचा निवडीबाबतचा ठराव मंजुर लाभार्थी यादी नस्ती मध्ये नाही. लाभार्थ्यांची निवड न करताच पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक दिनांक 20/06/2008 नुसार 31 मे पुर्वी लाभार्थी निवड केलेली नाही.

3) निवड केलेले लाभार्थी हे उपवनसंरक्षक वनक्षेत्र घोषित गावातील असल्याबाबतचा उल्लेख नस्तीमध्ये तसेच इतीवृत्तामध्ये नोंद नाही. लाभार्थ्यांची नावे इतीवृत्तामध्ये नमुद नाही. मंजुर लाभार्थी यादी उपलब्ध न झाल्यामुळे तसेच पंचायत समिती स्तरावर ठेवलेल्या साठा पुस्तकामध्ये 20 टक्के मागासवर्गीय व 7 टक्के वनमहसुल यामधुन प्राप्त सौर कंदिलांची एकत्रित नोंद घेतलेली असल्यामुळे लाभ देण्यात आलेला लाभार्थी घोषित गावातील आदिवासी लाभार्थी असल्याबाबत तपासणी करता आलेली नाही. सबब ज्या उददेशाने ज्या लाभार्थ्यांना लाभ द्यावयाचा त्यांना दिलेला नाही. योजनेची फलश्रृती झालेली नाही.

4) पंचायत समिती स्तरावर जेवढे साहित्य वाटप झालेले आहे. त्यांचीच यादी आहे. ती देखील तुटक स्वरुपात आहे. पंचायत समिती स्तरावर पुर्ण लाभार्थी यादी नाही. तसेच लेखापरिक्षण तारखेपर्यंत 414 नग साहित्य शिल्लक आहे. म्हणजेच लाभार्थी नसतांना साहित्याचा पुरवठा देवुन अनावश्यक साहित्य खरेदी केलेले आहे.

5) साहित्य प्राप्त झाल्याची वाहन पावती नाही. लाभार्थींना दुबार लाभ देण्यात येवु नये म्हणून गावनिहाय व तालुकानिहाय मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

6) दर करारातील अट क्रमांक 34(a) नुसार साहित्य प्राप्त झाल्यानंतर 90 टक्के रक्कम द्यायची आहे व उर्वरीत 10 टक्के रक्कम सौर कंदिल इन्स्टॉल करुन त्याबाबतचा कमीशनींग रिपोर्ट प्राप्त झाल्यानंतर देणे आवश्यक असतांना रक्कम कमीशनींग रिपोर्ट प्राप्त करवुन न घेता 100 टक्के रक्कम अदा केलेली आहे.

7) साहित्याचा चाचणी अहवाल शासन मान्य संस्थेकडून घेतलेला नाही.

8) आयकराचे अधिनियम 1964 कलम 194 सी नुसार पुरवठा दाराचे देयकातुन 2 टक्के दराने वसुल करणे आवश्यक असतांना प्रमाणक क्रमांक 599 दिनांक 30/03/2015 चे देयकातुन कपात न केलेली आयकर रक्कम रुपये 9,290/- वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**3.795 जिल्हा परिषद उपकर निधी 20 टक्के मागासवर्गीयांचे कल्याणकारी योजना अंतर्गत मागासवर्गीय शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर पॉवर स्प्रेपंप पुरविणे योजनेतील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 30) -** जिल्हा परिषद उपकर निधी 20 टक्के मागासवर्गीयांचे कल्याणकारी योजना अंतर्गत मागासवर्गीय शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर पॉवर स्प्रेपंप पुरविणे योजनेकरीता प्रशासकीय तसेच तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित अकोला यांचे शासन दर करारानुसार विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित अकोला यांचे कडून पॉवर स्प्रेपंप खरेदी करीता सन 2014-15 मध्ये रुपये 14,99,400/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक 2008/प्र.क्र.446/वित्त-9 दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबवितांना वेळापत्रकाचे पालन केलेले नाही.

2) लाभार्थी अर्ज प्राप्त करुन घेणे करीता विभागाने योजनेस व्यापक प्रसिध्दी दिलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक पंरास 2012/प्र.क्र.104/वित्त-3 दिनांक 16/10/2012 मधील सुचनेनुसार लाभार्थ्यांची यादी निश्चित करुन त्यास सभेमध्ये मान्यता घेतलेली नाही. समाजकल्याण समिती सभा दिनांक 12/11/2014 ठराव क्रमांक 5 मध्ये मोघमपणे लाभार्थी संख्या नमुद केलेला आहे. त्यामध्ये निवड केलेल्या लाभार्थ्यांची नावे नाहीत.

4) दुबार व वारंवार लाभ दिला जाऊ नये म्हणून गावनिहाय तालुका निहाय मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना नोंदवही ठेवलेली नाही.

5) प्राप्त अर्ज किती पैकी पात्र अपात्र अर्ज किती यांची तपशिल नस्तीत टिप्पणी नमुद नाही. मंजुर लाभार्थी यादी व अर्ज वारंवार मागणी करुन लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे योजनेच्या प्रशासकीय व तांत्रिक अटी व शर्तीनुसार मागसवर्गीय शेतकऱ्यांनाच योजनेचा लाभ दिला असल्याबाबत तपासणी करता आलेली नाही.

6) पंचायत समितीला प्राप्त लाभार्थी यादी हया सभेने मंजुर केलेल्या लाभार्थी यादी नाहीत. त्यावर समाज कल्याण सभापती व समाज कल्याण अधिकारी यांचे स्वाक्षरी घेवुन पाठविलेल्या आहेत. यादी गट विकास अधिकारी यांचे कार्यालयाचे पत्रानिशी पाठविणे आवश्यक असतांना तसे न करता लाभार्थींच्या यादी जिल्हा परिषदेचे व पंचायत समितीचे सभापती उपसभापती यांचे नावे तुटकपणे दिलेल्या आहेत. जिल्हा परिषदेचे व पंचायत समितीचे पदाधिकारी यांचे वैयक्तीक हितसंबंध जोपासून योजनेचा लाभ दिल्याचे आढळून आले. महाराष्ट्र  जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 277 चा भंग केला आहे.

7) पंचायत समिती मानोरा यांचे साठा व वाटप नोंदवहीची तपासणी केली असता 26 नग वाटपावर संबंधित लाभार्थ्यांच्या पोच घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे निवड केलेल्या लाभाळर्यांनाच लाभ दिलेला नसल्याचे स्पष्ट होत. संबंधित लिपीक यांनी साहित्याचा गैरवापर केला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी याबाबत प्रशासकीय चौकशी करुन निवड यादीतील लाभार्थ्यांनाच साहित्य प्राप्त झाल्याची खात्री पटवावी अन्यथा याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन 26 नग पॉवर स्प्रेची किंमत रक्कम रुपये 1,32,600/- वसुल करणे आवश्यक आहे.

8) लाभार्थ्याकडून घेतलेले प्रतीज्ञापत्र व करारनामे लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

9) साहित्य प्राप्त झाल्यानंतर शासकीय प्रयोगशाळेतुन साहित्य तपासणी करुन वाटप करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

10) पंचायत समिती स्तरावरील साठा पुस्तकांची तपासणी केली असता 36 नग साहित्य शिल्लक आहे. पंचायत समितीकडे मंजुर लाभार्थी यादी नसल्यामुळे साहित्याचा वाटप केलेला नाही. विभागाने आवश्यकतेपेक्षा जास्त साहित्य खरेदी केली असल्याने याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन 36 नग पॉवर स्प्रेअरची रक्कम रुपये 1,83,600/- वसुल करणे आवश्यक आहे.

11) योजनेचा लाभ ज्या वित्तीय वर्षात योजना राबविली त्याच वित्तीय वर्षात दिलेला नाही. योजनेचे फलश्रृतीबाबतचे अभिलेखे नस्तीत उपलब्ध झालेले नाहीत.

**3.796 जंगलभागातील शेतक-यांना 90 टक्के अनुदानावर पी.व्हि.सी पाईप योजना खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदर योजनेवर रक्कम रुपये 13,05,352/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परीपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446 वित्त 9, दिनांक 20/06/2008 च्या अनुषंगाने दिलेल्या वेळाप्रत्रकाचे काटेकोरपणे पालन केले नाही.

2) संबधीत कामे विहीत मुदतीत पुर्ण केले नाही.

3) योजना राबविण्यापुर्वी लाभार्थी हिस्सा प्रथम वसुल करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

4) अर्ज प्राप्त नसतांना प्राप्त तरतुदीच्या अनुषंगाने लाभार्थी संख्या निश्चित करुन रकमा खर्ची टाकल्या आहेत.

5) डिलेव्हरी चलान नुसार साहित्य चांगल्या स्थितीत प्राप्त झाल्याबाबत पडताळणी करता आली नाही तसेच साठा नोंदवही सुध्दा उपलब्ध केले नाही.

6) 10 लाखापर्यंतच्या खरेदी करीता रुपये 100/- वर व त्यापुढील प्रत्येक लाखाला रुपये 100/- या प्रमाणे मुद्रांकित पेपरवर करारनामा करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

**3.797 100% अनुदानावर मागासवर्गीय शेतकऱ्यांना कॅनव्हॉस ताडपत्री पुरविणे खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद बुलढाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशासकीय मंजुर दिनांक 13/06/2014 दिलेली असतांना खरेदी प्रक्रीया विलंबाने केली आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए-2006/ प्रक्रं.446/वित्त-9 दिनांक 20/06/2008 नुसार योजनेचे वेळापत्रक पाळण्यात आले नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए-2009/ प्रक्रं.514/वित्त-9 दिनांक 20 नोव्हेंबर 2009 नुसार 1300/- रुपयाचे मुद्रांक पेपरवर करारनामा करणे आवश्यक असतांना 100/- रुपये मुद्रांक पेपरवर करारनामा केल्यामुळे 1,200/- रुपये चे शासकीय महसुलाचे नुकसान झाले.

4) चाचणी अहवाल नस्तीत उपलब्ध झाले नाहीत.

5) साहीत्य वाटपाचे नियोजन पंचायत समिती स्तरावर व्यवस्थीत न केल्यामुळे बराच काळ साहीत्य पडुन राहते व वेळेवर दुसऱ्या लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो त्यामुळे योजनेचा उददेश सफल होत नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक पीआरसी/1083/ 67 दिनांक 02/07/1993 नुसार लाभार्थ्या कडुन उपयोगीता प्रमाणपत्र घेण्यात आले नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक परास/1096/प्रक्रं.178/05 दिनांक 09/10/1997 नुसार योजनेची व्यापक प्रसिध्दी देणे आवश्यक असतांना तशी प्रसिध्दी देण्यात आली नाही व लाभार्थी निवड ग्रामसभेतुन केली नाही.

**3.798 100% अनुदानावर मागासवर्गीय शेतकऱ्यांना 3 HP मोटारपंप वाटप करणे खर्चातील अनियमितता**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेश दिनांक 20/8/2014 रोजी दिला व मालाचा पुरवठा 45 दिवसात करणे आवश्यक असतांना साहीत्याचा पुरवठा दिनांक 14/10/2014 रोजी म्हणजेच 10 दिवस उशीराने झाल्यामुळे प्रति दिवस 100 रुपये प्रमाणे एकूण 1000/- रुपये दंड अंतीम देयकातुन कपात करणे आवश्यक असतांना कपात करण्यात आला नाही.

2) विदयुत पंपाचे वाटप करतांना विहिरीची नोंद सात/बाराच्या उताऱ्यावर असणे आवश्यक असतांना अनेक लाभार्थ्यांना विहीरीची नोंद नसतांना मोटरपंप वाटप केले आहे. उदा.1) गोविंदा पांडुरंग अंभोरे,टेंभूरखेड, 2) श्री महादू गोविंदा अंभोरे 3)बोधिराम वसंतराव पवार,पारखेड, 4) भिकाजी यादव तेलंग महाळुंगी (पंचायत समिती नांदुरा)

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2009/प्र.क्रं.514/ वित्त 9 दिनांक 29 नोव्हेबर 2009 नुसार 3,900/- रुपय चे मुद्राक पेपरवर करारनामा करणे आवश्यक असतांना 100/- रुपये मुंद्राक करारनामा केल्यामुळे 3,800/- रुपये चे शासकीय महसुलाचे नुकसान झाले.

4) लाभार्थी निवडीस समाज कल्याण समिती सभा ठराव क्रमांक 3 दिनांक 15/07/2014 द्वारे मंजुरी दिली परंतु इतिवृत्त नोंदवहीत लाभार्थ्यांची नावे नाहीत त्यामुळे त्याच लाभार्थ्यास लाभ दिला याबाबत खात्री होत नाही.

5) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीअे 2006/प्र.क्र.446/वित्त 9/ दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषदेच्या वैयक्तिक लाभाच्या योजनेसाठी वेळापत्रक पाळले नाही.

6) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक पीआरसी/ 1083/67/दिनांक 02/07/1993 नुसार लाभार्थी कडुन विनियोजन प्रमाणपत्र घेण्यात आले नाही.

7) योजनेचे मास्टर रजिष्टर उपलब्ध झाले नाही.

8) ग्राम विकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178/05/दिनांक 9/10/1997 नुसार योजनेची व्यापक प्रसिध्दी दिली नाही.

**3.799 स्वर्गीय मारोती मल्हारी देवकते अपंग निवासी विदयालय शेगांव मुल्यनिर्धारण अनुदान खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, समाज कल्याण सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक वीसीएच 1097/प्र.क्र. 107/मावक 4 दिनांक 16 मार्च 1998 मधील क्रमांक 7 (2) नुसार सक्षम अधिकाऱ्याचे 3 भेटीच्या आधारे मूल्यनिर्धारण करणे आवश्यक असताना केवळ एका भेटीच्या आधारे मूल्यनिर्धारण केल्याने जादा प्रदान झाले आहे.

2) महाराष्ट्र शासन, समाज कल्याण सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय बीएसएच 1097/प्र.क्र.107/मावक 4दिनांक 16 मार्च 1998 मधील क्रमांक 8(अ) नुसार मागिल वर्षाच्या मान्य बाबीवरील खर्चावर अनुदान निर्धारण करुन 60% अग्रीम माहे जुन मध्ये व दुसरा हप्ता माहे जानेवारी मध्ये अथवा उशिरात उशिरा मार्च पूर्वी 40% अनुदान वितरीत करणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही केलेली नाही.

### 3.800 अनुसुचीत जाती व नवबौध्द घटकांचा विकास योजने अंतर्गत अपुर्ण कामे पुर्ण न करणेबाबत

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2009-2010 ते 2014-2015 च्या कालावधीतील 153 अपुर्ण असलेली कामे समाज कल्याण विभागाने अथवा पंचायत समितीने योग्य तो पाठपुरावा न केल्याने अपूर्ण राहिलेली आहेत त्यामध्ये एकूण रक्कम रुपये 4,18,56,783/- रक्कम गुंतून पडली आहे.

2) समाज कल्याण अधिकारी जि प बुलडाणा यांनी योजने अंतर्गत झालेल्या बांधकामाची 10% तपासणी करणे आवश्यक असतांना, त्याप्रमाणे तपासणी केली नाही.

3) पूर्ण झालेल्या कामाची उपयोगिता प्रमाणपत्रे, पूर्णत्व प्रमाणपत्रे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

### 3.801 अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध न करणेबाबत

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 26) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सन 2014-2015 या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षण कालावधीत पंचशील मागासवर्गीय मुलांचे वस्तीगृह मलकापुर व सखाराम महाराज वस्तीगृह लोणार चे अभिलेखे (उदा. प्रवेश रजिष्टर, अर्ज, हजेरी भेटीचे विवरण, जमा व खर्च) अर्धसमासपत्र क्रमांक 1 दिनांक 29/10/2015, अर्धसमास पत्र क्रं.9 दिनांक 06/11/2015 व अर्धसमास पत्र क्रमांक 15 दिनांक 17/11/2015 नुसार मागणी करुनही लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत. त्यामुळे प्रमाणक क्रमांक 2885 दिनांक 31/03/2015 रक्कम रुपये 2,28,900/- व प्रमाणक क्रमांक 3051 दिनांक 31/03/2015 रक्कम रुपये 2,34,840/- या द्वारे केलेल्या खर्चाची सत्यता पडताळणी करता आली नाही. लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्याने मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930 (सुधारणा2011) चे कलम 8 नुसार आवश्यक दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक आहे.

### 3.802 मागासवर्गीय शेतकऱ्यांना सिंचनासाठी डिझेल इंजिन पुरविणे योजनेतील अनियमितता.

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** सन 2014-15 या वित्तीय वर्षात 20 टक्के जिल्हा परिषद सेस फंड योजना अंतर्गत 5 H.P. डिझेल इंजिन 187 नग रूपये 24,000/- प्रती नग प्रमाणे खरेदी करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती स्तरावर डिझेल इंजिनची औद्योगिक संस्थेकडून तपासणी करून त्यांचे चाचणी अहवाल घेण्यात आले नाही.

2) मास्टर नोंदवही व लाभार्थी अर्ज लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही.

3) पुरवठा आदेशानुसार 6 आठवड्याच्या आत पुरवठा करावयाचा असतांना पंचायत समिती, नरखेड येथे दीड आठवडे उशिरा पुरवठा करण्यात आलेला आहे. तरी दंडाची रक्कम 0.5 टक्के प्रमाणे रूपये 2,700/- वसुलपात्र आहे.

4) साठा नोंदवहीची तपासणी केली असता पंचायत समिती स्तरावर मंजूर यादीपेक्षा जादा साहित्य पाठविण्यात आले तसेच पंचायत समिती मौदा अंतर्गत वाटपा अभावी शिल्लक डिझेल पंपाची नोंद साठा पुस्तकात

घेण्यात आली नाही. 9 नग डिझेल इंजिन पंचायत समिती स्तरावर 2 वर्षापासून पडून असतांना मंजूर लाभार्थि यादी पेक्षा जास्त डिझेल इंजिनची खरेदी करण्यात आले आहे.

**3.803 मागासवर्गीय शेतकऱ्यांना H.D.P.E. पाइप पुरविणे योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** सन 2014-15 या वित्तीय वर्षात 20 टक्के जिल्हा परिषद सेस फंड योजना अंतर्गत मागासवर्गीय शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर H.D.P.E. पाइप 1,900 नग रूपये 470/- प्रती नग प्रमाणे खरेदी करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मास्टर नोंदवही व लाभार्थी अर्ज लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही.

2) पुरवठा आदेशानुसार 6 आठवड्याच्या आत पुरवठा करावयाचा असतांना पंचायत समिती नरखेड येथे 13 दिवस उशिरा पुरवठा करण्यात आलेला आहे. तरी दंडाची रक्कम 0.5 टक्के दराने रूपये 822/- वसुलपात्र आहे.

3) साठा नोंदवहीची तपासणी केली असता पंचायत समिती स्तरावर मंजूर यादीपेक्षा जादा साहित्य पाठविण्यात आले. 300 नग H.D.P.E. पाईप पंचायत समिती स्तरावर शिल्लक असतांना मंजूर लाभार्थी यादी पेक्षा जास्त H.D.P.E. पाईप खरेदी करण्यात आले आहे.

**3.804 मागासवर्गीय महिलांना पिको फॉल शिलाई मशिन पुरविणे योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** सन 2014-15 या वित्तीय वर्षात 20 टक्के जिल्हा परिषद सेस फंड योजना अंतर्गत पिको फॉल शिलाई मशिन 766 नग रूपये 5,402/- प्रती नग दराप्रमाणे खरेदी करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मास्टर नोंदवही व लाभार्थी अर्ज लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही.

2) पुरवठा आदेशानुसार 6 आठवड्याच्या आत पुरवठा करावयाचा असतांना पंचायत समिती नरखेड येथे 140 दिवस उशीरा पुरवठा करण्यात आलेला आहे. तरी दंडाची रक्क्म 0.5 टक्के दराने रूपये 4,08,538/- वसुलपात्र आहे.

3) पंचायत समिती स्तरावर पिको फॉल शिलाई मशिनची औद्योगिक संस्थेकडून तपासणी न करता त्यांचे चाचणी अहवाल घेण्यात आले नाही.

**3.805 सन 2011-2012 चे वाढीव परिरक्षण (परिपोषण) अनुदानाची थकबाकीचे जादा प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक विभशा 2010/प्र.क्र.6/विजाभज-2,दिनांक 29/12/2011 अन्वये दिनांक 01/01/2012 पासुन शासन मान्य अनुदानीत संस्थांमधील निवासी विद्यार्थ्यांना परिरक्षण (परिपोषण) आहाराचे दर रुपये 630/- वरुन रुपये 900/- दरमाह दरडोई वाढविण्यात आले आहे. जिल्हा परीषद, मुलांचे वसतीगृह, कोंढाळी (काटोल), कवडस (हिंगणा), सिर्सी (उमरेड) या तीन संस्थांनी सन 2011-2012 या शैक्षणीक सत्रात ही थकबाकी दिनांक 01/01/2012 न देता संपुर्ण वर्षाकरीता प्रदान केलेली असल्याने रुपये 1,15,290/- वसुलपात्र ठरतात.

**3.806 औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस प्रदान करण्यात आलेले विद्यावेतन.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, वर्धा येथील सन 2014-2015 या वित्तीय वर्षात शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थींना प्रदान केलेल्या विद्यावेतनासंबंधी अभिलेखे लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले नाही. सदर विभागाने औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पुलगाव, समुद्रपूर, कारंजा (घा), वर्धा, सेलू येथील प्रशिक्षणार्थींना विद्यावेतन प्रदानाकरिता संबंधित संस्थेच्या प्राचार्यांचे नावे धनादेश देण्यात आला आहे. विद्यावेतनासंबंधी अभिलेखे संबंधित संस्थेकडून प्राप्त करून लेखापरीक्षणास सादर करणे आवश्यक होते, याकरिता अर्धसमास पत्र क्रमांक 1 दिनांक 06/04/2016 अर्धसमास पत्र क्रमांक 2 दिनांक 21/04/2016 अर्धसमासपत्र क्रमांक 11, दिनांक २27/04/2016 अर्धसमास पत्र क्रमांक 17 दिनांक

28/04/2016 नुसार मागणी करण्यात आली आहे. तरी महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक लेखाप-2013/प्र.क्र.81/वित्त 5 दिनांक 18/02/2014 अन्वये लेखापरीक्षणासाठी विहित कालावधीत अभिलेखे सादर न करणाऱ्या अधिकारी/कर्मचारीविरुद्ध दंडात्मक व प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**3.807 कमला नेहरु माध्यमीक मुलींचे वसतीगृह पुलगांव यांचे सन 2014-2015 चे परिपोषण अनुदानाबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, वर्धा येथील सन 2014-2015 या वित्तीय वर्षात कमला नेहरू मा.मुलींचे वस्तीगृह पुलगाव वसतीगृह परिपोषण अनुदान निर्धारण नस्ती व संबंधित वसतीगृहाचे अभिलेखे तपासले असता, खालील प्रमाणे जादा परिपोषन अनुदान प्रदान करण्यात आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

कमला नेहरू मा. मुलींचे वस्तीगृह यांचे तीन वेळा प्रत्यक्ष भेटी दरम्यान निदर्शनास आलेल्या संख्येच्या सरासरी नुसार 24 मुलींचे सन 2014-2015 चे परिपोषन अनुदान अनुज्ञेय केले आहे. दिनांक 02/04/2014 ची समाजकल्याण निरीक्षक यांच्या भेटी दरम्यान 23 मुली हजर असल्याची नोंद घेण्यात आली आहे, परंतु वसतीगृहाची दिनांक 02/04/2014 ची मुलींचे उपस्थिती रजिस्टर तपासले असता, दिनांक 02/04/2014 रोजी 19 मुली वसतीगृहात हजर असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे वर्षाच्या सरासरी हजर संख्येवर 2 मुलीचे जादा उपस्थिती झाली आहे. त्यामुळे २ मुलींचे परीपोषण अनुदान रक्कम रुपये 2 x 900 x 10 = 18,000/- जादा प्रदान करण्यात आलेली आहे. तरी वसुलीची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**3.808 औदयोगिक प्रशिक्षण संस्था सेलू येथील मुलांना दुबार विद्यावेतन प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, वर्धा येथील सन 2014-2015 या वित्तीय वर्षात औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील मागासवर्गीय प्रशिक्षणार्थीला देण्यात येणाऱ्या विद्यावेतन देयकाची तपासणी केली असता, विभागाने शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सेलू येथील प्रशिक्षणार्थीला विद्यावेतन प्रदान केले आहे. परंतु दोन्ही प्रशिक्षणार्थीला दोन देयकांची तपासणी केली असता दुबार विद्यावेतन प्रदान करण्यात आल्यांचे दिसुन आले.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथील प्रशिक्षणार्थीची हजेरीपत्रक लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही. दुबार प्रदान करण्यात आलेले विद्यावेतन रक्कम रुपये 6,116/- वसुलीची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**3.809 20 टक्के जिल्हा परीषद सेस फंड योजनेतुन मागासवर्गीय लाभार्थ्यांना सोलर कंदिल वाटपातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, भंडारा येथिल सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की 20 टक्के जिल्हा परिषद सेस फंड अंतर्गत समाजकल्याण विभागाने मागासवर्गिय लाभार्थ्यांना सोलर कंदिल वाटपावर रक्कम रुपये 17,95,986/- एवढा खर्च केलेला आहे.

1) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग झेडपीए/ 2008 दिनांक 20 जुन 2008 अन्वये जिल्हा परिषदेने राबविण्यात येणा-या विविध योजनाचे नियोजन व अंमलबजावणीचे वेळापत्रकाकडे दुर्लक्ष करुन योजना राबविण्यात आल्या आहेत.

2) सदर योजनेकरिता 30 टक्के महिलांना लाभ देणे आवश्यक आहे.

3) सदर योजनेकरिता 3 टक्के अपंगांनासुध्दा लाभ देणे आवश्यक आहे.

4) शासन निर्णय कृषी व पशु विभाग दिनांक 19 सप्टेंबर 2000 नुसार निवड केलेल्या लाभधारकास दिनांक 1 मे 2001 नंतर एकुण अपत्याची संख्या 3 पेक्षा जास्त झाल्यास त्यांना लाभ देवु नये असे स्पष्ट नमुद असतांना 3 पेक्षा जास्त् अपत्य नसल्याचे प्रमाणपत्र सादर केले नाही.

5) पुरवठा आदेश व वाटप दिनांक एकाच तारखेला 31/03/2015 ला आहे.

6) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र.मागास/1093/प्रक्र1239/34, दिनांक 01 सप्टेंबर 1993 नूसार एकाच व्यक्तीस दोन वेगवेगळया योजनांचा लाभ अनुज्ञेय नाही. किंवा एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त व्यक्तींना लाभ अनुज्ञेय नाही. असे असतांना लाभार्थ्यांना लाभ दिलेले आहे. संबंधित लाभार्थ्याकडुन रक्कम रुपये 23,700/- चे वसुलीस पात्र ठरतात.

7) समाज कल्याण समिती यांनी मे. अग्रीन अलाईड नागपुर यांच्याकडुन साहित्य खरेदी करण्याचे ठरविले असतांना मे. बालाजी इंटरप्राईजेस औरंगाबाद यांचेकडुन साहित्य खरेदी करण्याचे प्रयोजन काय? याचे खुलासा करणे आवश्यक आहे.

8) लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ झाल्यास समाज कल्याण अधिकारी यांनी मुल्यांकन अहवाल देणे आवश्यक आहे.

## 3.810 20 टक्के जिल्हा परीषद सेस फंड योजनेतुन मागासवर्गीय लाभार्थ्यांना मच्छीमार व्यवसाय करण्यासाठी नॉयलान जाळी वाटपातील अनियमितता.

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** समाज कल्याण, विभाग जिल्हा परिषद, भंडारा सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, 20 टक्के जिल्हा परिषद सेस फंड अंतर्गत समाजकल्याण विभागाने मागावर्गीय लाभार्थ्यांना मच्छीमार व्यवसाय करण्यासाठी नॉयलान जाळी वाटपावर रक्कम रुपये 19,50,750/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग झेडपीए/ 2008 दिनांक 20 जुन 2008 अन्वये जिल्हा परिषदेने राबविण्यात येणा-या विविध योजनाचे नियोजन व अंमलबजावणी वेळापत्रकाकडे दुर्लक्ष करुन योजना राबविण्यात आल्या.

2) सदर योजनेकरीता 30 टक्के महिलांना लाभ देणे आवश्यक आहे.

3) सदर योजनेकरीता 3 टक्के अपंगांनासुध्दा लाभ देणे आवश्यक आहे.

4) शासन निर्णय, कृषी व पशु विभाग, दिनांक 19 सप्टेंबर, 2000 नुसार निवड केलेल्या लाभ धारकास दिनांक 1 मे, 2001 नंतर एकुण अपत्याची संख्या 3 पेक्षा जास्त झाल्यास त्यांना लाभ देवु नये असे स्पष्ट नमुद असतांना तसे प्रमाणपत्र सादर केले नाही.

5) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र.मागास/1093/प्रक्र1239/34, दिनांक 01 सप्टेंबर 1993 नूसार एकाच व्यक्तिस दोन वेगवेगळया योजनांचा लाभ अनुज्ञेय नाही. किंवा एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त व्यक्तिंना लाभ अनुज्ञेय नाही. असे असतांना 3 लाभार्थ्यांना लाभ दिलेले आहे.

## 3.811 आंतरजातीय विवाहीत जोडप्यांना अर्थसहाय वाटपातील अनियमितताबाबत.

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** शायकीय योजनेअंतर्गत समाजकल्याण विभागाने आंतरजातीय विवाहीत जोडप्यांना प्रति जोडपे रुपये 50,000/- प्रमाणे अर्थसहाय देणेबाबत रक्कम रुपये 39,00,000/- एवढा खर्च केलेला आहे.उयाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

1) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 परिशिष्ट क्रमांक 29 (4) अन्वये आर्थिक अनुदानाचे धनादेश संबधित जोडप्याचे नावे रेखांकित (अकाउंटपेई) करुन न देता धनाकर्षाने नियमबाहय अदा केली आहे.

2) शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग झेडपीए/2008 दिनांक 20 जुन 2008 अन्वये जिल्हा परिषदेने राबविण्यात येणा-या विविध योजनाचे नियोजन व अंमलबजावणी वेळापत्रकाकडे दुर्लक्ष करुन योजना राबविण्यात आल्या आहे.

3) जिल्हा बाहेरील लाभार्थ्यांना लाभ दिल्याने संबंधित जिल्हात लाभ न घेतल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले नाही.

4) सदर योजनेकरिता 3 टक्के अपंगांनासुध्दा लाभ देणे आवश्यक आहे.

5) सन 2014-15 मध्ये किती प्रस्ताव प्राप्त झाले, त्यापैकी मंजुर व नामंजुर किती झाले याची लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

**3.812 समाज कल्याण समिती अभ्यास दौरा.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3)** - प्रमाणक क्रमांक 2609, दिनांक 31/03/2015 रुपये 40,000/- साबरी मिनी ट्रान्सपोर्ट साकरीटोला यांना गोंदिया ते पुणे हिवरेबाजार व परत दोन प्रवासी वाहन भाडयाने दिल्याबाबत रक्कम प्रदान करण्यात आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियमाप्रमाणे रुपये 1,000/- वरील प्रदान रेखांकीत धनादेशाव्दारे करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही नाही. समाजकल्याण समितीने अभ्यास दौरा केल्याबाबतचा अहवाल उपलब्ध नसल्यामुळे रुपये 40,000/- चे प्रदान वसुलपात्र आहे.

**3.813 वसतीगृहाना माहे मार्चमध्ये नियमबाहय अग्रिम प्रदान.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4)** - माहे मार्च 2015 मध्ये वस्तीगृहांना परिपोषणासाठी 60 टक्के अग्रिम प्रदान करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, समाज कल्याण व सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय, क्रमांक बीबीएच 1097/प्र.क्र.107/मावक-4, मंत्रालय मुंबई दिनांक 16/03/1998 मधील परिच्छेद 8 नुसार वसतीगृहाना परिपोषणासाठी 60 टक्के इतकी रक्कम अग्रिम अनुदान म्हणुन जुन मध्ये द्यावयाची असतांना मार्च महिन्यात रुपये 35,10,000/- नियमबाहय देण्यात आलेली आहे. जानेवारी ते मार्च या कालावधीत वसतीगृहाचे अंतिम अनुदान निर्धारण होणे आवश्यक आहे. त्यामुळे वसतीगृहात प्रत्यक्षात विद्‌यार्थी प्रवेशीत होते किंवा नाही. याबाबत चौकशी होणे आवश्यक आहे.

**3.814 इयत्ता 8 ते 10 मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्‌यार्थ्यांना सावित्रीबाई शिष्यवृत्ती योजना**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6)** - सन 2014-2015 या आर्थिक वर्षात सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना अंतर्गत वर्ग 8 ते 10 मध्ये शिकणाऱ्या विद्‌यार्थ्यांच्या खात्यात विभागाने बँकेत रक्कमा जमा केल्या. परंतु बँकेने 96 विद्‌यार्थ्यांच्या खात्यात रक्कमा जमा न करता त्या बँकेतच पडून आहेत. रुपये 96,000/- प्राप्त करुन शासन शिर्षात जमा करावी.

**3.815 इयत्ता 9 वी ते 10 मधील विद्‌यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** सन 2014-2015 या आर्थिक वर्षात इयत्ता 9 ते 10 विद्‌यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत विद्‌यार्थ्यांच्या खात्यात विभागाने बँकेत रक्कमा जमा केल्या. परंतु बँकेने 101 विद्‌यार्थ्यांच्या दिलेल्या यादीनुसार रक्कमा खात्यावर जमा केल्या नाहीत. त्यामुळे रुपये 2,27,250/- प्राप्त करुन शासन शिर्षात जमा करावी.

**3.816 मागासवर्गीय वसतीगृहांना अनुदान प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** प्रमाणक क्रमांक 3044 दिनांक 31/03/2015 रुपये 1,90,600/- बाबत तपासणी केली असता संस्थेला रुपये 1,96,827/- देणगी प्राप्त झाली. महाराष्ट्र शासन, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व कल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीएच 1097/ प्र.क्र. 107/ मावक, मुंबई, दिनांक 16/03/1998 अन्वये वसतीगृहाला देणगी घेता येत नाही. त्यामुळे देणगीची रक्कम विभागाने अंतिम अनुदान निर्धारणातून वजा करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही नाही. झालेले जादा प्रदान रुपये 1,96,827/- वसुल करण्यात यावी.

**3.817 वसतीगृहांना शासनाचे निर्देशाविरुद्ध प्रवेश अनुदानाचे रक्कम प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. बीसीएच.2007/ प्र.क्र. 361/ मावक-4, मुंबई, दिनांक 23/11/2007 अन्वये वसतीगृहाच्या मान्य संख्येच्या अनुसूचित जाती 48%, अनुसूचित जमाती 37%, विमुक्त व भटकया जमाती 13%, विशेष मागास प्रवर्ग 2% या प्रमाणात प्रवेश देणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही केली नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. बीसीएच 2006/ प्र.क्र. 150/ मावक-4, मुंबई, दिनांक 3 मे, 2006 अन्वये समाजकल्याण अधिकारी यांनी अंतिम अनुदान देण्याचे अगोदर मंजूरी प्राप्त करुन प्रदान करणे आवश्यक असतांना तसे न करता 80 विद्यार्थ्यांना प्रतिमाह रुपये 900x10x80 विद्यार्थी = रुपये 7,20,000/- जादा प्रदान झालेले आहे.

**3.818 90 टक्के अनुदानावर पिकोफॉल शिलाई मशीन खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** जिल्हा निधी अंतर्गत लार्भार्थ्यांना 90 टक्के अनुदानावर मे. वर्धमान इंडस्ट्रीज, चंद्रपूरकडुन पिकोफॉल शिलाई मशीन खरेदी करुन वाटप करणेबाबतचा रुपये 19,98,612/- चा खर्च दिनांक 31/03/2015 मध्ये केलेला आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परीपत्रक झेडपीए/2006/प्र.क्र.366/वित्त 9, दिनांक 31/12/2009 नुसार दैनिक व 2 साप्ताहीकात जाहीरात दिल्याचे प्रमाणित रोस्टर नोंदवही व वृत्तपत्राचे कात्रण उपलब्ध नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय संकीर्ण/2010/275/प्र.क्र.172 पं.रा.स.7, दिनांक 19/10/2011 मधील 10 नुसार पुरवठादाराकडुन पतदारी प्रमाणपत्र घेतले नाही.

3) ई टेंडर भरल्याच्या व मंजुर केल्याबाबत कोणतेही अभिलेख व दस्तऐवजाच्या सत्यप्रती लेखापरीक्षणास उपलब्ध झाल्या नाही.

4) करारनामा दिनांक 2/02/2012 च्या कालबाहय झालेल्या मुद्रांकावर केलेला आहे. त्यावर पुरवठादार व समाजकल्याण अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय झेडपीए/2009/प्र.क्र.514/वित्त-9, दिनांक 26/11/2009 नुसार रुपये 1,100/- च्या महसुल मुद्रांकावर करारनामा करण्यात यावा किंवा रुपये 1,100/- वसुल करण्यास यावे.

5) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 3 नुसार पुरवठादाराकडुन सुरक्षा अनामत 3 टक्के रक्कम रुपये 66,633/- वसुल करण्यात आलेली नाही.

6) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे एकत्रित पुरवठा आदेश क्रमांक 26, दिनांक 08/01/2015 अट क्रमांक 9 नुसार बीलावर साहीत्याची मुळ किंमत व विक्रीकर दर्शविणे आवश्यक आहे. परंतु मे. वर्धमान, चंद्रपूर यांनी दिलेले बील त्याप्रमाणे नसतांना मंजुर केलेले आहे.

7) महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधिनियम 2002 च्या ‘शेडुल्ड सी’ नुसार शिलाई मशीन या साहीत्यावर मुल्यवर्धीत कर साहीत्य किमतीच्या 5 टक्के प्रमाणे रुपये 99,931/- वसुल करुन संबंधीत लेखाशिर्षात जमा करावे.

8) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 सी नुसार आयकर दिलेल्या प्रदान रकमेच्या 2 टक्के प्रमाणे रुपये 39,972/- वसुल करुन संबंधीत लेखाशिर्षात जमा करावे.

9) साहीत्याची गुणवत्ता तपासणी झाल्यानंतर बील अदायगी करणे आवश्यक असतांना शासकीय यंत्रणेकडुन साहीत्याचा टेस्टरिर्पाट घेतलेला नाही.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परीपत्रक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20 जुन 2008 च्या ‘परीशिष्ट ई’ नुसार दिलेले वेळापत्रकाचे पालन केलेले नाही.

11) साहीत्य खरेदीपुर्वी 10 टक्के लाभार्थी हिस्सा प्राप्त केला नाही व साहीत्य लाभार्थ्यांला सुस्थीतीत मिळाल्याबाबत लाभार्थ्यांकडुन दिनांकीत पोहोच पावत्या घेतल्या नाहीत.

12) सहसंचालक, उद्योग यांचे पत्र क्रमांक 1650, दिनांक 13/02/2014, पत्र क्रमांक बी-55 दिनांक 20/01/2015, पत्र क्रमांक सी-403 दिनांक 21/01/2015 नुसार शिलाई मशीन चे सन 2013-2014 व 2014-2015 मध्ये दरकरार उपलब्ध असतांना तसेच दरकरारामध्ये वस्तु गुणवत्तापुर्ण व कमी किमतीत उपलब्ध असतांना बाह्य पुरवठादाराकडुन वस्तु खरेदी करण्याचे औचीत्य काय याबाबत चौकशी होणे आवश्यक वाटते.

13) विहित कालावधीत प्रत्येक पंचायत समितीनिहाय साहीत्य प्राप्त झाल्याबाबत पंचायत समितीचे साठापुस्तक लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

14) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/109/1239, दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवली नाही. त्यामुळे एकाच लाभार्थ्यांला दुबार लाभ दिल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**3.819 90 टक्के अनुदानावर स्प्रेपंप खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा निधी अंतर्गत लाभार्थ्यांना 90 टक्के अनुदानावर महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाकडुन दरकरारावर स्प्रेपंप खरेदी करुन वाटप करणेबाबत रुपये 9,98,290/- चा खर्च दिनांक 29/12/2014 मध्ये केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय झेडपीए/2009/प्र.क्र.514/वित्त-9, दिनांक 26/11/2009 नुसार महसुल मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असतांना तसा करारनामा केलेला नाही.

2) महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधिनियम 2002 च्या 'शेडुल्ड सी' नुसार स्प्रेपंप या साहीत्यावर मुल्यवर्धीत कर साहीत्य किमतीच्या 5 टक्के प्रमाणे रुपये 49,915/- वसुल करुन संबंधीत लेखाशिर्षात जमा करावे.

3) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 सी नुसार आयकर दिलेल्या प्रदान रकमेच्या 2 टक्के प्रमाणे रुपये 39,972/- वसुल करुन संबंधीत लेखाशिर्षात जमा करावे.

4) साहीत्याची गुणवत्ता तपासणी झाल्यानंतर बील अदायगी करणे आवश्यक असतांना स्थानिक शासकीय यंत्रणेकडुन साहीत्याचा टेस्ट रिपोर्ट घेतलेला नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परीपत्रक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20 जुन, 2008 च्या 'परीशिष्ट ई' नुसार दिलेले वेळापत्रकाचे पालन केलेले नाही.

6) साहीत्य खरेदीपुर्वी 10 टक्के लाभार्थी हिस्सा प्राप्त केला नाही व साहीत्य लाभार्थ्याला सुस्थितीत मिळाल्याबाबत लाभार्थ्याकडुन दिनांकीत पोहोच पावत्या घेतल्या नाहीत.

7) विलंब पुरवठयाबाबत प्रतिदीन 200/- प्रमाणे रुपये 4,400/- दंड आकारला व जमा केला आहे. तथापि महाराष्ट्र शासन, कृषि विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-2013/ प्र.क्र.158/11,दिनांक 27/09/2013 मधील प्रपत्र 2 च्या 8 नुसार विलंब शुल्क औजार किमतीच्या 3 टक्के प्रमाणे दर रुपये 3,990/- नग 278= रुपये 11,09,220/- च्या 3 टक्के प्रमाणे रुपये 33,277/- वसुल करणे आवश्यक असतांना फक्त रुपये 4,400/- वसुल केलेले आहेत. त्यामुळे 3 टक्के प्रमाणे फरकाची दंड रक्कम रुपये 28,877/- संबंधीतांकडुन वसुल करण्यात यावी.

8) महाराष्ट्र शासन, कृषी विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-2013/प्र.क्र.158/11, दिनांक 27/09/2013 मधील प्रपत्र 2 च्या 19 नुसार सदर साहीत्याचे दर खुल्या बाजारातील दरापेक्षा जास्त नाहीत याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांने प्रमाणपत्र दिलेले नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/109/1239, दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवली नाही. त्यामुळे एकाच लाभार्थ्याला दुबार लाभ दिल्याची शक्यता नाकारता येत नाही.

10) पात्र असलेल्या लाभार्थ्यांच्या मंजुरीचे प्रस्ताव उपलब्ध नाही. त्यामुळे मंजुर असलेल्या लाभार्थ्यालाच लाभ दिल्याबाबत लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही.

**3.820 मागासवर्गीय अल्पभूधारक शेतकऱ्यांना 90 टक्के अनुदानावर लोखंडी बैलबंडी खरेदीतील अनयिमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** जिल्हा निधी अंतर्गत लाभार्थ्यांना 90 टक्के अनुदानावर महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ कडुन दरकरारावर लोखंडी बैलबंडी खरेदी करुन वाटप करणेबाबतचा रुपये 44,49,600/- चा खर्च दिनांक 31/03/2015 मध्ये केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय झेडपीए/2009/प्र.क्र.514/वित्त - 9, दिनांक 26 नोव्हेंबर, 2009 नुसार रुपये 4,100/- च्या महसुल मुद्रांकावर करारनामा केलेला नाही.

2) महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधिनियम 2002 च्या 'शेड्युल्ड सी' नुसार स्प्रेपंप या साहीत्यावर मुल्यवर्धीत कर साहीत्य किमतीच्या 5 टक्के प्रमाणे रुपये 2,22,480/- वसुल करुन संबंधीत लेखाशिर्षात जमा करावे.

3) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 सी नुसार आयकर दिलेल्या प्रदान रकमेच्या 2 टक्के प्रमाणे रुपये 88,992/- वसुल करुन संबंधीत लेखाशिर्षात जमा करावे.

4) विहीत मुदतीत पुरवठा न झाल्यामुळे दिनांक 16/02/2015 ते 30/03/2015 पर्यंतच्या 43 दिवस विलंब पुरवठ्याबाबत प्रतिदिन 200/- प्रमाणे रुपये 8,600/- दंड आकारला व जमा केला आहे. वास्तविकत: दिनांक 18/01/2015 पासुन दिनांक 31/03/2015 पर्यंत 72 दिवस विलंब पुरवठ्याबाबत प्रतिदीन 200/- प्रमाणे रुपये 14,400/- दंड आकारणे आवश्यक होते. तथापि महाराष्ट्र शासन, कृषी विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-2013/प्र.क्र.158/11, दिनांक 27 सप्टेंबर, 2013 मधील प्रपत्र 2 च्या 8 नुसार विलंबशुल्क औजार किमतीच्या 3 शुल्क प्रमाणे दर रुपये 16,000/- x नग 309 = रुपये 49,44,000/- च्या 3 टक्के प्रमाणे रुपये 1,48,320/- वसुल करणे आवश्यक असतांना फक्त रुपये 8,600/- वसुल केलेले आहेत. त्यामुळे 3 टक्के प्रमाणे फरकाची दंड रक्कम रुपये 1,39,720/- संबंधीतांकडुन वसुल करण्यात यावी.

5) साहीत्याची गुणवत्ता तपासणी झाल्यानंतर बील अदायगी करणे आवश्यक असतांना स्थानिक शासकीय यंत्रणेकडुन साहीत्य योग्य दर्जाचे व वजनाचे असल्याबाबत खात्री न करताच टेस्ट रिपोर्ट घेणे ही बाब शंकास्पद आहे. त्यामुळे खरेदी केलेली लोखंडी बैलबंडी ही योग्य दर्जाची व वजनाची होती याबाबत खात्री होत नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परीपत्रक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 च्या 'परीशिष्ट इ' नुसार दिलेले वेळापत्रकाचे पालन केलेले नाही.

7) साहीत्य खरेदीपुर्वी 10 टक्के लाभार्थी हिस्सा प्राप्त केलेला नाही. लाभार्थ्याला साहित्य सुस्थितीत मिळाल्याबाबत लाभार्थ्यांकडुन दिनांकीत पोहोच पावत्या घेतल्या नाहीत.

8) महाराष्ट्र शासन, कृषी विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ 2013/प्र.क्र.158/11, दिनांक 27/09/2013 मधील 'प्रपत्र 2' च्या 19 नुसार सदर साहीत्याचे दर खुल्या बाजारातील दरापेक्षा जास्त नाहीत याबाबत संबंधीत अधिकाऱ्याने प्रमाणपत्र दिलेले नाही.

9) लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवली नाही. पात्र असलेल्या लाभार्थ्यांच्या मंजुरीचे प्रस्ताव उपलब्ध नाही.

**3.821 सन 2013-2014 मधील मंजुर अल्प भूधारक शेतकऱ्यांना 90 टक्के अनुदानावर ऑईल इंजीन खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** जिल्हा निधी अंतर्गत लाभार्थ्यांना 90 टक्के अनुदानावर महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळकडुन दरकरारावर ऑईल इंजीन खरेदी करुन वाटप करणेबाबतचा सन 2013-2014 मधील मंजुर खर्च रुपये 24,96,600/- चा खर्च दिनांक 12/08/2014 मध्ये केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2013-2014 मधील मान्य झालेला खर्च सन 2014-2015 मध्ये करतांना खर्चाच्या पुनर्विनियोजनास मान्यता घेतल्याचे लेखापरीक्षणास निदर्शनास आले नाही. रक्कम मंजुरी आदेशावर जावक क्रमांक व दिनांक नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय झेडपीए/2009/प्र.क्र.514/वित्त-9, दिनांक 26/11/2009 नुसार 1600/- च्या महसुल मुद्रांकावर करारनामा केलेला नाही.

3) महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधिनियम 2002 च्या 'शेडयुल सी' नुसार ऑईल इंजीन या साहीत्यावर मुल्यवर्धीत कर साहीत्य किंमतीच्या 5 टक्के प्रमाणे रुपये 1,24,830/- वसुल करुन संबंधीत लेखाशिर्षात जमा करावे.

4) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 सी नुसार आयकर दिलेल्या प्रदान रकमेच्या 2 टक्के प्रमाणे रुपये 49,932/- वसुल करुन संबंधीत लेखाशिर्षात जमा करावे.

5) साहीत्याची गुणवत्ता तपासणी झाल्यानंतर बिल अदायगी करणे आवश्यक असतांना स्थानिक शासकीय यंत्रणेकडुन साहीत्याचा टेस्ट रिर्पोट घेतलेला नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परीपत्रक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20 जुन, 2008 च्या 'परीशिष्ट इ' नुसार दिलेले वेळापत्रकाचे पालन केलेले नाही.

7) साहीत्य खरेदीपुर्वी 10 टक्के लाभार्थी हिस्सा प्राप्त केलेला नाही. साहीत्य लाभार्थ्याला सुस्थितीत मिळाल्याबाबत लाभार्थ्यांकडुन दिनांकीत पोहोच पावत्या घेतल्या नाहीत. लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवली नाही.

8) विलंब पुरवठयाबाबत प्रतिदीन 200/- प्रमाणे रुपये 17,600/- दंड आकारला आहे. तथापि महाराष्ट्र शासन, कृषी विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-2013/प्र.क्र.158/11, दिनांक 27 सप्टेंबर, 2013 मधील 'प्रपत्र 2' च्या 8 नुसार विलंब शुल्क औजार किंमतीच्या 3 टक्के प्रमाणे प्रती साहीत्य दर रुपये 19,000/- x नग 146= रुपये 27,74,000/- च्या 3 टक्के प्रमाणे रुपये 83,220/- वसुल करणे आवश्यक असतांना फक्त रुपये 17,600/- वसुल केलेले आहेत. त्यामुळे 3 टक्के प्रमाणे फरकाची दंड रक्कम रुपये 65,620/- संबंधीतांकडुन वसुल करण्यात यावी.

9) महाराष्ट्र शासन, कृषी विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-2013/प्र.क्र.158/11, दिनांक 27 सप्टेंबर, 2013 मधील 'प्रपत्र 2' च्या 19 नुसार सदर साहीत्याचे दर खुल्या बाजारातील दरापेक्षा जास्त नाहीत. याबाबत संबंधीत अधिकाऱ्याने प्रमाणपत्र दिलेले नाही.

10) पात्र असलेल्या लाभार्थ्यांच्या मंजुरीचे प्रस्ताव लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाहीत.

**3.822 अपंग व्यक्तीकरीता स्कुटर खरेदीमधील अनियमितता.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** अपंग व्यक्तीकरीता स्कुटर खरेदी करणेसाठी प्रमाणक क्रमांक 1373, दिनांक 31/03/2015 रुपये 1,96,852/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मविशे 10/2005/प्र.क्र.197/आस्था-3, मुंबई, दिनांक 14/07/2005 अन्वये सामाजिक न्याय विभागाच्या नियंत्रणाखाली" अपंगाच्या कल्याणाच्या सर्व योजना " या विषयाच्या पर्यवेक्षणाचे काम अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांच्या ऐवजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे सोपविण्यात आलेला आहे. परंतु सदर निर्णयान्वये कार्यवाही न करता सदर योजना राबवितांना समाज कल्याण अधिकारी, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद गडचिरोली यांनी संपुर्ण कार्यवाही स्वत: केली असल्याने नियमबाहयता झाल्याचे आढळुन आली आहे.

2) लाभार्थी निवड यादीमध्ये लाभार्थी ताराचंद खडसे वैरागड यांचा अर्ज प्राप्त नसतांनाही लाभार्थी म्हणुन निवड करुन लाभ देण्यात आल्याचे आढळुन आले नाही.

3) नियम अटी व शर्ती नुसार लाभार्थी हा दृष्टीदोष नसलेला असावा. परंतु दोन लाभार्थीचे ताराचंद खडसे व सौ.क्ल्पना रैनु उसेंडी यांची दृष्टीदोष नसल्या बाबतचे प्रमाणपत्र प्राप्त नाही.

4) लाभार्थी निवड दिनांक 27/02/2015 रोजी करण्यात आली असुन, लाभार्थी निवड होण्यापुर्वीच निवीदा मागविणे, व पुरवठा आदेश देण्याची प्रक्रिया दिनांक 04/12/2014 व 22/12/2014 मध्ये करण्यात आल्याने नियमबाहयता झालेली आहे.

5) लाभार्थी क्रमांक (3) ज्ञानेश्वर श्रीरंग लांजेवार, वडधा यांचे अपंग असल्याचे जिल्हा शल्यचिकीत्सकाचे प्रमाणपत्र अस्पष्ट असुन अवाचणीय आहे. तसेच सदर प्रमाणपत्र साक्षांकित करण्यात आलेले नाही. तरी सुध्दा लाभ दिल्याचे आढळुन आलेले आहे.

6) निविदा मागविणे, निविदा प्राप्त होणे यामध्ये स्कुटर विथ ॲडप्शन नमुद आहे. तसेच अजिंकर ॲटोमोबाईल,चंद्रपुर यांचे दर हे स्कुटर विथ ॲडाप्शन ऑनरोडची किंमत रुपये 49,213/- दर्शविली आहे. परंतु चार स्कुटर ह्या विना ॲडाप्शननी पुरवठा केल्याने माल पुर्ण प्राप्त नसतांनाही सदर विक्रेत्यास संपुर्ण रक्कम प्रदान केल्याचे आढळुन आले आहे.

**3.823 अर्चना मुलींचे वसतीगृह ठाणेगावचे इमारत भाडे प्रदान मधील अनियमितता.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 21) -** अर्चना मुलींचे वस्तीगृह ठाणेगावचे इमारत भाडे प्रदानासाठी रुपये 3,40,117/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, समाजिक न्याय व सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक.बीसीएल 1097/प्र.क्र.107/मान क्रमांक-4, दिनांक 16/031998 जोडपत्र अ मधिल परिच्छेद 8 (2) नुसार अनुदानित वसतीगृहातील प्रवेशीत प्रती विद्यार्थी किमान 24 चौरस फुट व कमाल 40 चौरस फुट क्षेत्रफळानुसार अनुज्ञेय ठरते.

2) सदर वसतीगृहात मान्य विद्यार्थी संख्या 24 असुन प्रती विद्यार्थी कमाल अनुज्ञेय क्षेत्रफळानुसार एकुण प्रत्यक्ष अनुज्ञेय क्षेत्रफळ 960 चौरस फुट ठरते.

3) कार्यकारी अभियंता यांनी प्रमाणीत क्षेत्रफळ 1215.63 चौरस फुट केले आहे. प्रमाणीत क्षेत्रफळामधून कमाल 960 चौरस फुट क्षेत्रफळ वजा करता 255.63 चौरस फुट क्षेत्रफळ जादा होत आहे. त्यामुळे जादा क्षेत्रफळ 255.63 चौरस फुट वर प्रती चौरस क्षेत्र मासिक भाडे रुपये 7.45 प्रमाणे 1904.44 चे एकुण 50 महिने 15 दिवसाचे 96174.22 चे 75 टक्के = 72130.66 म्हणजेच एकुण रक्कम रुपये 7,213/- चे जादा प्रदान झालेले आहे.

**3.824 अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा कमी / जास्त खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परीषद औरंगाबाद सन 2014-2015 मध्ये प्राप्त तरतुद व खर्चाचे लेखापरीक्षण केले असता, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 66 व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 136 नुसार प्राप्त तरतुदीपेक्षा कमी जास्त खर्चाचे विवरणपत्र तयार करून जिल्हा परिषदेची मंजूरी घेणे आवश्यक असून मान्यता घेण्यात आली नाही.

2) विनियोजन लेखे सन 2014-2015 अनुक्रमांक 4 वरील आंतरजातीय विवाह सन 2013-2014 ची अखर्चित रक्कम रुपये 26,62,500/- यातून रुपये 1,00,000/- खर्च नोंदविला आहे. शिल्लक अखर्चित रक्कम रुपये 25,62,500/- संबंधित लेखाशिर्षाखाली शासन खाती भरणा केलेली नाही.

3) विनियोजन लेखे सन 2014-2015 अनुक्रमांक 11 वरील अस्वच्छ व्यवसाय शिष्यवृत्ती सन 2013-2014 अखर्चित रक्कम रुपये 89,81,300/- यातून रुपये 55,61,100/- खर्च नोंदविलेला आहे. शिल्लक अखर्चित रक्कम रुपये 34,20,200/- संबंधित लेखाशिर्षाखाली शासन खाती भरणा केलेली नाही. तसेच इतर अखर्चित अनुदानाच्या रक्कमा शासन खाती भरणा करण्यात आलेल्या नाहीत.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे अनुसुची 11 मधील तरतुदीनुसार संवितरणासाठी आवश्यक असल्याशिवाय रक्कमा आहरीत करू नये अशा सुचना असतांना जादा रक्कमा आहरित केलेल्या आहेत तरी अखर्चित रक्कम तात्काळ शासन खाती भरणा करण्याबाबतची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**3.825 ग्रामिण भागातील मागासवर्गीय लाभार्थ्यांना 100 टक्के अनुदानावर झेरॉक्स मशिन पुरविणे.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परीषद औरंगाबाद सन 2014-2015 मध्ये जिल्हयातील 55 मागासवर्गीय लाभार्थ्यांना प्रति नग रक्कम रुपये 53,582/- प्रमाणे रक्कम रुपये 29,47,010/- रक्कमेचे झेरॉक्स मशिन वाटपावर खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2000/प्र.क्र.41/33, दिनांक 17/01/2001 अन्वये योजना विहित कालावधीत राबविलेली नाही. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178/05, दिनांक 07/10/1997 नुसार खरेदी साहित्याचे वाटप त्याच वर्षात केले असल्याचे अभिलेखे उपलब्ध केलेले नाहीत.

2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.78/05, दिनांक 09/10/1987 नुसार वैयक्तीक लाभाच्या योजना राबविण्यापुर्वी लाभार्थ्यांची निवड प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर साहित्य खरेदी प्रक्रिया पुर्ण करणे आवश्यक असुन अशी कार्यवाही केलेली नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास-1093/सीआर-1265/34,दिनांक 09/12/2003 नुसार 30 टक्के महिला लाभार्थींना लाभ दिला असल्याचे अभिलेखे दर्शविले नाही. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास-1098/646/26/34, दिनांक 29/07/1989 अन्वये जिल्हा परिषदे मार्फत राबविण्यात येणा-या योजनांच्या फलश्रुतीचे मुल्यमापन केलेले नाही.

**3.826 मागासवर्गीयांना 100 टक्के अनुदानावर मिनी पिठाची गिरणी पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदर योजनेवर रक्कम रुपये 9,94,320/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए-10/2001/प्र.क्र.206/5, दिनांक 06/11/2001 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना राबवितांना पाळावयाचे वेळापत्रकानुसार योजना राबविली नाही. त्यामुळे निधी गुंतूण राहुन त्या वित्तीय वर्षात निधीचा विनियोग योग्य झाला असे म्हणता येणार नाही

2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक पंरास/1093/प्र.क्र.78/05, दिनांक 09/10/1987 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना राबवितांना लाभार्थी निवड प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर साहित्य खरेदी व वस्तुचे वाटप त्याच वित्तीय वर्षात करणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक मागास-1093/ प्र.क्र.1265/34, दिनांक 09/12/2003 नुसार लाभार्थ्यांमध्ये 30 टक्के महिलांचा समावेश असणे आवश्यक होते. असा समावेश आढळला नाही.

4) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास 1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थी यादी गावनिहाय ठेवून मास्टर नोंदवही ठेवायची असून त्यानुसार दुबार लाभ न दिल्याची खात्री होवू शकते. पंचायत समिती निहाय गट स्तरावर अशी नोंदवही ठेवल्याचे दिसून येत नाही.

5) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/विअ-9,दिनांक 20/06/2008 अन्वये 31 जानेवारी पर्यंत साहित्याचा पुरवठा करुन देयके अदा करुन 31 मार्च पर्यंत विनियोगाचे दाखले प्राप्त करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झाली नाही.

**3.827 मागासवर्गीयांना 100 टक्के अनुदानावर पाच एच पी डिझेल इंजिन पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदर योजनेवर रक्कम रुपये 69,84,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन कृषी पशुसवंर्धन दुग्धव्यवसाय विभाग व मत्स्यव्यवसाय विभाग निर्णय क्रमांक सुकृऔ-2013/प्र.क्र.158/11-ए,दिनांक 27/09/2013 चे प्रपत्र 1 व 2 चे दरकरार यादी सन 2013-14 करिता, नुसार सन

2014-15 या वित्तीय वर्षाची डिझेल इंजिन प्रतीनग रुपये 24,000/- या दराने खरेदी केली. या दरापेक्षा जर सन 2014-15 चा दरकरार कमी रक्कमेचा झाला तर फरकाची रक्कम वसूल करणे करीता रुपये 100/- च्या स्टम्प पेपर वर पुरवठादाराशी करार नामा करावा असे संचिकेतील टिपण्णी मध्ये नमूद करुनही, पुरवठादारांशी करारनामा केलेला नाही.

2) जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी त्यांच्या उत्पन्नाच्या किमान 20 टक्के रक्कमेतून मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी घ्यावयाच्या योजना ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मध्ये नमूद असून याच शासन निर्णयामध्ये मुद्दा क्र. 1.1 ते 1.5 पैकी, मुद्दा क्र. 1.5 हा लाभार्थी निवडीची कार्यपध्दती नमूद केली आहे. यामध्ये अनु क्र. 1 ते 9 उपमुद्दे असून त्यानूसार लाभार्थ्यांची निवड करावयाची आहे. या उपमुद्दयातील मुद्दा क्र. 2 हा लाभार्थीची निवड ग्रामसभेमध्ये करण्यात यावी.

उक्त नमूद शासन निर्णय दिनांक 20/10/1999 मधील कार्यपध्दतीनूसार लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली नाही.

3) प्र.क्र. 63/29/01/2015 व्दारे 83 नग डिझेल इंजिन खरेदी केले त्यामध्ये या 83 नग खरेदी प्रक्रिया व प्रत्यक्ष पुरवठा दिनांकाला 83 लाभार्थ्यांची निवड न करताच खरेदी केल्याचे दिसून येते.

**3.828 मागासवर्गीय शेतकऱ्यांना सुक्ष्म सिंचन अभियानांतर्गत 50 टक्के मर्यादित पूरक अनूदान मंजूरबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदर योजनेवर रक्कम रुपये 3,35,248/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ज्या मागासवर्गीय शेतकऱ्यांनी राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियान अंतर्गत ठिंबक सिंचन संच 50 टक्के सबसिडी सन 2012-13 या वित्तीय वर्षात प्राप्त केली जिल्हा अधिक्षक कृषी कार्यालय जालना महाराष्ट्र शासन यांचेकडील लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांची यादी प्राप्त करुन त्यातील सात शेतकरी यांना खालील प्रमाणे अनुदान वाटप केले आहे.

| | |
|---|---|
| 1) श्री नंदकिशोर छगन तुपसौंदर | रुपये 43,833/- |
| 2) सौ. इंदूबाई विठ्ठलराव तुपसौंदर | रुपये 63,635/- |
| 3) श्री शिवाजी छगन तुपसौंदर | रुपये 39,144/- |
| 4) राजेंद्र साहेबराव तुपसौंदर | रुपये 43,000/- |
| 5) पांडूरंग हरीभाऊ तुपसौंदर | रुपये 58,532/- |
| 6) बाबासाहेब हरीभाऊ तुपसौंदर | रुपये 43,323/- |
| 7) मार्केस साहेबराव तुपसौंदर | रुपये 43781/- |
| | रुपये 3,35,248/- |

वरील सर्वजण राहणार पानेगाव ता. अंबड शेतजमीन गट क्र. 286 एकूण क्षेत्र 8 हेक्टर 12 आर या एकाच गटाची 7/12 या सर्वांची आहे. यापैकी अनू क्र. 1 व 3 हे सखे भाऊ अनू क्र. 5 व 6 सखे भाऊ, अनू क्र. 4 व 7 हे सखे भाऊ व एकाच कुंटूबातील दिसून येतात.

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी त्यांच्या उत्पन्नाच्या किमान 20 टक्के रक्कमेतून मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी घ्यावयाच्या योजना ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/74,दिनांक 20/10/1999 यातील परिच्छेद क्र. 8 नूसार शासकीय अनूदान प्राप्त मागासवर्गीयांच्या योजनासाठी 20 टक्के रक्कमेतून तात्पूरता सुध्दा खर्च न करण्याबाबत असून मागासवर्गीयासाठी असलेल्या ज्या योजनांना शासकिय अनूदान प्राप्त होते किंवा ज्या योजनेमध्ये मागासवर्गीयांना मान्य प्रमाणात मदत मिळते. अशा योजनासाठी जिल्हा परिषदांना स्वत:च्या उत्पन्नातील 20 टक्के रक्कमेतून तात्पूरता सुध्दा खर्च करणे ही बाब तत्वत: उचित होणार नाही.

असे स्पष्ट नमूद असतांना ज्या लाभार्थ्यांनी शासकीय योजनेतून लाभ घेतला व 50 टक्के सबसिडी प्राप्त केली त्याच लाभार्थ्यांना पुन्हा 50 टक्के रक्कमेचे केवळ वितरण करणे म्हणजे देय नसतांना त्यांना दुबार लाभ दिल्यासारखे आहे.

2) मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद जालना यांनी संचिकेत पान क्र.12 वर लाभार्थी निवड, लाभार्थीची अनुज्ञेयता व अनुज्ञेय रक्कम ही पूर्णपणे विभागाची जबाबदारी राहील असे स्पष्टपणे नमूद केले आहे.

3) या सर्व लाभार्थ्यींची शेतजमीन पानेगाव गट क्र. 286 मध्ये विहीर व बोअर असल्याची नोंद नाही.

**3.829 वस्तीगृहांना नियमबाह्य इमारत भाडे प्रदान करणेबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, बीड यांनी सन 2014-2015 मध्ये वस्तीगृहाच्या इमारतीच्या भाडेपोटी रक्कम रुपये 6,51,024/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) समाजकल्याण विभाग, सन 2014-2015 च्या लेखापरीक्षणात प्रमाणक क्रमांक 85/ दिनांक 07/01/2015 अन्वये रुपये 6,51,024/- माहे 06/12 ते 01/15 या कालावधीतील इमारत भाडे छत्रपती शाहु मागासवर्गीय मुलांचे वस्तीगृह लिंबारुई (देवी), तालुका बीड यांना प्रदान केलेले आहे. 09/2012 पासुन सदर वस्तीगृह वासनवाडी येथुन लिंबारुई (देवी) येथे स्थलांतरीत झालेले आहे. त्यामुळे त्यांना तीन महिन्याचे इमारत भाडे रक्कम रुपये 61,033/- जास्तीचे प्रदान करण्यात आलेले आहे.

2) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण व सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बी.सी.पीच 1097/प्र.क्र.107/मावक-4/दिनांक 16/03/1998 नुसार प्रत्येक विद्यार्थ्या करीता 40 चौरस फुट जागा आवश्यक आहे. अनुज्ञेय क्षेत्रफळ 960 चौरस फुट असताना सदर वस्तीगृहासाठी 11650 चौरस फुट जागा संपादित करुन रुपये 5,67,211/- जादा भाडे अदा केलेले आहे.

**3.830 जिल्हा परिषद सेस मधुन शेळ्या वाटपातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद बीड यांनी सन 2014-2015 चे लेखापरीक्षणामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी महामंडळ मर्यादित, अंबाजोगाई यांना रुपये 8,10,000/- शेळी वाटपासाठी अदा करण्यात आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, निर्णय क्रमांक झेड.पी.एफ. 2008/प्र.क्र. 446/वित्त - 9 /दिनांक 20/06/2008 अन्वये वेळापत्रकानुसार योजना राबविणे आवश्यक असताना दिनांक 31/03/2015 रोजी प्रशासकीय मान्यता, तांत्रीक मान्यता, पुरवठा आदेश, देयक प्रदान करणे या सर्व प्रक्रिया एकाच दिवशी केल्याचे दिसते.

2) 181 निवड लाभार्थ्यांची निवड केली आहे. परंतु निवड केलेल्या लाभार्थ्यांचे कागदपत्रे, अर्ज इत्यादी बाबी लेखापरिक्षणास उपलब्ध केल्या नाहीत. त्यामुळे लाभार्थी निवड योग्य- अयोग्य बाबत तपासणी करता आली नाही.

3) श्री. विलास साहेबराव काळे रा. वडाळी तालुका शिरुर यांना विशेष घटक योजने अंतर्गत दुधाळ गाईंचे वाटप केले असतानाही त्यांना परत शेळीगट योजनेसाठी निवडलेले आहे. त्यामुळे रक्कम रुपये 50,000/- वसुलपात्र ठरतात.

**3.831 अपंगांना पिठाची गिरणी पुरविणे योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, परभणी चे सन 2014-15 चे लेखापरीक्षण दरम्यान अपंगांना पिठाची गिरणी पुरविणे या योजने अंतर्गत रक्कम रूपये 14,98,500/- खर्च नोंदविला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 151 अन्वये आधी प्रशासकीय मान्यता व नंतर तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही न करता दोन्ही मान्यता एकाच दिवशी घेतल्या आहेत.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 96 अन्वये माल खरेदीचे कोणतेही देयक त्याचे पैसे देण्यासाठी संमत करण्यापूर्वी देयकासोबत डिलिव्हरी चालानची मूळ प्रत व त्या मालाची नोंद साठा नोंदवहीत घेतल्याबाबतचे अभिलेखे देयकासोबत जोडणे आवश्यक असताना अशी कार्यवाही न अवलंबताही देयक पारित करण्यात आलेले आहे.

3) पारित करण्यात आलेल्या देयकांवर जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

4) पंचायत समिती स्तरावरील साठा नोंदवह्यांचे अवलोकन केले असता त्यात पुढील त्रुटी आढळून आल्या आहे.

एक) पंचायत समिती, सेलु येथील साठा नोंदवहीतील नोंदी गट विकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित नाहीत.

दोन) पंचायत समिती, जिंतूर येथील साठा नोंदवहीतील नोंदी गट विकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित नाहीत.

तीन) पीठाच्या गिरणीचे लाभार्थ्यांना वाटप केल्याबाबतच्या नोंदी पंचायत समिती, जिंतूर यांच्या साठा नोंदवहीत आहेत. परंतु साठा नोंदवहीत 15 गिरण्या जमा करण्यात आल्याची नोंद नसल्यामुळे, पंचायत समितीला पुरवठादाराकडून 15 गिरणीचा पुरवठा नेमका कधी झाला याची पडताळणी करता आली नाही.

चार) पंचायत समिती, जिंतूर येथील साठा नोंदवहीतील नोंदी या दिनांक नमूद न करताच घेतलेल्या आहेत. त्यामुळे पंचायत समितीला पुरवठादाराकडून 15 गिरणीचा पुरवठा विहित मुदतीत झाला होता किंवा नाही तसेच पंचायत समिती मार्फत लाभार्थ्यांना सदर गिरणीचे वाटप वेळेवर झाले किंवा नाही याची पडताळणी करता आली नाही.

पाच) विभागाने 2014-15 या आर्थिक वर्षात पिठाची गिरणी पुरवठा करण्याच्याच 2 योजना वेगवेगळया लेखाशीर्षाखाली घेतल्या आहेत. दोन्हीकरिता वेगवेगळी साठा नोंदवही ठेवणे अपेक्षित असताना पंचायत समिती, जिंतूर यांनी दोन्ही लेखशीर्षकासाठी एकच साठा नोंदवही ठेवली आहे.

5) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 6 नुसार पंचायत समिती कडून सदर मालाबाबत कोणत्याही स्वरूपाची तक्रार नाही याची खात्री होईपर्यंत म्हणजे पुरवठा केल्याच्या दिनांकापासून 1 महिन्यापर्यंत 10 टक्के रक्कम राखून ठेवणे आवश्यक असताना वरील प्रमाणकान्वये विभागाने पुरवठादाराची 100 टक्के रक्कम अदा केली आहे.

6) संचिकेचे अवलोकन केले असता त्यात लाभार्थ्यांच्या निवडीचा विषय समितीचा ठराव आढळून आला नाही. त्यामुळे लाभार्थी निवडीसाठी विभागाने नेमके कोणते निकष लावले याचा बोध होऊ शकला नाही.

7) शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील मुद्दा क्रमांक 1.4(अ) मधील क्रमांक 2 प्रमाणे प्राधान्यक्रमाचा विचार करून लाभार्थी निवड केली असल्याबाबत उपलब्ध अभिलेख्यावरून पडताळणी करता आली नाही.

8) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1091/प्र.क्र.921/34, दिनांक 31/07/1991 अन्वये उपकारांतर्गत राबवावयाच्या योजनांच्या प्रभावी अमलबाजवणीसाठी एक कालबद्ध कार्यक्रम आखून दिला आहे. विभागाने त्याप्रमाणे कार्यवाही अनुसरली नाही.

**3.832 अनुदानीत वसतीगृहात बायोमॅट्रीक संयत्र न बसवता वसतीगृहास 60 टक्के अनुदान देणेबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांनी सन 2014-15 या वित्तीय वर्षामध्ये बायोमॅट्रीक संयत्र न बसविण्यात आलेल्या अनुदानित वसतीगृहांना 60 टक्के अनुदान अदा करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक सकआ/शिक्षण/अनुवगृह/योजनेत्तर/योजनांतर्गत/तरतुद/बायोमॅट्रीक/का-5/2013-14/2552, दिनांक 10/09/2013 मध्ये नमुद केल्याप्रमाणे ज्या अनुदानित वसतीगृहांत बायोमॅट्रीक संयत्र स्थापित व कार्यान्वीत करण्यात आलेले आहेत, अशाच अनुदानित वसतीगृहांना सन 2014-15 मधील 60 टक्के अनुदान अदा करावे. ज्या अनुदानित वसतीगृहांमध्ये सदर संयंत्र

अदयाप पर्यंत स्थापित करण्यात आलेले नाही. अशा वसतीगृहांत सदर संयंत्र स्थापित व कार्यान्वित केल्याशिवाय 60 टक्के अग्रीम अनुदान अदा करु नये, बायोमॅट्रीक संयंत्र स्थापित व कार्यान्वित केल्याशिवाय 60 टक्के अग्रीम अनुदान अदा केल्याचे निदर्शनास आल्यास आपल्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल, असे स्पष्ट आदेश असतानाही बायोमॅट्रीक संयत्र स्थापित करण्यात आल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणात दर्शविण्यात आले नाहीत. त्यामुळे बायोमॅट्रीक संयत्र कार्यान्वित केल्याशिवाय वरील प्रमाणे रुपये 1,64,16,000/- चे प्रदान केल्याचे लेखापरीक्षणात दिसून आले आहे.

**3.833 अंपग व्यक्तींना लघुउद्योगासाठी वित्तीय अर्थसहाय्य.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, परभणी चे सन 2014-15 चे लेखापरीक्षण दरम्यान अंपग व्यक्तींना लघुउद्योगासाठी वित्तीय अर्थसहाय्य या योजनेमध्ये अनियमितता आढळून आल्या आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 26/06/2008 नुसार योजना राबविण्याचे वेळापत्रक देण्यात आलेले आहे. लाभार्थी निवड निविदा प्रक्रिया 30 संप्टेबर पर्यंत पुर्ण करुन संबधित वित्तिय वर्षाच्या 1 नोव्हेंबर पर्यंत आदेश देऊन प्रत्यक्षात लाभ दिनांक 1 जानेवारी ते 10 मार्च पर्यंत द्यावयाचे आहे. तथापि, सन 2013-2014 चे मंजुर लाभार्थींना लाभ 2014-2015 मध्ये देण्यात आलेला आहे. सदर योजना विहीत वेळेनुसार राबविल्याचे दिसुन येत नाही.

2) संबधीत लाभार्थी अर्जदाराचे बँकेने मंजुर केलेले पत्र आहे व सबसिडीचे धनादेश वितरीत करतेवेळी वया बाबत व कोठेही नोकरीस नसल्याबाबतचे हमीपत्र घेतल्याचे दिसुन आलेले नाही.

3) सदर योजनेस समाजकल्याण समितीची शिफारस असल्याबाबत कागदपत्रे दिसुन आले नाहीत.

4) लाभार्थीचे उपयोगिता प्रमाणपत्र दर्शवुन योजनेची फलश्रुती झाल्याचे अभिलेख्या अभावी प्रमाणित करता येत नाही.

5) समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, शासन निर्णय क्रंमाक ईडीडी-1087/28863/158/सुधार-2,दिनांक 19/01/1989 मधील परिच्छेद क्रमांक 6 नुसार अपंगाच्या मंजुर प्रकल्पाच्या एकुण खर्चापैकी 20 टक्के रक्कम अनुदान बीजभांडवलाची रक्कम संबंधीत बँकांना मंजुर केलेल्या प्रस्तावानुसार बँकेकडे जमा करण्यात यावी. बीजभांडवल व बँक कर्जाची एकत्रित रक्कम बँकेमार्फत संबंधित लाभार्थ्यास उपलब्ध करण्यात यावी. वरील प्रमाणे लाभार्थ्यांना मंजुर करण्यात आलेली 20 टक्के बीजभांडवल रक्कम व बँक कर्जाची एकत्रित रक्कम बँकेमार्फत संबंधित लाभार्थीस उपलब्ध केल्याबाबतची अभिलेखे संचिकेत पाहावयास मिळाले नाहीत.

**3.834 वस्तिगृहांना दिलेल्या परीपोषण आहार / इमारत भाडे / कर्मचारी मानधन प्रदानातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद हिंगोलीने सन 2014-2015 मध्ये परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे वस्तीगृहांना परिपोषण आहार, इमारत भाडे व कर्मचारी मानधन यावर एकूण रक्कम रूपये 1,85,16,789/- वाटप केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बी.सी.एच.-1097/प्र.क्र.107/मावक-4, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई 400032, दिनांक 16/03/1998 नुसार स्वेच्छा संघटनांनी चालवलेल्या मागास वस्तिगृहांना एकुण विद्यार्थी संख्येच्या प्रती प्रवेशित माहे 900 या दराने 10 महिन्याकरिता देय असलेल्या अनुदानापैकी 60टक्के अनुदान जुन मध्ये व उर्वरित 40टक्के अनुदान वित्तीय वर्षाच्या जानेवारी महिन्यात वितरीत करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) उपरोक्त शासन निर्णयानुसार प्रवेशासाठी निश्चित केलेली प्रवर्ग टक्केवारीनुसार प्रवेश दिल्याबाबत सविस्तर तपासणी केल्याचे तपासणी अहवालात दिसुन येत नाही.

3) वस्तिगृहांनी ठेवणे आवश्यक असलेल्या नोंदवह्याबाबत सविस्तर तपासणी केल्याचे तपासणी अहवालात उल्लेख केलेला नाही.

4) परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे 15 वसतिगृहांचे तपासणी अहवालात दोन तपासणी अहवाल कमी असतांना त्यांना परीपोषण आहार रक्कम प्रदान करण्यांत आलेली आहे. शासन निर्णय क्रमांक बीसीएच-1097/ प्र.क्र.107/मा.व.क-4, दिनांक 16/03/1998 मधील 8 (अ) नुसार वस्तिगृहाची तपासणी समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांनी करणे आवश्यक असतांना तपासणी अहवाल वर्ग 3 कर्मचारी यांनी केली असुन समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी तपासणीसाठी वर्ग 3 कर्मचाऱ्यास प्राधिकृत केल्याबाबत पत्र समाज कल्याण विभागाने लेखापरिक्षणास दर्शविले नाही.

5) शासन निर्णय दिनांक 16/03/1998 चे अनुदान निर्धारण नियम (फ) नुसार वस्तीगृह व्यवस्थापक यांच्यामार्फत विदयार्थ्यांना देण्यात येणा-या सुविधेत कोणत्याही प्रकारची सुविधा कमी पडल्यास प्रत्येक असुविधेबाबत रूपये 1,000/- दंड आकारणे आवश्यक असताना परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे रूपये 6,000/- दंड वसुली केली नाही.

6) वस्तिगृहांना अनुदान वितरीत करताना वस्तिगृह सर्व आवश्यक सोयींनी सुसज्ज असल्याबाबत सविस्तर तपासणी केल्याचे तपासणी अहवालात उल्लेख केलेला नाही.

7) समाजकल्याण विभागाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशान्वये लेखापरीक्षण सुरु होण्यापुर्वी सर्व वस्तिगृह यांच्या विविध अधिकारी कर्मचारी यांच्या मार्फत प्रत्यक्ष भेटी देऊन तपासणी केलेला अहवाल लेखापरीक्षणात वारंवार मागणी करूनही उपलब्ध केलेला नाही.

8) उपरोक्त शासन निर्णय दिनांक 16/03/1998 अन्वये जोडपत्र ‘अ’ अनुक्रमांक 8 मधील क्रमांक 3 (क) मधील तरतुदीप्रमाणे संस्था आर्थिकदृष्टया संपन्न असण्यासाठी वस्तिगृहाचे व्यवस्थापनेकरिता संस्थेच्या नांवे बँकेत किमान रूपये 10,000/- कायमस्वरूपी जमा असणे आवश्यक आहे. अशी किमान रक्कम जमा असल्याची खात्री करता आली नाही.

9) वसतीगृहांना अनुदान देतांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा विद्यार्थ्यी संख्या मान्यतेचा आदेश याबाबत लेख्याअभावी खात्री करता आली नाही.

**3.835 एचडीपीई पाईप वाटपातील अनिमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद हिंगोली यांनी एच.डी.पी.ई. पाईप खरेदी वर नमुद प्रमाणकान्वये रक्कम रूपये 29,89,200/- चा खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये योजनेचे नियोजन आणि अंमलबजावणी वेळापत्रकानुसार झालेली नाही. योजनेस व्यापक प्रसिद्धी दिल्याबाबत अभिलेखे दिसुन आले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास 1076/ प्र.क्र.872/जल2ब, दिनांक 10/10/1996 अन्वये किती साहित्याची आवश्यकता आहे याची एकत्रित मागणीचा आढावा घेवून खरेदी करणे आवश्यक असताना याप्रमाणे कार्यवाही न केल्याने वर्ष अखेर मोठया प्रमाणात साहित्य विनावाटप पडून होते.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशश 1020/प्र.क्र.114/38, दिनांक 09/02/2001 नुसार योजनेची अंमलबजावणी परिणामकारक व्हावी यासाठी साहित्याची खरेदी करण्यापूर्वी लाभार्थ्यांची निवड न करता पंचायत समितीनिहाय साहित्याचा संख्यात्मक पुरवठा आदेश देण्यात आला.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178/95, दिनांक 09/10/1997 मधील परिच्छेद क्रमांक 3 प्रमाणे साहित्याची खरेदीपूर्वी लाभार्थी निवड झाली नसून, परिच्छेद 5 मध्ये

नमुद केल्याप्रमाणे लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप त्याच वित्तीय वर्षात न केल्याने वित्तीय वर्ष अखेरही साहित्य विनावाटप पडून असल्याने जिल्हा परिषदेची रक्कम विनाकारण गुंतून पडलेली आहे.

5) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे मार्गदर्शक सुचना सुकृऔ/ दरनि-2013-14/152/गुनि-5/2013, दिनांक 04/10/2013 मधील परिच्छेद इ नुसार औजाराचा प्रकार, अनुक्रमांक, उत्पादक/पुरवठादाराचे नाव, उत्पादन वर्ष, पुरवठा पूर्व/पुरवठा पश्चात तपासणी अहवाल या सर्व बाबींची नोंद साठा/वाटप नोंदवहीत नाही.

6) उपरोक्त खरेदी करण्यापुर्वी सदर साहित्याच्या दराबाबत खुल्या बाजारात तपासणी केल्याचे प्रमाणपत्र संचिकेत नाही.

7) मार्गदर्शक सुचना दिनांक 04/10/2013 मधील परिच्छेद ड-2 नुसार आणि उपरोक्त नमुद दरकरार दिनांक 27/09/2013 सोबतचे प्रपत्र 2 मधील परिच्छेद क्र. 11 नुसार रूपये 10,000/- पेक्षा कमी किमतीच्या औजारांच्या एकूण पुरवठा संख्येच्या 2.5 टक्के नमुने क्षेत्रिय स्थरावर काढून कृषी विद्यापीठे / शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये यांकडून पुरवठा पश्चात क्षेत्रिय तपासणी केल्याचे आढळुन आले नाही. दरकरार दिनांक 27/09/2013 सोबतचे प्रपत्र 2 मधील परिच्छेद क्रमांक 15 नुसार पुरवठा पश्चात क्षेत्रिय तपासणी अहवाल नसताना पुरवठादाराची 10 टक्के रक्कम प्रदान केली.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1083/ प्र.क्र.1239/34, मंत्रालय, मुंबई, दिनांक 01/09/1993 नुसार दुबार लाभ नोंदवही ठेवली नसल्याने एकाच कुटूंबातील दोन व्यक्तिंना लाभ दिल्याचे निदर्शनास आले आहे. सदरबाबत वसुली होणे आवश्यक आहे.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, क्रमांक पीआरसी-1093/सीआर/1074/57, दिनांक 29/07/1983 नुसार योजना फलश्रुती अहवाल घेण्यात आला नाही.

**3.836 टिन पत्रे वाटपातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद हिंगोली ने नमुद प्रमाणकान्वये रूपये 29,95,974/- शाम कृषि सेवा केंद्र, आखाडा बाळापुर यांच्या मार्फत एकुण 3054 टीनपत्रे खरेदी केली असुन पंचायत समिती निहाय लाभार्थ्यांना वाटप केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये योजनेचे नियोजन आणि अंमलबजावणी वेळा पत्रकानुसार झालेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास 1076/ प्र.क्र. 872/ जल 2ब, दिनांक 10/10/1996 अन्वये किती साहित्याची आवश्यकता आहे याची एकत्रीत मागणीचा आढावा घेवुन खरेदी करणे आवश्यक असताना याप्रमाणे कार्यवाही न केल्याने वर्ष अखेर मोठ्या प्रमाणात साहित्य विनावाटप पडुन होते.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशश1020/प्र.क्र.114/38, दिनांक 09/02/2001 नुसार योजनेची अंमलबजावणी परिणामकारक व्हावी यासाठी साहित्याची खरेदी करण्यापूर्वी लाभार्थ्यांची निवड न करता पंचायत समितीनिहाय साहित्याचा संख्यात्मक पुरवठा आदेश देण्यात आला.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण, विभाग परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178/95, दिनांक 09/10/1997 मधील परिच्छेद क्रमांक 3 प्रमाणे साहित्याची खरेदीपूर्वी लाभार्थी निवड झाली नसून, परिच्छेद 5 मध्ये नमुद केल्याप्रमाणे लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप त्याच वित्तीय वर्षात न केल्याने वित्तीय वर्ष अखेरही साहित्य विनावाटप पडून असल्याने जिल्हा परिषदेची रक्कम विनाकारण गुंतून पडलेली आहे.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2009/ प्र.क्र.514/वित्त-9, दिनांक 20/11/2009 नुसार प्रथम 10 लाखास रूपये 100/- व त्यापुढे प्रती लक्ष रुपयास रूपये 100/- या प्रमाणे रूपये 29,95,974/- खरेदीस रूपये 2,100/- च्या मुद्रांक पेपर न घेतल्याने रूपये 2,000/- वसुल केले नाहीत.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2001/प्र.क्र.132/ पं.स.7(26), दिनांक 05/09/2002 नुसार दरकरार अस्तित्वात नसतांना निविदा प्रक्रीया पुर्ण करण्यापुर्वी उद्योग संचालनालयाच्या मध्यवर्ती भांडार संघटनेकडुन दरकरार अस्तित्वात नसल्याबाबत लेखी स्वरूपात खात्री केली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, निर्णय क्रमांक मागास-1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 नुसार दुबार लाभ नोंदवही ठेवलेली नसल्याने 5 लाभार्थ्यांना दुबार लाभ दिल्याने वसुली आवश्यक आहे.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागस 2001/प्र.क्र.408/34, दिनांक 20/04/2001 अन्वये वैयक्तीक लाभाच्या योजनेचा लाभ देतांना संबंधित लाभार्थ्यांच्या कुंटुंबातील सदस्य शासकिय / निमशासकिय सेवेत नसलेबाबतचे प्रमाणपत्र जोडले नाही.

9) समाजकल्याण समितीने यादी निवड केल्याची तसेच यादीस प्रसिध्दी देवुन सुचना / आक्षेप मागविण्यात आल्याचे संचिकेवरून दिसुन येत नाही.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग क्रमांक पीआरसी-1093/ सीआर/ 1074/ 57, दिनांक 29/07/1983 नुसार योजना सफल झाल्याचा सविस्तर पाहणी अहवाल संचिकेत नाही.

**3.837 विद्युत मोटार पुरवठ्यातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद हिंगोली यांनी नमुद प्रमाणकान्वये रूपये 30,00,000/- विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषि उद्योग महामंडळ, नवा मोंढा, नांदेड यांच्या मार्फ़त एकुण 150 नग दर रूपये 20,000/- 5 Hp ओपनवेल प्रोटोनमेक विद्युत मोटार खरेदी करुन पंचायत समिती निहाय वाटप केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये योजनेचे नियोजन आणि अंमलबजावणी वेळा पत्रकानुसार झालेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशश 1020/प्र.क्र.114/38 दिनांक 09/02/2001 नुसार योजनेची अंमलबजावणी परिणामकारक व्हावी यासाठी साहित्याची खरेदी करण्यापुर्वी लाभार्थ्यांची निवड न करता पंचायत समितीनिहाय साहित्याचा संख्यात्मक पुरवठा आदेश देण्यात आला.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178/95,दिनांक 09/10/1997 मधील परिच्छेद क्रमांक 3 प्रमाणे साहित्याची खरेदीपूर्वी लाभार्थी निवड झाली नसून, परिच्छेद 5 मध्ये नमुद केल्याप्रमाणे लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप त्याच वित्तीय वर्षात न केल्याने वित्तीय वर्ष अखेरही साहित्य विनावाटप पडुन असल्याने जिल्हा परिषदेची रक्कम विनाकारण गुंतून पडलेली आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास 1076/प्र.क्र.872/ जल 2ब, दिनांक 10/10/1996 अन्वये किती साहित्याची आवश्यकता आहे याची एकत्रीत मागणीचा आढावा घेवुन खरेदी करणे आवश्यक असताना याप्रमाणे कार्यवाही न केल्याने वर्ष अखेर मोठ्या प्रमाणात साहित्य विनावाटप पडुन राहिले.

5) खरेदी करण्यापुर्वी सदर साहित्याच्या दराबाबत खुल्या बाजारात तपासणी केल्याचे प्रमाणपत्र संचिकेत दिसुन आले नाही. समाज कल्याण विभागाने लाभधारकाचे मुळ प्रस्ताव लेखापरीक्षणास सादर केले नाही.

6) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे मार्गदर्शक सूचना सुकृऔ/दरनि-2013-14/152/गुनि-5/2013 दिनांक 04/10/2013 मार्गदर्शक सुचना मधील परिच्छेद ड-2 नुसार आणि उपरोक्त नमुद दरकरार दिनांक 27/09/2013 सोबतचे प्रपत्र 2 मधील परिच्छेद क्र. 11 पुरवठा पश्चात क्षेत्रिय तपासणी केल्याचे आढळुन आले नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1083/प्र.क्र.1239/34 मंत्रालय मुंबई, दिनांक 01/09/1993 नुसार दुबार लाभ नोंदवही ठेवण्यात आलेली नसल्याने 5 लाभार्थ्यांना दुबार लाभ देण्यात आल्याने वसुली आवश्यक आहे. नमुद शासन निर्णयातील परिच्छेद 4 नुसार योजनेच्या लाभामुळे लाभार्थ्यांच्या आर्थिकस्थितीत झालेल्या सुधारणा बाबतचा अहवाल प्राप्त करुन घेतलेला नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, क्रमांक पीआरसी-1093/सीआर/1074/57, दिनांक 29/07/1983 अन्वये योजना सफलतेचा सविस्तर पाहणी अहवाल संचिकेत नाही.

9) पंचायत समिती कळमनुरी व सेनगाव यांनी साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाही.

**3.838 जिल्हा परिषद उपकरामधून 100 टक्के अनुदानावर 3 एच.पी. विदयूत मोटार खरेदी करून वाटपातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** सन 2014-2015 या कालावधीचे समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद नांदेडचे लेखापरिक्षणात रूपये 22,99,908/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/ नियम-09, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेचे नियोजन आणि अंमलबजावणी होणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1094/ सी.आर.2239/34/67, दिनांक 09/09/1993 मधील परिच्छेद 4 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना राबविल्यानंतर सक्षम अधिकारी यांनी लाभ दिलेल्या लाभार्थ्यांना योजनेची पाहणी करून ती सुस्थितीत चालू असले बाबतचा पडताळणी अहवाल सादर करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झालेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण व महिला बालकल्याण विभाग, पत्र क्रमांक संकिर्ण 10/2003/प्र.क्र.-44/ पडम-4, दिनांक 28/03/2003 नुसार शासकीय योजनाचे लाभार्थी निवड करतांना त्यामध्ये 33 टक्के महिलांचा समावेश असणे बंधनकारक आहे. तथापि तशी परीपूर्ण निवड करण्यात आली नाही.

4) पूरवठा आदेशामध्ये साहित्य विलंबाने प्राप्त झाल्यास दंडाची तरतूद करणे आवश्यक असतांना अशी तरतूद नमूद करण्यात आली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1089/ नुसार योजनेतील लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतू अशी नोंदवही न ठेवल्याने लाभार्थ्यांना इतर विभागाकडून राबविण्यात आलेल्या याच योजनेतून यापूर्वी लाभ दिला गेला नाही याची खात्री पटू शकली नाही.

6) ग्रामविकास विकास विभाग, परिपत्रक्र क्रमांक पंरास/1096/प्र.क्र./78/05, दिनांक 09/10/1997 नुसार वस्तूची खरेदी करण्यापूर्वी लाभार्थी निवडीची प्रक्रिया पूर्ण करून वस्तूचे वाटप त्याच वित्तीय वर्षात होईल अशा प्रकारे योजना राबवायची आहे. परंतू त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**3.839 जिल्हा परिषद उपकरामधून 100 अनुदानावर 5 एच.पी. विदयूत मोटार खरेदी करून वाटपातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** सन 2014-2015 या कालावधीचे समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद नांदेडचे लेखापरिक्षणात रूपये 39,99,996/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/ नियम-09 दिनांक 20/06/2008 नुसार योजनेचे नियोजन आणि अंमलबजावणी होणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1094/ सी.आर.2239/34/67/ दिनांक 09/09/1993 मधील परिच्छेद 4 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना राबविल्यानंतर सक्षम अधिकारी यांनी लाभ दिलेल्या लाभार्थ्यांना योजनेची पाहणी करून ती सुस्थितीत चालू असले बाबतचा पडताळणी अहवाल सादर करून लाभार्थ्याच्या आर्थिक स्थितीत काय सुधारणा झाली हे प्रमाणित करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झालेली नाही.

3) समाजकल्याण व महिला बालकल्याण विभाग पत्र क्रमांक संकिर्ण 10/2003/प्र.क्र.-44/पडम-4,दिनांक 28/03/2003 नुसार शासकीय योजनाचे लाभार्थी निवड करतांना त्यामध्ये 33 टक्के महिलांचा समावेश असणे बंधनकारक आहे. तथापि तशी परीपूर्ण निवड करण्यात आली नाही.

4) पूरवठा आदेशामध्ये साहित्य विलंबाने प्राप्त झाल्यास दंडाची तरतूद करणे आवश्यक असतांना अशी तरतूद नमूद करण्यात आली नाही.

5) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक मागास-1089/ नुसार योजनेतील लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना अशी नोंदवही ठेवली नाही.

6) ग्रामविकास विकास विभाग, परिपत्रक्र क्रमांक पंरास/1096/प्र.क्र./78/05,दिनांक 09/10/1997 नुसार वस्तूची खरेदी करण्यापूर्वी लाभार्थी निवडीची प्रक्रिया पूर्ण करून वस्तूचे वाटप त्याच वित्तीय वर्षात होईल अशा प्रकारे योजना राबवायची आहे. परंतू त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

7) दिनांक 19/12/2014 रोजीच्या साहित्य पुरवठा आदेशात 30 दिवसांच्या आत साहित्य पुरवठा करणेबाबत नमुद केलेले असुन साहित्य वरील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे प्राप्त झाले असुन संबंधीत पुरवठादारास साहित्य विलंबाने प्राप्त झाले आहे. संबंधितास दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाल्याचे दिसुन आलेले नाही. साहित्य पुढील वित्तीय वर्षात नियमबाहय रित्या वाटप केल्याचे दिसुन आले त्यामुळे योजनेचे उद्दीष्ट सफल झाले नाही.

8) शिल्लक साहित्याची रक्कम रुपये 8,35,164/- संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचा-याकडून वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षामध्ये जमा करण्यात यावी.

9) साहित्य खरेदीच्या सर्व लाभार्थ्यांचे प्रस्ताव लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे सर्व अभिलेखे तपासुनच लाभ दिल्याची कागदोपत्री खात्री करता आली नाही.

10) प्रमाणक क्रमांक 86 व 574 या दोन्ही प्रमाणकात साहित्य प्राप्त होण्यापुर्वी नियमबाहय रक्कम अदा केल्याचे दिसुन आले.

**3.840 जिल्हा परिषद उपकरामधून 100 टक्के अनुदानावर शिलाई मशीन खरेदी करून वाटपातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** सन 2014-2015 या कालावधीचे समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद नांदेडचे लेखापरिक्षणात रूपये 39,93,600/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेचे नियोजन आणि अंमलबजावणी होणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1094/ सी.आर.2239/34/67, दिनांक 09/09/1993 मधील परिच्छेद 4 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना राबविल्यानंतर सक्षम अधिकारी यांनी लाभ दिलेल्या लाभार्थ्यांना योजनेची पाहणी करून ती सुस्थितीत चालू असले बाबतचा पडताळणी अहवाल सादर करून लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीत काय सुधारणा झाली हे प्रमाणित करणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

3) समाजकल्याण व महिला बालकल्याण विभाग, पत्र क्रमांक संकिर्ण-10/2003/प्र.क्र.-54/पदूम-4, दिनांक 28/03/2003 नुसार शासकीय योजनाचे लाभार्थी निवड करतांना त्यामध्ये 33 टक्के महिलांचा समावेश असणे बंधनकारक आहे. तथापि तशी परीपूर्ण निवड करण्यात आली नाही.

4) पूरवठा आदेशामध्ये साहित्य विलंबाने प्राप्त झाल्यास दंडाची तरतूद करणे आवश्यक असतांना अशी तरतूद नमूद करण्यात आली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1089/ प्र.क्र.55, दिनांक 05/10/1989 नुसार योजनेतील लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतू अशी नोंदवही न ठेवल्याने लाभार्थ्यांना इतर विभागाकडून राबविण्यात आलेल्या याच योजनेतून यापूर्वी लाभ दिला गेला नाही. हे तपासता आले नाही.

6) ग्रामविकास विभाग, परिपत्रक्र क्रमांक पंरास/1096/प्र.क्र./78/05, दिनांक 09/10/1997 नुसार वस्तूची खरेदी करण्यापूर्वी लाभार्थी निवडीची प्रक्रिया पूर्ण करून वस्तूचे वाटप त्याच वित्तीय वर्षात होईल अशा प्रकारे योजना राबवायची आहे. परंतू त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

7) साहित्य पुरवठा आदेशात नमुद केल्याप्रमाणे साहित्य वेळेवर प्राप्त झाले असुन पुरवठादारास विलंबाने प्राप्त झाले आहे. संबंधितावर दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही. साहित्य पुढील वित्तीय वर्षात नियमबाहयरित्या वाटप केल्याचे दिसुन आले असुन योजनेचे उद्दिष्ट सफल झाले नाही.

8) शिल्लक साहित्याची रक्कम रुपये 3,95,200/- संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचा-याकडून वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षामध्ये जमा करण्यात यावी.

9) प्रमाणक क्रमांक 88 व 576 मध्ये साहित्य प्राप्त होण्यापुर्वी नियमबाहय रक्कम अदा केल्याचे दिसुन आले आहे.

**3.841 जिल्हा परिषद उपकरामधून 100 टक्के अनुदानावर लेडीज सायकल खरेदी करून वाटपातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** सन 2014-2015 या कालावधीचे समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद नांदेडचे लेखापरिक्षणात रूपये 19,95,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेचे नियोजन आणि अंमलबजावणी होणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1094/ सी.आर.2239/34/67, दिनांक 09/09/1993 मधील परिच्छेद 4 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना राबविल्यानंतर सक्षम अधिकारी यांनी लाभ दिलेल्या लाभार्थ्यांना योजनेची पाहणी करून ती सुस्थितीत चालू असले बाबतचा पडताळणी अहवाल सादर करून लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीत काय सुधारणा झाली हे प्रमाणित करणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

3) समाजकल्याण व महिला बालकल्याण विभाग पत्र क्रमांक संकिर्ण-10/2003/प्र.क्र.-54/पदूम-4, दिनांक 28/03/2003 नुसार शासकीय योजनाचे लाभार्थी निवड करतांना त्यामध्ये 33 टक्के महिलांचा समावेश असणे बंधनकारक आहे. तथापि तशी परीपूर्ण निवड करण्यात आली नाही.

4) पूरवठा आदेशामध्ये साहित्य विलंबाने प्राप्त झाल्यास दंडाची तरतूद करणे आवश्यक असतांना अशी तरतूद करण्यात आली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1089/प्र.क्र.55,दिनांक 05/10/1989 नुसार योजनेतील लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतू अशी नोंदवही न ठेवल्याने लाभार्थ्यांना इतर विभागाकडून राबविण्यात आलेल्या याच योजनेतून यापूर्वी लाभ दिला गेला नाही. हे तपासता आले नाही.

6) ग्रामविकास विभाग, परिपत्रक्र क्रमांक पंरास/1096/प्र.क्र./78/05, दिनांक 09/10/1997 नुसार वस्तूची खरेदी करण्यापूर्वी लाभार्थी निवडीची प्रक्रिया पूर्ण करून वस्तूचे वाटप त्याच वित्तीय वर्षात होईल अशा प्रकारच्या योजना राबवायची आहे. परंतू त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

7) साहित्य पुरवठा आदेशात नमुद केल्याप्रमाणे साहित्य प्राप्त झाले असुन पुरवठादारास विलंबाने प्राप्त झाले आहे. संबंधितास दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाल्याचे दिसुन आले नाही. साहित्य पुढील वित्तीय वर्षात नियमबाहयरित्या वाटप केल्याचे दिसुन आले त्यामुळे योजनेचे उद्दिष्ट सफल झाले नाही.

8) साहित्याची शिल्लक रक्कम रुपये 2,75,400/- संबंधित कर्मचा-याकडून वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षामध्ये जमा करण्यात यावी.

9) साहित्य खरेदीच्या सर्व प्रस्ताव लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसल्याने सर्व अभिलेखे तपासुन लाभ दिल्याची कागदोपत्री खात्री करता आली नाही.

**3.842 अर्थसंकल्पीय तरतुद व कमी / अधिक खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबादने सन 2014-2015 या वित्तीय वर्षात प्राप्त अनुदानातून कमी / अधिक खर्च केलेला आहे. तसेच अखर्चीत अनुदान रुपये 15,65,71,752/- शासनखाती भरणा केलेले नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 136(3) नुसार कमी / जादा खर्चास सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घेणे आवश्यक आहे.

2) सन 2000-2001 ते 2007-2008 पर्यंतच्या अनुदान निर्धारणानुसार अखर्चीत अनुदान रक्कम रुपये 15,65,71,752/- शासन खाती भरणा करण्याबाबत आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी पत्र क्रमांक 472 दिनांक 07/11/2013 व पत्र क्रमांक 79 दिनांक 18/02/2014 अन्वये कळवूनही विभागाने अखर्चीत रक्कम शासन खाती भरणा केलेली नाही.

3) प्रत्येक वर्षी डिसेंबर पुर्वी संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कडून अनुदान निर्धारण करुन घेणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केलेली नाही.

**3.843 100 टक्के अनुदानावर मागासवर्गीयांना तुषार संच पुरवठा करणे खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबादने तुषार संच पुरवठा करणेसाठी रक्कम रुपये 39,72,927/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक, क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार शासनाने ठरवुन दिलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविलेली नाही.

2) ग्रामविकास विभाग, परिपत्रक, क्रमांक मागास/1089/प्र.क्र.55, दिनांक 05/10/1989 नुसार योजनेतील लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे, परंतु अशी नोंदवही न ठेवल्याने लाभार्थ्यांना इतर विभागाकडुन राबविण्यात आलेल्या याच योजनेतुन यापुर्वी व यावर्षीही लाभ दिला गेला नाही हे तपासता आले नाही.

3) ग्रामविकास विभाग, परिपत्रक, क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1997 नुसार वस्तुंची खरेदी करण्यापुर्वी लाभार्थी निवडीची प्रक्रिया सर्वार्थाने पुर्ण करुन वस्तुंचे वाटप त्याच वित्तीय वर्षात होईल अशा प्रकारे योजना राबवायची आहे, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक, क्रमांक पंरास.1089/646/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे मुल्यमापन तीन स्तरावर करणे आवश्यक आहे, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 मधील परिच्छेद 1 कलम 63 नुसार ठेकेदाराबरोबर / सेवा पुरवठादारा बरोबर रक्कम रुपये 3,100/- चा मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असतांना रक्कम रुपये 100/- चा

करारनामा केल्यामुळे रक्कम रुपये 3,000/- संबंधितांकडून वसुल करून मुद्रांक शुल्क खाती भरणा करणे आवश्यक आहे.

6) लेखापरीक्षण दिनांक पावेतो एकूण सहा नग पाणबुडी तुषार संचाचे वाटप लाभार्थ्यांना होणे बाकी असल्याचे आढळून आले. त्यामुळे उपकर निधी नाहक गुंतून पडला असून त्याचा विनियोग इतर योजनांवर करता आलेला नाही.

**3.844 100 टक्के अनुदानावर मागासवर्गीय शेतकरी यांना 5 एच.पी. पंप पुरवठा करणे खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबादने 5 एच.पी. पंप पुरवठा करणेसाठी रक्कम रुपये 40,00,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार शासनाने ठरवुन दिलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविलेली नाही.

2) ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक मागास/1089/प्र.क्र.55, दिनांक 05/10/1989 नुसार योजनेतील लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे, परंतु अशी नोंदवही न ठेवल्याने लाभार्थ्यांना इतर विभागाकडुन राबविण्यात आलेल्या याच योजनेतुन यापुर्वी व यावर्षीही लाभ दिला गेला नाही हे तपासता आले नाही.

3) ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1997 नुसार वस्तुंची खरेदी करण्यापुर्वी लाभार्थी निवडीची प्रक्रिया सर्वार्थाने पुर्ण करुन वस्तुंचे वाटप त्याच वित्तीय वर्षात होईल अशा प्रकारे योजना राबवायची आहे, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास.1089/646/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे मुल्यमापन तीन स्तरावर करणे आवश्यक आहे, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

5) लेखापरिक्षण दिनांकापावेतो एकुण 16 नग 5 एच.पी. पाणबुडीचे वाटप लाभार्थ्यांना होणे बाकी असल्याचे आढळुन आले. त्यामुळे उपकर निधी नाहक गुंतून पडला असुन त्याचा विनियोग इतर योजनांवर करता आलेला नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

6) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 मधील परिच्छेद 1 कलम 63 नुसार ठेकेदाराबरोबर / सेवा पुरवठादारा बरोबर करारनामा रक्कम रुपये 3,100/- चा मुद्रांकावर करणे आवश्यक असतांना रक्कम रुपये 100/- चा करारनामा केल्यामुळे रक्कम रुपये 3,000/- संबंधितांकडून वसुल करून मुद्रांक शुल्क खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**3.845 100 टक्के अनुदानावर मिरची कांडप यंत्र वाटप करणे खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबादने मिरची कांडप यंत्र खेरदी व वाटपापोटी रुपये 19,81,517/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक, क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार शासनाने ठरवुन दिलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविलेली नाही.

2) ग्रामविकास विभाग, परिपत्रक, क्रमांक मागास/1089/प्र.क्र.55, दिनांक 05/10/1989 नुसार योजनेतील लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे, परंतु अशी नोंदवही न ठेवल्याने लाभार्थ्यांना इतर विभागाकडुन राबविण्यात आलेल्या याच योजनेतुन यापुर्वी व यावर्षीही लाभ दिला गेला नाही हे तपासता आले नाही.

3) ग्रामविकास विभाग, परिपत्रक, क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1997 नुसार वस्तुंची खरेदी करण्यापुर्वी लाभार्थी निवडीची प्रक्रिया सर्वार्थाने पुर्ण करुन वस्तुंचे वाटप त्याच वित्तीय वर्षात होईल अशा

प्रकारे योजना राबवायची आहे, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे 5 मिरची कांडप यंत्र वाटप झालेले नाहीत.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास.1089/646/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे मुल्यमापन तीन स्तरावर करणे आवश्यक आहे, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 मधील परिच्छेद 1 कलम 63 नुसार ठेकेदाराबरोबर / सेवा पुरवठादारा बरोबर रक्कम रुपये 1,100/- चा मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असतांना रक्कम रुपये 100/- चा करारनामा केल्यामुळे रक्कम रुपये 1,000/- संबंधितांकडून वसुल करून मुद्रांक शुल्क खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**3.846 आंतरजातीय विवाहीतांना प्रोत्साहनपर अनुदान प्रदानातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 18) -** समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी सन 2014-2015 या वित्तीय वर्षात आंतरजातीय विवाहीतांना प्रोत्साहन अनुदानावर खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, क्रमांक आंजावि-2007/प्र.क्र.191/मावक-2, दिनांक 01/02/2010 अन्वये आंतरजातीय विवाहीत जोडप्यांना देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यामध्ये रुपये 15,000/- वरुन रुपये 50,000/- इतकी वाढ करण्यात आलेली आहे. नमुद शासन निर्णयानुसार सदर वाढीव अनुदान शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून अनुज्ञेय राहील. पूर्वीच्या आंतरजातीय विवाहांना अर्थसहाय्य देण्यासाठी ग्राह्य धरता येणार नाही असे स्पष्ट निर्देश असताना 3 लाभधारकांचा विवाह शासन निर्णया अगोदर झालेला असल्याने संबंधीतांना रुपये 15,000/- प्रमाणे अनुदान देण्याऐवजी जिल्हा परिषदेने रुपये 50,000/- प्रमाणे वाढीव अनुदान दिलेले आहे. त्यामुळे रक्कम रुपये 1,05,000/- चे जादा प्रदान झालेले आहे. रक्कम रुपये 1,05,000/- संबंधीताकडून वसुल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

2) चंद्रकांत मारूती खर्जे या लाभार्थ्याची प्रमाणके, संचिका याची अर्धसमास पत्र क्रमांक 3 अन्वये मागणी करूनही उपलब्ध करून दिले नाही. सदर देयकात उपरोक्त प्रमाणे रक्कम रुपये 35,000/- चे जादा प्रदान झालेले आहे. रक्कम रुपये 35,000/- संबंधीताकडून वसुल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

3) उपसंचालक, समाजकल्याण संचालनालय, महराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्रमांक सक/ नाहसं/आंजावि/का-11/,दिनांक 01/10/1993 मधील मुद्दा क्रमांक 07 अन्वये वर ज्या जिल्हयांत रहात असेल त्या जिल्हयातून दांपत्यास अर्थ सहाय्य देण्यात यावे. मग तो अर्ज वधू अथवा वर अथवा दोघांपैकी कोणाकडूनही प्राप्त झाला असला तरी, असे आदेश असताना जिल्हा परिषदेने अ.क्र. 3 व 5 मधील वर हा इतर जिल्हयातील रहिवाशी असताना त्यास उस्मानाबाद जिल्हा परिषदेने नियमबाहय अनुदान प्रदान केलेले आहे, अनियमिततेबाबत खुलासा करावा.

**3.847 ग्रामीण भागातील मागासवर्गीय मुलींना सायकली पुरविणे खर्चातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद लातूर यांनी सन 2014-15 मध्ये, जिल्हांतर्गत ग्रामीण भागातील मागासवर्गीय मुलींना सायकली पुरवठा करणेसाठी जिल्हा परिषदेने स्व:उत्पन्नातून रुपये 30 लक्ष एवढया रकमेची तरतूद करुन सायकली वाटप करण्याची योजना हाती घेतली आहे. प्रमाणक क्रमांक 81, दिनांक 30/03/2015 रुपये 29,99,370/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक 28/01/2015 विषय क्रमांक 18.03 ठराव क्रमांक 2850 नुसार, जिल्हांतर्गत ग्रामीण भागातील मागासवर्गीय कल्याणार्थ सन 2014-15 मध्ये तालुकानिहाय लाभार्थ्यांच्या अंदाजित निवड लाभार्थी संख्येस मंजूरी दिलेली आहे. यावरुन, लाभार्थीची मागणी, गरज किंवा आवश्यकता लक्षात न घेता

केवळ आर्थिक तरतूद आहे. म्हणून खर्च करावयाचा असल्याचे सदर बाबीवरुन दिसून येते. यामुळे योजनेचा उददेश सफल होत नाही. अंदाजित लाभार्थी ठरवून साहित्याची खरेदी केल्यामूळे गरजवंत लाभार्थ्यास या योजनेचा लाभ झाल्याचा लेख्यांआधारे खातरजमा होत नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 100 व 125 नुसार कोणत्यांही खर्चास प्रथम प्रशासकीय मंजूरी घेणे आवश्यक आहे. त्यानंतर तांत्रिक मंजूरी घेऊन कामावर खर्च करावयाचा आहे. परंतू सदर प्रकरणी दिनांक 04/08/2014 रोजी प्रशासकीय मंजूरी व दिनांक 19/05/2014 रोजी तांत्रिक मंजूरी घेतल्याचे दिसून येते. यावरुन प्रशासकीय मंजूरी मिळण्या अगोदर तांत्रिक मंजूरी घेतल्याने केलेला खर्च नियमबाहय ठरतो.

3) शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक झेडपीए-2009/प्र.क्र.514 वित्त-9, दिनांक 20/11/2009 नुसार निविदेतील रक्कम रुपये 10 लाखापेक्षा अधिक असेल तर आकारावयाचे मुद्रांक शुल्काचे दर हे रुपये 10 लाखाच्या वरील प्रत्येकी रुपये 1.00 लाखाकरीता रुपये 100/- चे मुद्रांक शुल्क आकारले पाहिजे. परंतू सदर प्रकरणी रुपये 30 लाख एवढया रकमेसाठी रुपये 2,100/- मुद्रांक शुल्क आकारण्या ऐवजी रुपये 100/- एवढया रक्कमेचा मुद्रांक वापरण्यात आला आहे. ज्यामुळे रुपये 2,000/- एवढया शासन महसूलाचे नुकसान झालेले आहे. तरी कमी आकारणी केलेल्या महसूल मुद्रांकाची रुपये 2,000/- ची सबंधित ठेकेदाराकडून वसूली करावी व शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4) विक्रिकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची अधिसूचना दिनांक 04/05/2012 नुसार, नोंदणीकृत कंत्राटदाराकडून विक्री किंमतीच्या 2 टक्के मुल्यावर्धित कर कपात करणे आवश्यक आहे. परंतू सदर प्रकरणी 2 टक्के प्रमाणे रुपये 59,987/- एवढी रक्कम वसूल केलेली नाही. तरी उक्त अधिसूचनेनुसार संबंधित ठेकेदाराकडून रक्कम रुपये 59,987/- वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

5) पंचायत समिती स्तरावरुन वाटप केलेल्या सायकली हया सन 2014-15 ची योजना असलेने त्याच वित्तिय वर्षात वाटप करणे आवश्यक होते. परंतू लेख्यांची पडताळणी केली असता तालुका स्तरावरुन सदरचे वाटप दिनांक 02/07/2015 पासून करण्यात आलेचे दिसते. सन 2015-16 मध्ये योजनेचा लाभ दिला गेला आहे. यामुळे योजनेचा उद्देश सफल झाला नाही हे स्पष्ट होते.

6) सायकलींचे वाटप हे पंचायत समिती स्तरावरुन असलेने, तसेच लाभार्थी निवड ही गठित समितीने करावयाचे असलेने एकाच वेळी सदर निवड न करता वेळोवेळी व आवश्यकतेनुसार लाभार्थी यादीस जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी मंजूरी देऊन त्यानुसार पंचायत समिती स्तरावर साहित्याचे वाटप केलेचे दिसून येते. तथापी, अशा यादीस समितीने मंजूरी दिल्याचे दिसून येत नाही त्यांमूळे मंजूर लाभार्थी हे सदर योजनेचा लाभ घेण्यास पात्र असलेचे लेख्याअभावी खात्री करता आली नाही.

7) जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक 28/01/2015 मध्ये अंदाजित लाभार्थी विचारात घेऊन खरेदीस मंजूरी दिलेचे दिसते. असे असलेने जिल्हांतर्गत एकूण 10 पंचायत समितीस सायकलीचा पुरवठा कोणत्या निकषांवर करण्यात आला याचा बोध होत नाही. तरी असे कोणते निकष लावून त्या त्या पंचायत समितीस तेवढे नग वाटप केले याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

**3.848 स्वयंसेवी संस्थातंर्गत चालविण्यात येत असलेल्या अनुदानित मागासवर्गीय विद्यार्थी वस्तीगृहास नियमबाहय इमारत भाडे अदाईत जादा प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद लातूर, सन 2014-2015 च्या लेखापरीक्षणात स्वंयसेवी संस्थेमार्फत चालविण्यात येत असलेल्या मागासवर्गीय विदयार्थी वस्तीगृहासाठी खाजगी व्यक्तीकडून घेण्यात आलेल्या भाडे तत्वावरील इमारतभाडे अदाईच्या खर्चाचे लेखे तपासले असता नियमबाहय जादा प्रदान केल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय, समाज कल्याण व सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग कमांक बीसीएच-1097/ प्र.क्र.107/मावक-4, दिनांक 16/03/1998 जोडपत्र अ (अ-16) (क) नुसार वस्तीगृहाच्या ईमारत भाडे अदाई बाबत

शासनाने दिलेल्या निर्देशानुसार संस्थेने दिलेले भाडे वाजवी असलेबाबतचे बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता व समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांनी प्रमाणित केले पाहिजे. सदर दिलेल्या भाडेच्या 75 टक्के भाडे इतके सहायक अनुदान म्हणून शासन अनुदान मिळते. तसेच जोडपत्र अ मधील क्रमांक 3 (ब) (2) नुसार प्रत्येक निवासी छात्रास किमान 24 चौ. फुट ते कमाल 40 चौ फूट च्या प्रमाणात शयन व भोजनासाठी पुरेशी जागा असणे आवश्यक असताना वस्तीगृहास मंजूर प्रवेश छात्रासाठी कमाल चौरस फुटा पेक्षा जादा चटई क्षेत्र दर्शविल्यामुळे 8 वस्तीगृहास रुपये 44,265/-जादाचे प्रदान केलेले आहे. जे संबधीत संस्थेकडून वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

2) सदर शासन निर्णयातील जोडपत्र अ (आठ) (ड) नुसार ज्या संस्थेचे वस्तीगृह संस्थेच्या स्वत:च्या इमारतीत चालू आहे. अशा संस्थेना इमारतीचे भांडवली मुल्याच्या 7.5 टक्के इतकी रक्कम निर्धारित करुन येणाऱ्या रक्कमेच्या 50 टक्के रक्कम परीरक्षण अनुदान म्हणून देण्यात येईल असे नमूद असतांना किती संस्थेने स्वत:च्या इमारतीत अशी वस्तीगृहे चालू ठेवले आहेत याचे लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाहीत. तसेच अशा तऱ्हेचे परीरक्षण अनुदान दिल्याचे लेखापरीक्षणात दिसून आले नाही. सरसकट योग्य भाड्याचे प्रमाणपत्र घेऊन त्याच्या 75 टक्के भाडे अदा केले आहे. तरी याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. अशाप्रकारचे संस्थेकडे स्वत:च्या इमारतीत वस्तीगृह चालू नसल्याची खात्री पटवावी.

3) उपरोक्त प्रमाणे दर्शविलेल्या बाबी ह्या निवड महिन्यापुरते व लेखापरीक्षणासाठी उपलब्ध केलेल्या लेख्यानुसार दर्शविण्यात आले आहे. याशिवाय इतरही संस्थेस अशाप्रकारचे जादा प्रदान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्याचे शोधन करुन अशाप्रकारे झालेले जादा प्रदान संबधीताकडून वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.